**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत आम्ही शिवसेना व भारतीय जनता पक्षातर्फे नियम 289 अन्वये आज आपल्याकडे नोटीस पाठविलेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, 8 तारखेला या राज्याचे माननीय गृहमंत्री या सदनामध्ये आले आणि काल होणाऱ्या निवडणुकीबद्दल त्यांनी कायदा व सुव्यवस्था याविषयी या ठिकाणी निवेदन केले. आम्ही त्यांना काही माहितीही विचारली. अशा घटना घडतात त्याबाबतीत आपण कोणती काळजी घेणार आहात असे विचारल्यावर त्यांनी असे उत्तर दिले होते की, संपूर्ण पोलीस बंदोबस्त केलेला आहे तसेच रॅपिड ॲक्शन फोर्सची सुध्दा व्यवस्था केलेली आहे. इतर भागातील पोलीस फोर्स सुध्दा तैनात करण्यात आलेला आहे. कसल्याही परिस्थितीमध्ये कोठेही काही गडबड होणार नाही अशा प्रकारची चोख व्यवस्था गृह मंत्रालयाने केलेली आहे असे निवेदन त्यांनी केले होते. मी त्यांना प्रश्न विचारल्यानंतर त्याबाबत त्यांनी परत त्याचे स्पष्टीकरण केलेले होते. मला सांगण्यास अतिशय दु:ख होते. मला हे समजत नाही की, या राज्यातील कायदा व सुव्यवस्था या शासनाच्या हातामध्ये आहे की नाही ? कायदा व सुव्यवस्थेवर या शासनाचे नियंत्रण राहिलेले आहे की नाही ? हे मला काही समजत नाही. 8 तारखेला संध्याकाळी 5.00 वाजता या ठिकाणी निवेदन झाले आणि 8 तारखेलाच रात्री 1.00 ते 1.30 वाजताच्या सुमारास अंबरनाथमध्ये आमच्या एका विभाग प्रमुखाची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. हे करणारे लोक कोण आहेत ? ही सगळी माहिती सापडली. त्याच्या निवासस्थानी त्यांच्यावर हा हल्ला केला. ही गोष्ट सुध्दा तेथील उमेद्वारांना सुध्दा माहीत आहे. ज्या ज्या माणसांनी हल्ला केला त्यांची नावे सुध्दा दिली आहेत. श्री. श्याम गायकवाड नावाचे तेथील रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते आणि स्थानिक अध्यक्ष आहेत ते मारण्यासाठी होते. या व्यतिरिक्त श्री. वाघमारे नावाचे तेथील उमेद्वार ....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता या ठिकाणी प्रश्नोत्तराचा तास आहे आणि प्रश्नोत्तराचा तास हा सर्वात महत्वाचा तास आहे. आपण सुध्दा प्रश्नोत्तराच्या तासाचे महत्व जाणता. आपण नियम 289 अन्वये दिलेली नोटीस मला मिळालेली आहे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नियम 289 प्रमाणे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा याबाबतीत मी स्पष्टीकरण करीत आहे.

**सभापती** : आपण पाच मिनिटांमध्ये आपले वक्तव्य संपवावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, काल निवडणुका झाल्या त्या निवडणुकीच्या निमित्ताने इतके गैरप्रकार घडले, इतक्या हत्त्या झाल्या, इतक्या प्रकारचे घोटाळे झाले त्यांचा संदर्भ देण्याची आवश्यकता आहे. प्रश्नोत्तराचा तास का घेऊ नये आणि नियम 93 च्या सूचनेला प्राधन्य का द्यावे हे सांगण्यासाठी मी उभा आहे. मूळ कारण तेच आहे. नाही तर आम्ही प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन इतर कामकाज घ्यावे याबाबतीत नेहमी पाठपुरावा करीत नाही. पण तशीच काही इमरजंसी असेल, अर्जेन्सी असेल तरच हा विचार करतो. दुसरी अत्यंत काळजी करण्यासारखी गोष्ट म्हणजे या शासनाची क्षमताच संपली आहे. हे शासन महाराष्ट्रामध्ये राज्य करु शकेल किंवा कायदा व सुव्यवस्था सांभाळू शकेल अशा प्रकारचा दिलासा त्यांच्या कोणत्याही कृतीमधून दिसत नाही. म्हणून नाईलाजाने मला आज हा प्रस्ताव मांडावा लागला आहे. दुसरे कोणतेही कारण नाही. त्या ठिकाणी रात्री निर्घृणपणे हत्या केली. त्या ठिकाणी 40-45 वर्षाच्या मनुष्यावर 8-10 लोकांनी हल्ला करुन त्याचे डोके फोडले. त्याच्या घराजवळ त्याला मारले. हॉस्पीटलला नेण्याच्या आधी तो मृत्युमुखी पडला. त्याचा काय दोष होता ? अशा एखाद्या बेकसूर माणसाची हत्त्या लोक करीत असतील आणि पोलीस बघ्याची भूमिका घेत असतील, जी तात्काळ कारवाई करावयास पाहिजे त्यासंदर्भाने ज्यांची नावे एफ.आय.आर.मध्ये आहेत, माझ्याकडे एफ. आय. आर. आहे, त्या माणसांना पकडले नाही. काल निवडणुकीमध्ये सगळया बाजूला ते फिरत होते. काल आमचे माजी आमदार श्री. साबीरभाई शेख यांच्या गाडीवर त्यांनी हल्ला केला. त्यांच्या गाडीची सगळी मोडतोड केली. याच्या पाठीमागे मुद्दाम नियोजनबध्द असा हल्ला करण्याची प्राथमिकता दिसून येते आणि त्याच गोष्टीला प्राधान्य दिले गेले आहे. कालच्या दिवसामध्ये, काल निवडणुकीच्या निमित्ताने मी नवी मुंबईमध्ये होते. नवी मुंबईमध्ये कोणते प्रकार झाले नाहीत ?

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ श्री.बरवडनंतर 14:05

श्री.मधुकर सरपोतदार...

तुम्हाला आश्चर्य वाटेल, आमचे हे महाराष्ट्र राज्य बिहारच्या दिशेने वाटचाल करीत आहे. आपण काय करीत आहोत. काल त्याठिकाणी खोटी ओळखपत्रे, मशिनरी, रेशनकार्डे छापण्याची यंत्रणा एका खोलीमध्ये आढळली, त्यासंबंधीची तक्रार केल्यानंतर शेवटी पोलिसांनी ती यंत्रणा जप्त केली. त्या माणसांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. परंतु त्यापूर्वी किती ओळखपत्रे वाटली गेली, किती रेशन कार्ड वाटली गेली याबद्दल कोणतीही माहिती आज उपलब्ध नाही. हे सर्व करणारा राष्ट्रवादी पक्ष आहे. राष्ट्रवादी पक्षातर्फे हे कार्यक्रम केले गेले. हे मला अतिशय खेदाने नमूद करावेसे वाटते. मा.श्री.अजितदादा आपल्यासारखे नेते तेथे पक्षाचे नेतृत्व करतात. आपण महाराष्ट्रात इतर गोष्टी करण्याचे बोलता आणि दुस-या बाजूला कायदा व सुव्यवस्थेचा धज्जा उडवित आहात. कोठे आहे कायदा व सुव्यवस्था ? प्रत्यक्षात निवडणुकीसाठी मतदारांच्या रांगा लागल्या होत्या त्या रांगेमध्ये राजरोसपणे पैसे वाटण्याचे काम चालू होते. हया नोटा घ्या आणि मत द्या, अशाप्रकारचा प्रकार निवडणुकीच्या ठिकाणी होत असेल तर ही गंभीर बाब आहे. आम्ही यासंबंधी पोलिसांकडे तक्रार दिलेली आहे. एवढेच नाही तर आमच्या पक्षाची एक महिला कार्यकर्ता असाच बाहेर प्रचार करीत होती. तेथील धर्मा पाटील नावाच्या उमेदवाराच्या मुलाने त्या महिलेवर हल्ला केला. ती महिला रबाळा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यास गेली असता तिला बाहेर काढले गेले, तिची तक्रार घेतली नाही. जर पोलीस यंत्रणा अशाप्रकारे काम करीत असेल तर माझा प्रश्न असा आहे की, पोलीस खाते राष्ट्रवादीचे नोकर आहेत काय, राष्ट्रवादी पक्षाने त्यांना आपले भाडोत्री म्हणून ठेवले आहेत का ? पोलीस अशी यंत्रणा आहे की, जी स्वतंत्रपणे काम करुन ज्याने अन्याय केला, ज्याने गडबड केली, ज्याने बेकायदेशीर कृत्य केले त्याला पकडण्याची आवश्यकता होती. परंतु त्याला पकडले गेले नाही. हा एकच प्रकार नाही. काल नवीन मुंबईमध्ये, अंबरनाथ-बदलापूरमध्ये किरकोळ प्रमाणात हे किरकोळ प्रकार घडले, त्याचा परिणाम असा झाला की, कालची निवडणूक शांत वातावरणामध्ये पार पाडू असे शासनाने या सभागृहाला आश्वासित केले होते ते चुकीचे होते. याचा अर्थ एकच होतो की, फक्त घोषणा करणारे शासन आहे आणि या शासनाकडे पोलिसांवर नियंत्रण ठेवण्याची किंवा कायदा व सुव्यवस्था राखण्याची याची ताकद नाही. एवढेच नाही तर सोलापूरमध्ये उपविभाग प्रमुखाची हत्या झाली, त्यासंदर्भात मी येथे उल्लेख केला होता. लातूर जिल्हयामध्ये आमच्या एका जिल्हा प्रमुखावर हल्ला झाला. लातूर जो गाव मुख्यमंत्र्यांचा आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार...

त्याठिकाणी अशी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे आमच्या मनामध्ये संदेह निर्माण झाला आहे की जाणुनबूजून पोलीस यंत्रणा हातात घेऊन या पक्षाच्या कार्यकर्त्यांना संपवून टाकून त्यांच्यात दहशत निर्माण करावी आणि या पक्षाचे कामकाजच बंद पाडावे अशाप्रकारची योजना पोलिसांच्या मदतीने करण्याचे ठरविले आहे काय ? हा माझ्यासमोर खूप मोठा प्रश्न आहे. आजपर्यंत मला असे वाटले होते की, केवळ राष्ट्रवादीचे लोक सहभाग झाले आहेत. परंतु कालचे काही प्रकार पाहिल्यानंतर श्री.पतंगराव कदम यांना सांगू इच्छितो की, काँग्रेसवाल्यांचा सुध्दा त्यामध्ये कोठे तरी सहभाग आहे. ज्यापध्दतीने काँग्रेसवाले पुढे पावले टाकत आहेत, ज्या पध्दतीने काँग्रेसवाल्यांच्या या संपूर्ण कारवाया चालू आहेत त्याच्यावरुन या महाराष्ट्राचा बिहार करण्याच्यादृष्टीने पावले उचलली जात आहेत आणि शासनाच्या मदतीने हे केले जात आहे याचे खूप मोठे दुःख वाटते. त्याचा निषेध करणे आणि त्याविषयी सभागृहात साधकबधाक चर्चा व्हावी आणि अपराधी लोकांना कायद्याच्या कक्षेमध्ये आणून त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करावी, कितीही मोठा अधिकारी असो किंवा कितीही मोठा पुढारी असो जर त्यांनी अशाप्रकारच्या कृत्यामध्ये सहभाग घेतला असेल आणि अशाप्रकारचे कृत्य करण्यासाठी तो प्रोत्साहन देत असेल तर या माणसांचा कायदेशीररित्या बंदोबस्त करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा, या शासनाने सांगावे की आमच्या हातून हा बंदोबस्त होऊ शकत नाही, तुम्ही तुमची जबाबदारी घ्यावी. आम्ही त्या पध्दतीने पुढे जाण्यासाठी तयार आहोत. असे नाही की, कार्यकर्ते खूप घाबरले किंवा गलितगात्र झाले म्हणून या सगळया परिस्थितीला शरण जातील, त्यांच्या त्यांच्या पक्षात प्रवेश करतील, असा काहीही प्रकार नाही. सगळया प्रकारचा आम्ही मुकाबला करण्यास तयार आहोत. शासनाने असे जाहीर करावे की, आमची पोलीस यंत्रणा सक्षम नाही. आम्ही अशाप्रकारच्या घटनांवर कोणतेही बंधन आणू शकत नाही. आम्ही या सगळया गोष्टी कशाही प्रकारे थांबवू शकत नाही. या सगळया महाराष्ट्रात आज असे दुर्दैवाने चित्र उभे राहिले आहे. कायदा व सुव्यवस्था नावाची गोष्टच कोठे शिल्लक राहिल्याचे दिसत नाही. या सार्वभौम सभागृहामध्ये येतो तेव्हा अशा ज्यावेळी घटना घडतात त्यांना न्याय मिळाला पाहिजे.याठिकाणी होत असलेले सगळे कामकाज महत्वाचे आहे, प्रश्नोत्तरे महत्वाची आहेत, निवेदने महत्वाची आहेत, इतर सगळे कामकाज महत्वाचे नाही असे आमचे म्हणणे नाही. परंतु माणसांचे दैनंदिन जीवन जर असुरक्षित असेल तर या सगळया गोष्टींना महत्व राहत नाही.

नंतर श्री.शिगम.....

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार पुढे सुरु...)

म्हणून मी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. माझी आपणास विनंती आहे की, आजचे कामकाजपत्रिकेवरील सर्व कामकाज स्थगित करुन नियम 93च्या सूचनेकडे स्थगन प्रस्तावाच्या दृष्टीने पाहून आपण तातडीने चर्चेला सुरुवात करावी.

--

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ नेते श्री.मधुकर सरपोतदार यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन ताबडतोबीने या गंभीर विषयावर चर्चा घ्यावी असा प्रस्ताव आपणाकडे दिलेला आहे. या प्रस्तावाला यासाठी तातडी आहे की, या महाराष्ट्रामध्ये जे एसपी आहेत ते जणू काही राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयातील प्रमुख आहेत असे वर्तन करीत आहेत. मा.मंत्रीमहोदय, श्री. पतंगराव कदम याठिकाणी उपस्थित आहेत. मला त्यांच्याबद्दल आश्चर्य वाटते आणि आता सहानुभूतीदेखील वाटते. त्या काळामध्ये गृहमंत्र्यांनी काय सांगावे ? डॉ. पतंगराव कदम यांच्या भागातील काँग्रेस आम्ही गाढून टाकू असे त्यांनी सांगितले. ...

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, मला बोलायचे आहे.

श्री. नितीन गडकरी : त्याठिकाणी तीन खून झालेले आहेत.

(सत्ताधारी पक्षातील काही मा.सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मा.सदस्य श्री. विनायक मेटे यांनी कृपया खाली बसावे. मी त्यांना नंतर बोलण्याची संधी देईल.

श्री. नितीन गडकरी : मला सांगताना अतिशय वाईट वाटते की, मोहोळ जिल्हा सोलापूर...

(मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी जोरजोराने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

(विरोधी पक्षाचे काही मा.सदस्य देखील जोरजोराने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकणी यांनी कृपया खाली बसावे. तसेच विरोधी पक्षातील मा.सदस्यांनी देखील खाली बसावे. मा.सदस्यांना मी बोलण्याची संधी देणार आहे.

श्री. नितीन गडकरी : राज्यातील परिस्थिती कशी बिघडत आहे हे मी सांगत आहे.

(विरोधी तसेच सत्ताधारी पक्षातील काही मा.सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असतात.)

**सभापती** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटाकरिता स्थगित करीत आहे.

---

(सभागृहाची बैठक 2 वाजून 13 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नियम क्रमांक 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा होण्याची अर्जन्सी आहे हा विषय मी आपल्यासमोर मांडत होतो. दिनांक 5 एप्रिल, 2005 रोजी मोहोळ, जिल्हा सोलापूर येथे शिवसेनेचे तालुका उप प्रमुख श्री. पंडीत देशमुख यांचे अपहरण झाले. केवळ अपहरण झाले नाही तर, अपहरण करुन त्यांचा खून झ ााला आहे. शुक्रवार, दिनांक 8 एप्रिल,2005 रोजी रात्री 11.30 वाजता श्री. जयेंद्र हजारे, प्रभाग क्रमांक-28 आंबेडकरनगर, अंबरनाथ येथील शिवसेना व भाजप युतीचे अधिकृत उमेदवार होते. त्यांच्यावर खूनी हल्ला झाला आणि मरणसन्न अवस्थेत मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथे त्यांना दाखल केले गेले होते. त्यानंतर तेथे त्यांच्या मृत्यू झाला असे जाहीर झाले. नालासोपारा येथील वृत्त आपण वाचले असेल. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख श्री. विवेक पंडीत यांना वसई विकास मंडळाच्या आठ ते दहा कार्यकर्त्यांनी मारहाण केली. मारहाण करणा-यांजवळ शस्त्रे सापडली. राज्यात अशा प्रकारच्या अनेक घटना घडलेला आहेत. अशा घटना घडण्याचे कारण काय हे मला समजू शकलेले नाही. सभापती महोदय, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सरकार या राज्यात आहे. सरकार हे कोणा पक्षाचे नसते. सरकार हे निपक्ष असते. या ठिकाणी पोलिसांची भूमिका ही जणू काही आपण राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यालयाचे प्रमुख आहोत अशा प्रकारे ते वागत आहेत. अशा घटनांकडे पोलीस बघ्याची भूमिका घेत आहे. सभापती महोदय,मी परवा निवडणुकीच्या निमित्ताने संभाजीनगर येथे होतो. त्या ठिकाणी मला स्थानिक चॅनेलवर माननीय श्री. आर.आर.पाटील यांचे भाषण ऐकावयास मिळाले.

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

त्या भाषणात त्यांनी असे म्हटले की, आम्ही कॉंग्रेसला गाडून टाकू. मध्यंतरी श्री. मणिशंकर अय्यर मुंबईत येणार होते त्यावेळी आम्ही आजतक टीव्ही वर पाहिले होते की शिवसेनेच्या कार्यकर्त्यांवर आरोप केले जात होते. त्यांच्यासमोर निदर्शने झाली. राजकीय पक्ष लोकशाहीमध्ये असे करतात ही घटना नवीन नाही. जेव्हा आम्ही सत्ताधारी पक्षात होतो तेव्हा ॲड. गुरुनाथ कुलकर्णी हातामध्ये झेंडे घेऊन निदर्शने करीत होते. लोकशाहीच्या जिवंतपणाचे हे एक लक्षण आहे. श्री. विनायक मेटेंसारखी मंडळी आमच्याबरोबर होती. सत्ता गेल्यावर ते आम्हांला सोडून गेले. त्यामुळे गेली 10 वर्षे त्यांना विरोधी पक्षाचा अनुभव नाही. जे आमच्याबरोबर कट्टर कार्यकर्त्याप्रमाणे राहतात त्यांना अनुभव असतो. सत्ता बदलली की ते बदलत नाहीत. टिकून राहतात. तरच विरोधी पक्षात काम करण्याचा अनुभव येतो. पक्ष बदलून येत नाही. सभापती महोदय, गृहमंत्री म्हणतात की गाडून टाकू,चिरडून टाकू. कॉंग्रेसला गाडून टाकू आणि शिवसेनेला चिरडून टाकून अशी भाषा गृहमंत्र्यासारख्या पदावर काम करणा-या व्यक्ती अशी बेताल वक्तव्ये का करतात ? फार सांभाळून वागले पाहिजे आणि बोलले पाहिजे. अन्यथा अशा प्रकारे पालिसांना मेसेज गेला आणि पोलिसांना मेसेज समजला की आपल्या गृहमंत्र्याला काय पाहिजे.....

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मा. विरोधी पक्षनेते बोलत असताना जे शब्द गृहमंत्र्यांनी उच्चारले नाहीत असे शब्द उच्चारुन म्हणजे गाडून टाकू,चिरडून टाकू अशा पध्दतीचे वक्तव्य गृहमंत्र्यांनी केलेले नाही. गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचा विपर्यास करण्यास विरोधी पक्षांनी सुरुवात केलेली आहे हे थांबले पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी जे बोललो ते टीव्हीवर मी कानाने ऐकले आहे आणि ते सिध्द करुन देण्यास मी तयार आहे. मी मा.सदस्यांना ऐकवू शकतो. जे नसेल ती मी बोलणार नाही. जे बोललो आहे ते सिध्द करुन दाखवीन. सभापती महोदय, मी समजू शकतो की एखाद्या विचाराबद्दल,राजकीय पक्षाबद्दल राज्यकर्त्यांच्या मनामध्ये नाराजी असू शकते,द्वेष असू शकतो. मा.मंत्री डॉ. पतंगराव कदम उठून गेले आहेत. त्यांना बोलवावे. ते आणि मी एकाच ठिकाणी संभाजीनगरला होतो. श्री. दिलीप देशमुख आहे त्यांना माहीत आहे. श्री. आर.आर.पाटील यांनी भाजप-शिवसेनेला नाही तर कॉंग्रेसला गाडून टाकून असे म्हटले आहे. मी श्री.मेटे साहेबांचा

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

आभारी आहे. प्रश्नोत्तराचा तास असाच निघून जाईल...

( विरोधी पक्षाचे अनेक मा. सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**सभापती** : सभागृहाचे कामकाज सद्यस्थिती चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 25 मिनिटांकरिता स्थगित करीत आहेत.

( सभागृहाची बैठक 2 वाजून 34 मिनिटांनी 25 मिनिटांकरिता स्थगित झाली . )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- स्थगिती नंतर -

**( सभापती स्थानी : तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक 3 वाजून 15 मिनिटांनी पुन्हा सुरु होईल.

( सभागृहाची बैठक 3.00 ते 3.15 पर्यन्त स्थगित झाली )

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर ... )

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**सभापती** : सभागृहाला मी माहिती देऊ इच्छितो की, नियम 97 खाली अडीच तासांची चर्चा आता लगेचच घेण्याचे मी मान्य केलेले आहे. तेव्हा तातडीचा विषय म्हणून नियम 97 खालील चर्चा आता सुरू होईल. ही अडीच तासांची चर्चा असून मंत्र्यांच्या उत्तरासह ती अडीच तासामध्येच पूर्ण होईल. त्यानंतर आजच्या कामकाज पत्रिकेवरील इतर कामकाज म्हणजे नियम 93 खाली आलेल्या सूचना, लक्षवेधी सूचना आदी कामकाज क्रमाने घेतले जाईल. हा सगळा कार्यक्रम आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने पूर्ण करावयाचा आहे तरी आपण सर्वांनी यासाठी सहकार्य करावे ही विनंती. मात्र ही चर्चा सुरू होण्यापूर्वी तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली जाईल. तरी मंत्र्यांनी ही अधिक माहिती सभागृहासमोर ठेवावी.

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

----

श्री. राणा जगजितसिंह पाटील (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या दराबाबत" या विषयावरील प्रा.शरद पाटील, श्री.जयंत पाटील, प्रा.बी.टी.देशमुख यांच्या दिनांक 4 एप्रिल 2005 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 1816 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

( प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी. )

...... जी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक काळात राजकीय कार्यकर्त्याची झालेली हत्या.

**मु.शी.** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक काळात राजकीय कार्यकर्त्याची झालेली हत्या याबाबत सर्वश्री मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते व अन्य सदस्यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

----

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी अडीच तासांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो. -

" राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था तसेच अंबरनाथ नगरपरिषदेच्या निवडणूक कालावधीत स्थानिक शिवसेना पदाधिकाऱ्याची करण्यात आलेली हत्या."

माननीय सभापती महोदय, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या शासनाचा महाराष्ट्रात कारभार सुरू झाला आणि त्यानंतर महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती चांगली राहील, आम्ही ती चांगल्या पध्दतीने सांभाळू अशा प्रकारची आश्वासने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री.विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री व गृहमंत्री असलेले माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी त्यांच्या विविध भाषणांतून जनतेला दिली. राज्यामध्ये नव्या दमाचे, नवीन विचारांचे शासन आले. त्यांच्या ध्यानीमनी नसतानाही त्यांना राज्यात सत्ता मिळाली. ही सत्ता हाती यावी म्हणून जनतेला अमाप वचने दिली गेली होती. सत्ता मिळाली तर मोफत वीजपुरवठा करू, विजेची बिले माफ करू, कापूस एकाधिकार खरेदीसाठी शेतकऱ्यांना 2700 रुपये भाव देऊ.. अशी एक ना अनेक प्रकारची वचने आणि आश्वासने महाराष्ट्रातील जनतेला दिली गेली होती. ज्या ज्या गोष्टी आम्ही, शिवसेनेने सुरू केल्या तेव्हा त्यांना वाटले की, आता आपल्या हातून सत्ता जाते आहे म्हणून आपणही तीच वचने - आश्वासने जनतेला देऊन सत्ता काबीज करू असा मनोदय ठरवून जनतेपुढे खूप मोठे

...... जी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ...

आशावादी चित्र उभे करून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी राज्यात सत्ता संपादित केली. जवह जवळ 165 आमदारांचा पाठिंबा या सत्ताधारी पक्षाला आहे त्यामुळेच हे स्थिर सरकार आहे असा त्यांचा अर्थ असतो. त्यामुळे आणखी काही उधार-उसनवारी नको, खरेदी-विक्री करण्याची गरज नाही अशा प्रकारची एक भावना. राज्यात स्थिर सरकार देण्यामागे या शासनाला राज्य कारभार करताना कोठे अडचण येणार नाही अशी भावना जनतेचीही झाली. पण आता सत्य काय आणि असत्य काय हे जनतेला कळू लागले. कायदा आणि सुव्यवस्था हा त्यातील एक अतिशय महत्त्वाचा भाग. या शासनाच्या काळामध्ये सातत्याने महाराष्ट्रात दरोडे पडू लागले. जेथे जेथे दरोडे पडले त्यातील एकाही दरोड्याचा आजपर्यंत तपास लागलेला नाही. ....

(यानंतर श्री.जागडे ...एच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

या ठिकाणी अशा प्रकारचे उत्तर दिले जाते की, याचा तपास सुरु आहे. गुन्हेगारांना आपण कोणत्याही परिस्थितीत पकडू, असा विश्वास या ठिकाणी दिला जातो. असे असतानाही बँकांवर दरोडे पडत आहेत, घरांवर दरोडे पडत आहेत. कुटुंबातील लोकांना मारले जात आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचा कारभार चालला आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात नेहमीच निवडणूका होत असतात. नुकत्याच अंबरनाथ नगरपालिका, बदलापूर नगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, संभाजीनगर म्हणजे औरंगाबाद महानगरपालिका, वसई नगरपालिकांच्या निवडणूका जाहीर झाल्यानंतर एका पाठोपाठ एक अशा बेकायदेशीर कृत्यास सुरुवात झाली. आम्ही या बाबत अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले होते. या राज्याचे गृहराज्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी या सदनात आठ तारखेला निवेदन केले होते. त्या निवेदनामध्ये महाराष्ट्रातील जनतेला एक प्रकारचा विश्वास त्यांनी दिला होता. त्यांनी या ठिकाणी असे सांगितले होते की, " सगळी जय्यत तयारी झाली आहे. निवडणूकीच्या काळात कोणत्याही प्रकारचा हिंसाचार होणार नाही. कोणतेही हल्ले होणार नाहीत. लोकांनी बिनधास्तपणे मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे. कोणीही दहशतीची काळजी करु नये." अशा प्रकारचा विश्वास त्यांनी सदनात दिला होता.

सभापती महोदय, सोलापूरमध्ये दोन दिवसापूर्वी एक घटना घडली आहे. शिवसेनेचे पदाधिकारी श्री. पंडीत देशमुख यांना पळवून नेऊन त्यांचा निघृणपणे खून करण्यात आला. त्यानंतर पुन्हा अशा प्रकारच्या अत्याचाराचे प्रकार या राज्यात घडले. तेव्हा आम्ही विविध आयुधांचा अवलंब करुन या सदनात हा प्रश्न उपस्थित केला होता. तेव्हा माननीय सभापती महोदय, आपण शासनाला म्हणजेच नामदार गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना निवेदन करण्याचे आदेश दिले होते. या सदनाचे श्रेष्ठ अधिकारी आपण आहांत. आपण निदेश दिल्यानंतर त्या निदेशांचे पालन ताबडतोबीने होण्याची आवश्यकता होती. मा. सभापतींनी निदेश दिल्यानंतरही निवेदन करण्यात आले नाही. तेव्हा आम्ही या निवेदनाची मागणी उचलून धरली. त्यासाठी सभागृहाची बैठकही आपणाला स्थगित करावी लागली. त्यानंतर श्री. आर. आर. पाटील यांनी या सदनात निवेदन केले. बदलापूर, अंबरनाथ, नवी मुंबईच्या निवडणूकीबाबत गृहमंत्री श्री.आर. आर. पाटील यांनी असे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

सांगितले होते की, " या भागातील निवडणूका शांततेने पार पडतील. कोणताही गैरव्यवहार होणार नाही. कोणाचीही दहशत असणार नाही." त्यावेळी आम्ही सांगितले होते की, ज्यांनी निवडणूकांच्या काळात सतत गोंधळ मागविण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यांचा हा व्यवसायच आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

अशा लोकांचा खूप मोठा उपद्रव या निवडणुकीच्या कालखंडामध्ये होतो त्याचे काय? त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही याची काळजी घेऊ. आम्ही रॅपिड ॲक्शन फोर्स आणून ठेवले आहे. सर्व व्यवस्था करुन कोणत्याही परिस्थितीत निवडणुकीच्या कालखंडामध्ये कुठेही गडबड होणार नाही, शांततेला गालबोट लागणार नाही अशाप्रकारचा विश्वास सदनामध्ये दिला. आम्हा सर्वांना बरे वाटले की, महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री व गृहमंत्री असे आश्वासन देत आहेत. त्यामुळे पाठीमागचे जे चित्र होते ते क्षणभर विसरलो आणि आमच्या मनाला क्षणभर दिलासा मिळाला की, महाराष्ट्र शासन जसे बोलते त्या प्रमाणे वागले आहे. व त्याप्रमाणे गुन्हेगारांना कोणत्याही प्रकारची गडबड करण्याची हिंमत, धाडस होणार नाही. अशाप्रकारचा मेसेज मा. गृहमंत्र्यांनी दिला. हे निवेदन सभागृहामध्ये संध्याकाळी पाच वाजता झाले. तो निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस होता. दहा तारखेला निवडणूक असल्यामुळे 8 तारखेला संध्याकाळी 5 वाजता संपूर्ण प्रचार यंत्रणा ठप्प झाली. मधल्या काळात घरोघरी फिरुन प्रचार होतो. परंतु 48 तास अगोदर सामूहिकरित्या कोणत्याही प्रकारचा प्रचार होत नाही. सामूहिक किंवा सार्वजनिक स्वरुपामध्ये प्रचार चालत नाही. त्या दिवशी रात्री मला फोन आला आणि त्यावेळी मला कळले की, अंबरनाथमध्ये श्री.जयेंद्र हजारे हे शिवसेनेचे उपविभागप्रमुख, आंबेडकर नगरामध्ये रहाणारे, त्यांच्या घरासमोर त्यांची हत्या झाली. मला खूप मोठे आश्चर्य वाटले. काल मा. उपमुख्यमंत्र्यांनी व मा.गृहमंत्र्यांनी सभागृहामध्ये केलेल्या निवेदनाची शाई वाळली नसेल त्यापूर्वीच तिला छेद देण्याचे काम कुणी केले? त्यामध्ये आर.पी.आय. चे लोक सामील होते. आणि कॉंग्रेसची त्यांना साथ आहे, अशाप्रकारची मला माहिती मिळाली. आम्ही त्या ठिकाणी ताबडतोब धाव घेतली. श्री. हजारे यांच्या कुटुंबियांना जाऊन भेटलो, मृत व्यक्तीचे अंत्यदर्शन घेतले. मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना जाऊन भेटलो असता त्यांच्या पत्नीने सांगितले की, "साहेब हे नेहमीच चाललेले असते, या लोकांची खूप मोठी दहशत या भागामध्ये आहे, आम्ही पोलिसांकडे तक्रार केलीतरी ते काहीही लक्ष देत नाहीत, जो तक्रार करील त्याला जीवानिशी जावे लागते. आज सकाळी श्री. जयेंद्र हजारे यांना तीन वेळा धमक्या आल्या की, तू शिवसेनेचे काम थांबव नाही तर तू संध्याकाळनंतर दिसणार नाहीस. अशाप्रकारच्या धमक्या आल्या तरीसुध्दा त्यांनी काम चालू ठेवले म्हणून त्यांची हत्या झाली." याबाबत मी चौकशी केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

असता श्री. सावकारे नावाचे गृहस्थ आहेत त्यांनी तक्रार केली, त्यांनी पोलीसांकडे जाऊन प्रकार कशाप्रकारे घडला ते सांगितले. श्री. जयेंद्र हजारे यांना धमक्या येत होत्या की, "तू प्रचार थांबव अन्यथा तुला संध्याकाळी बघावे लागेल." अशाप्रकारच्या धमक्या श्री. श्याम गायकवाड आणि अन्य गुंडांच्याकडून येत होत्या. त्यांची नावे माझ्याकडे असून माझ्या भाषणाच्या अनुषंगाने ती मी सांगणार आहेत. अशा परिस्थितीत श्री. जयेंद्र हजारे हे रात्री एकटे घरी जायला तयार नव्हते म्हणून श्री. सावकारे व त्यांच्याबरोबर आणखी एक-दोन कार्यकर्ते त्यांनी घेतले व श्री. जयेंद्र हजारे यांना सोडण्यासाठी ते त्यांच्या घराकडे गेले.त्यांच्यावर हल्ला होणार आहे हे त्यांच्या ध्यानीमनी नव्हते. माझ्या माहितीप्रमाणे रात्री साडे अकरा ते बाराच्या सुमाराला ते परत येत असतांना त्यांच्यापुढें एक गाडी आली. ती स्कॉर्पिओ गाडी होती, गाडीचा नंबर 9999 होता, त्या गाडीतून सात-आठ माणसे खाली उतरली. आणि या सर्व माणसांनी श्री. जयेंद्र हजारे यांच्यावर प्राणांतिक हल्ला केला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

त्यामध्ये श्री.शाम गायकवाड होते, त्याचबरोबर श्री.सुनील वाघमारे,श्री.प्रशांत कारंडे बंधु उर्फ वसंत जाधव, श्री.शहाबुद्दीन,श्री.प्रताप भोसले,श्री.बबन आणि इतर दोघेजण इतके लोक गाडीतून उरतले. त्यातील एकाच्या हातात चाकू होता, एकाच्या हातात चॉपर होता. एकाच्या हातात दंडूका होता. शाम गायकवाड याने दंडुका जयेंद्र हजारे यांच्या डोक्यावर मारला. त्यानंतर एकाने चॉपर मारला. त्यानंतर जयेंद्र हजारे खाली पडल्यावर या लोकांनी त्यांना लाथाबुक्क्यानी मारावयास सुरुवात केली. त्यावेळी ते गतप्राण झाल्यावर हे सर्व लोक पळून गेले. त्यांच्या घरासमोर हे झाल्या नंतर त्यांची पत्नी, बहीण आणि इतर कुटुंबिय बाहेर आले आणि त्यांनी त्यांना उचलून सेंट्रल रुग्णालयात नेले. पण तेथे जात असतानाच जयंत हजारे मृत्युमूखी पडले. त्यांच्या घराजवळ हा भयानक प्रकार घडलेला आहे. त्यांचा पाठलाग करुन त्यांना अशा प्रकारचे कंठस्नान घातले, ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत मी स्वत: तेथे जाऊन माहिती घेतली आहेत, तेथील पाहणी केली आहे.तेथील कार्यकर्त्यांशी बोललो आहे. त्यानंतर त्या माहितीच्या आधारावर परवाच्या दिवशी रात्री नियम 93 अन्वये नोटीस तयार करुन मी ती आपल्याकडे पाठविली आहे. ही हत्या राजकीय आहे. त्यांचे काही वैमनस्य होते, असे मला म्हणावयाचे नाही. पण ज्याअर्थी धमक्या येत होत्या की, "तुम्ही काम थांबविले नाही तर तुम्हाला भारी पडेल. तुमचा विचार करावा लागेल." या भाषेत धमक्या दिल्या जात होत्या, तेव्हा याचा अर्थ एकच आहे की, तुम्ही काम थांबवा नाहीतर तुम्हाला संपवू." अशा प्रकारे धमक्या दिल्यानंतर जयेंद्र हजारे आपल्या प्राणाला मुकले आहेत. त्याच दिवशी संध्याकाळी 5.00 वाजता येथे माननीय उप मुख्यमंत्र्यानी निवेदन केले होते आणि रात्री अशी परिस्थिती निर्माण झाली. याठिकाणी असे आश्वासन दिले होते की, कोणत्याही परिस्थितीत कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडणार नाही. कोणाचीही दहशत चालू दिली जाणार नाही. अशा प्रकारचे आश्वासन याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री देतात आणि ते आकाशवाणी,दूरदर्शनच्या माध्यमातून प्रसारीत होते आणि त्यानंतर रात्री ही घटना घडते. याचा असा अर्थ होतो की, शासन नावाची यंत्रणा शिल्लक नाही. शासनाचा कुठेही दबदबा शिल्लक राहीलेला नाही. पोलिसांचे कोणालाही भय वाटत नाही. कोणताही अपराध करावा, माणसांचे जीव घ्यावेत आणि कायद्याला आपण घाबरत नाही असे सिध्द करुन दाखवावे हा त्यामागचा उद्देश असतो. काल निवडणुकीचा दिवस होता आणि त्यादिवशी मी नवी मुंबईमध्ये होतो. पण नवी मुंबईतील जे चित्र माझ्यासमोर

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

आले, ते पाहिल्यावर मला कळेना. राष्ट्रवादीचे सर्व कार्यकर्ते ज्या तब्येतीने, ज्या मोकळेपणाने, ज्या बिनधास्तपणे फिरत होते, ते पाहिल्यावर असे वाटले की, त्यांना कोणाची भीती वाटत नव्हती. याचा अर्थ पोलिसांचा वरदहस्त त्यांच्या पाठिमागे होता. हे सर्व पाहिल्यानंतर हे पोलीस दल राष्ट्रवादीचेच पोलीस दल म्हणून काम करीत आहे का ? हे लक्षात येईना. त्याठिकाणी दुस-या एका वॉर्डातून श्री.विजय चौगुले नावाचा उमेदवार उभा होता. तो स्वत: कुविख्यात गुंड आहे. त्याच्या विरुध्द ब-याच केसेस पोलीस स्टेशनमध्ये दाखल आहेत. असे असताना तो दुस-या वॉर्डमध्ये गेला आणि तेथील एका बुथमध्ये शिरला व तेथील लोकांना सांगितले की, तुम्ही सर्वांनी बाहेर जा. अशा वेळी याठिकाणी बुथ कॅपचरिंगसारख्या प्रसंग निर्माण होणार आहे, असे आमच्या लोकांना वाटले. म्हणून आमचे लोक पोलीस स्टेशनमध्ये गेले आणि त्यांना सांगितले की, याठिकाणी असा-असा प्रकार घडलेला आहे आणि या लोकांना अटक करण्याची आवश्यकता आहे. पण प्रत्यक्षात मात्र श्री.विजय चौगुले याला अटक होण्याऐवजी आमचा एक कार्यकर्ता श्री.मिलिंद जाधव यालाच अटक करण्यात आली. म्हणजे एखाद्याच्या घरात चोरी करण्यासाठी चोर शिरल्यानंतर, त्याने "चोर चोर" असा आरडाओरडा केल्यावर, जे चोरी करण्यासाठी आलेले आहेत, त्यांच्यामागे पोलिसांनी जाण्याऐवजी ज्याने "चोर चोर" म्हणून आरडाओरडा केला, त्याच्याच मागे पोलीस लागले. असा अजब प्रकार पोलीस खात्यात दिसू लागलेला आहे. मी स्वत: तेथे सर्व लोकांना जाऊन भेटलो. तेव्हा असे कळले की, या भागाचे पोलीस उप आयुक्त श्री.साहेबराव पाटील, हे तेथील कार्यालयात बसलेले आहेत. ते तुम्हाला तेथेच भेटतील. मग मी त्यांच्याकडे गेलो. तेव्हा तेथे एक महिला रडत होती. मी विचारले की, आपण का रडत आहात ? तर ती महिला म्हणाली की, आमच्या बाजूच्या वार्डमध्ये उभे असलेले श्री.धर्माजी पाटील, यांचा मुलगा श्री.प्रशांत पाटील याने मला मारझोड केली. तिचा चेहरा लाल झाला होता.

**सभापतीस्थानी- मा.उप सभापती**

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू..

ती बाई रडकुंडीला आलेली होती. त्या तीन-चार महिला माझ्याकडे आल्या आणि केस नोंदवून घेण्यास पोलिसांना तुम्ही सांगा अशा म्हणाल्या. त्यावर मी उपायुक्तांकडे गेलो आणि त्यांना विचारले की, महिलांना या राज्यात सुरक्षितता नाही काय ? त्यावर काय झाले, असे त्यांनी विचारले. त्यावर मी सांगितले की, रबाळे पोलीस स्टेशनमध्ये पोलिसांनी या महिलांची केस नोंदवून घेतली नाही, उलट त्यांना बाहेर जाऊन उभ्या रहा, असे सांगितले, ही भयानक परिस्थिती आहें असे श्री. साहेबराव पाटलांना सांगून निवडणूक याच पध्दतीने पार पाडायची आहे काय,अशी विचारणा करून, तशी पार पाडायची असेल तर तसे सांगा, आम्ही परत जातो, कायदा व सुव्यवस्था पाहून कायदेशीर जे काही करायचे असेल तेही आम्ही करतो, आमच्या कार्यकर्त्यांनाही ते सांगतो,अन्यथा आम्हाला त्याच मार्गाने जावे लागेल, असे सांगितले. त्यावर त्यांनी सांगितले की, आपण असे काही करू नका. ताबडतोब त्या महिलेची त्यांनी तक्रार नोंदवून घ्यायला सांगितली. हे झाल्यानंतर लगेचच त्या महिलेकडे मिडियावाले गेले आणि त्यांनी काय झाले, ते आम्हाला सांगा असे त्या महिलेला सांगितल्यानंतर त्या महिलेने मिडीयाला काही सांगितले नाही. तिने एवढेच सांगितले की, मला जे काही सांगायचे होते ते पोलिसांना मी सांगितलेले आहे, याउपर मला काही सांगायचे नाही. ती महिला प्रसिध्दी माध्यमापासून दूर राहिली, त्याबद्दल मला तिचे कौतुक वाटले. त्यानंतर दुसरी कार्यकर्ती महिला मिडीयाला सामोरी गेली आणि तिने जी परिस्थिती पाहिली ती त्यांना सांगितली. मिडियाने ती बातमी दाखविली की नाही, मला माहीत नाही कारण मी स्वत: ते पाहिले नाही. माझ्याकडे मिडीयावाले आले आणि त्यांनी माझी याबाबतची प्रतिक्रिया विचारली. मी प्रतिक्रिया सांगितली, लपविण्याचा प्रश्नच नव्हता. तेथून आम्ही निघालो आणि दुसऱ्या ठिकाणी गेलो. एका रांगेमधील एका टोकाला पोलीस कॉस्टेबल श्री.वाघमारे उभे होते. ते ओळखपत्र पहात होते. शिवसेना-भाजपचे कार्यकर्ते त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांना ते सांगत होते की, तुमच्याकडील कागदपत्रे बरोबर नाहीत, ती व्यवस्थित घेऊन या. परंतु राष्ट्रवादीचे कोणीही कार्यकर्ते आले तर त्यांना मतदान केंद्रापर्यन्त पोहोचवत होते. याबाबत त्या पोलीस कॉन्स्टेबलचे नाव आणि बक्कल नंबर डी.एस.पीं.ना दिला आणि पोलीस यंत्रणेकडून हे असे घडते, याचे जिवंत उदाहरण दिले. तेवढे करूनही हा प्रकार थांबला नाही. एका ठिकाणी लोकांना नोटा वाटल्या जात होत्या. पोलीस बाजूलाच उभें होते. रांगेमधील लोकांना नोटा वाटल्या जात

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू...

होत्या, याचे चित्रिकरण झालेले आहे. यासंबंधी देखील पोलिसांना माहिती दिली गेली. परंतु पोलिसांनी नोटा वाटणाऱ्यांना पकडले नाही, त्यांना तेथून जाऊ देण्याची संधी दिली. दुसऱ्या बाजूला शिवसेनेचे कार्यकर्ते होते, राष्ट्रवादीचे कार्यतकर्ते उभे होते. त्यांना सगळ्यांना तेथून जाण्यास सांगितले आणि लगेचच त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या शिवेसेच्याच कार्यकर्त्यांवर पोलिसांनी लाठीमार केला. कार्यकर्त्यांच्या पाठीवर लाठीचे वळ उठेपर्यन्त पोलिसांनी त्यांना मारले. दुसरीकडे शिवसेनेच्याच कार्यकर्त्यांना इन्स्पेक्टर "बाबा इकडे ये", म्हणून बोलवून घ्यायचे, त्याची नावे विचारून घ्यायचे आणि त्यांच्याकडे असलेली कागदपत्रे पहायचे आणि दुसरीकडे त्या कार्यकर्त्यांना नेवून दहा-बारा पोलिसांच्या घोळक्यामध्ये सोडायचे आणि अक्षरश: जनाववरासारखे त्याला सगळयांनी मारायचे आणि पुढे त्याला बंद करण्यासाठी धेऊन जायचे. याबाबत मी पुन्हा डी एस पी श्री.पाटील यांच्याकडे गेलो आणि त्यांना ए.पी.आय. श्री.रवी चौधर आणि पोलीस कॉन्स्टेबल श्री.वाघमारे यांच्याबाबत सांगितले असता, त्यांनी सांगितले की,

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार... 15:40

श्री. मधुकर सरपोतदार...

त्या अधिका-याची शुगर 400 पर्यंत वाढलेली होती. त्या पोलीस अधिका-याची शुगर वाढली तर हा दुस-यांचा जीव घेईल काय? म्हणजे "Medically, he seems to be unfit person". 400 शुगर वाढलेली असतांना माणसच्या डोकयाचे असे काही झाले, आणि तो कुणाला पकडून झोडायला लागला, जनावरासारखे मारायला लागला तर हे कुठल्या कायदा व सुव्यवस्थेत बसते? त्याने काही गबडबड केली असती, कोणावर हल्ला केला असता, काही वाईट गोष्ट केली असती, कोणते अनधिकृत काम केले होते, बेकायदेशीर कृत्य केले होते म्हणून त्याला पकडून नेले आणि नंतर त्याला झोडले तर मी एक वेळ समजू शकलो असतो. पण ज्यांने काही केलेच नाही अशा माणसाला तूमचे पोलीस नेतात आणि त्याला झोडतात . त्याने त्याच्या अंगावरचे शर्ट काढून आम्हाला दाखविले की, हे बधा माझी काय परिस्थिती झालेली आहे? याला काय म्हणायचे? आम्ही डी.सी.पी.ना विचारले, का हो, "Is this justified?". योग्य असेल तर सांगा की, पोलिसांनी केलेले हे कृत्य योग्य आहे आणि नसेल तर मान्य करा की हे अयोग्य आहे. त्यांनी ते मान्य केले. असे व्हायला नको होते. त्या वेळेला मी विचारले की, याबाबतीत तुम्ही काय करणार आहात? त्यानी सांगितले की, डिपार्टमेंटली जी काही आवश्यक कारवाई आहे ती आम्ही करु, असे त्या साहेबराव पाटील यांनी सांगितले. आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि सांगितले की, तुम्ही तुमच्या पध्दतीने कारवाई करा. आम्ही आमच्या पध्दतीने पुढे जातो. आम्ही त्याला मेडिकल चाचणीसाठी पाठविला होता. पुढे त्या मुलाला ॲडमिट केलेले आहे. कुठलेही कारण नाही. केवळ झोडायचे असे यामध्ये एकंदर दृश्य दिसते ते असे की, मंत्रिमहोदय, आपण मघाशी येथे नव्हतात. मी मघाशी उल्लेख केला, म्हणून मला सांगायचे आहे की, हे पोलीस राष्ट्रवादीचे कार्यकर्ते म्हणून काम करीत नाहीत. They are not active workers of Nationalist Congress Party as such. They are police. To that extent, they should be impartial. असे आमचे अतिशय स्पष्ट मत आहे. जो कायदा तोडतो त्याला जरुर सजा करा. त्याच्यावर जी काही कारवाई करावयाची आहे ती करा. पण ज्याचा कायदा तोडण्याशी संबंध नाही पण केवळ तुम्हाला आवडत नाही म्हणून तुम्ही त्याला धरुन न्यायचे आणि त्याला जनावरासारखे झोडायचे हे कधीही योग्य नाही. असे कधीही घडता कामा नये. आणि असे जर पोलीस करीत असतील तर हे पोलीस

..L2

श्री. मधुकर सरपोतदार...

पोलिसांचे काम न करता कुणाचे तरी पक्षाचे पक्षपातीपणाने काम करतात असा त्यातून अर्थ निघतो आणि यातून खूप वाईट मेसेज या सगळया प्रकरणातून बाहेर जातो हे सुध्दा विसरुन चालणार नाही. आम्ही त्यानंतर पुढे चौकशी केली. एका ठिकाणी तर आमच्या कार्यालयातून आलेली माणसे रस्त्यावर उभी होती. काही माणसे कार्यालयात बसलेली होती. हे पोलीस तेथे गेले आणि त्या माणसांना पकडून घेऊन गेले व त्यांना बंद करुन टाकले. कलम 144 हे रस्त्यावर उभ्या असणा-या व्यक्तींसाठी लागू असते. कोणाच्या घरात बसलेल्या व्यक्तींसाठी कलम 144 लागू होते काय? कलम 144 ची व्याख्या काय आहे? हे कलम 144 कुठे लागते, ते कोणासाठी आहे त्याची ज्युरिडिक्शन काय आहे या सगळया गोष्टीचा विचार न करता अशा पध्दतीने काही माणसांना पकडून नेले आणि पोलीस स्टेशनमध्ये बंद केले. मी असे म्हणत नाही की, केवळ आमच्याच पक्षाची माणसे बंद केली. निरनिराळया पक्षाची जी माणसे मिळाली त्या गसळया माणसांना पकडून नोऊन पोलीस स्टेशनला बंद केले. पोलीस स्टेशनला बंद करण्याबद्दल आमचा आक्षेप नाही. आक्षेप आहे तो मारझोड करण्या बद्दल. कोणता गुन्हा केला होता, म्हणून त्यांना मारझोड करण्यात आली? याचे उत्तर देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, एवढे सगळे प्रकार मी आज रेकॉर्डवर आणलेले आहेत. खूप गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. मी एका ठिकाणी गेलो असता योगायोग असा की, माझ्या समोर मंत्रिमहोदय,श्री.गणेश नाईक आले. मला म्हणाले दादा येथे असे काही नाही. सगळया बाजूने पोलिसांचा घेराव होता. तेथे मोठी गर्दी जमली होती. ते मला म्हणाले सगळया माणसांना पोलिसांनी बंद केले आहे. ना तुमची तक्रार ना आमची तक्रार. पोलिसांना काय अधिकार आहे त्या सगळया लोकांना बसमध्ये बंद करुन घेऊन जाण्याचा. श्री. गणेश नाईक त्या बसमध्ये गेले आणि त्या बसमध्ये जी माणसे बसलेली होती त्यांना म्हणाले तुम्ही बाहेर पडा.त्यावेळेला तेथे जे पोलीस ऑफिसर होते ते भडकले. ते म्हणाले आम्ही ज्या लोकांना बसमध्ये बंद केले त्यांना बाहेर सोडण्याचा तुम्हाला अधिकार पोहचत नाही. त्या पोलीस ऑफिसरचे म्हणणे बरोबर होते. मी त्यांना सांगितले. मी त्या पोलीस ऑफिसरचे नांव सांगतो. मला ते पोलीस ऑफिसर माहीत आहेत. त्या पोलीस ऑफिसरची काही चूक नव्हती.पण ते इतके वैतागले होते की, इथून फोन, तेथून फोन, त्यामुळे चारही बाजूने सगळे टेन्शन होते. त्यामुळे ते पोलीस ऑफिसर भडकले होते.

..L3..



SMT/ SBT/ MHM/ 15:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

मी त्यांना म्हटले, ज्यांनी कुणी या लोकांना बाहेर सोडले त्यांना आपण जरुर बोला. माझा याच्याशी काहीही संबंध नाही. मी आतच या ठिकाणी तुमच्या समोरच आलेलो आहे, येथे येऊन मला दोन मिनिटे सुध्दा झालेली नाहीत. एवढयात मी त्या बसमध्ये जाऊन त्या माणसांना सोडलेले नाही. असे पुष्कळ  प्रकार मुंबईमध्ये घडलेले आहेत. ज्याला तुम्ही कायदा व सुव्यवस्था म्हणतात ती सांभाळण्याची जबाबदारी सगळयांची आहे. मी असे म्हणत नाही की, केवळ ती पोलिसांची जबाबदारी आहे. नागरिकांनी सुध्दा सहकार्य केले पाहिजे. पक्षकार्यकर्त्यांनी सुध्दा सहकार्य केले पाहिजे आणि. जे कोणी अशा प्रकारे वागत असतील त्यांना प्रसंगी जर पोलिसांनी पकडले तर त्यांना पकडू दिले पाहिजे, असेच माझे मत आहे. पण काल जे चित्र दिसले ते भयानक होते. तेथील निवडणुकीचा काय रिझल्ट लागला यासंबंधात मी चौकशी केली नाही. रिझल्ट काहीही लागो तो प्रश्न महत्वाचा नाही. पण ज्या पध्दतीने निवडणुका होऊ पाहतात त्या पध्दतीने आपल्या महाराष्ट्राचा काय बिहार होऊ द्यायचा आहे? मंत्रिमहोदय नेहमी असे बोलतात की, "महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था खूप चांगली राहील" अनेक प्रकरणांच्यावेळी मंत्रिमहोदयांनी ही भाषा वापरली आहे. अय्यर प्रकरण झाले त्यावेळी टी.व्ही. वरील आपल्या मुलाखतीत तुमच्या बोलण्यात असे शब्द आले होते की, "चिरडून टाकू आम्ही एकएकाला."

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

आता चिरडून टाकण्याची भाषा आमचे गृहमंत्री बोलत असतील तर ते भयानक आहे. गृहमंत्र्यांचे काम हे कायदा व सुव्यवस्था चिरडण्याचे नाही. जर कोणी कायदा व सुव्यवस्था तोडण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांना आम्ही ठिकाणावर आणू असे त्यांनी म्हणावयास पाहिजे. पण माणसाला, कार्यकर्त्याला चिरडून टाकू असे म्हटले तर तुम्हीही एका पक्षाचे कार्यकर्ते आहात. आज आपण गृहमंत्री आहात. उद्या कदाचित तुम्ही साधे आमदार म्हणून असू शकाल. असाही प्रसंग येईल. दुसरा गृहमंत्री येईल त्यांनी जर असे म्हटले की, श्री. आर. आर. पाटील, आम्ही तुम्हाला बघून घेऊन आणि तुमच्या सगळया कार्यकर्त्यांना चिरडून टाकू ...

**उप सभापती** : ते कधी तरी मुख्यमंत्री सुध्दा असू शकतील.

श्री. मधुकर सरपोतदार : असू शकतील. कोण नाही म्हणतो ? सभापती महोदय, आज आपण त्या ठिकाणी बसला आहात पण उद्या आपण कोठे असाल हे आज सांगू शकत नाही.

**उप सभापती** : कोठे म्हणजे चांगल्या ठिकाणी असेन.

श्री. मधुकर सरपोतदार : मी आज चांगल्या ठिकाणाहून बोलत आहे. मी मागे सुध्दा आपल्याला म्हणालो होतो. ज्यावेळी सगळे सदस्य निवडून आले होते त्यावेळी मी म्हणालो होतो की, श्री. डावखरे साहेब, तुम्हाला मंत्रिमंडळामध्ये जाण्याची संधी आहे ती संधी सोडू नका. पण तुमचा नंबर लागला नाही. मी समजू शकतो. तुमच्यासारखी माणसे चांगल्या पदावर जावीत असे मला वाटते. पण जो चांगल्या पदावर गेला त्याने त्या चांगल्या पदाला चांगला न्याय दिला पाहिजे असे माझे म्हणणे आहे. एखादा ज्या पदावर गेला त्या पदावर अन्याय करुन चालणार नाही. त्या पदाला न्याय दिला पाहिजे. मला मुद्दाम माननीय श्री. आर. आर. पाटील यांना सांगावयाचे आहे. आज हा विषय आला आणि आपण समोर उपस्थित आहात म्हणून बोलण्याची संधी मिळाली. मध्ये एक विषय आला होता पण तो विषय निराळया संदर्भात होता त्यामुळे मी त्यावर जास्त भाष्य करीत नाही. सन्माननीय श्री. आर. आर. पाटील यांचे मी अभिनंदन केले आहे. तुमच्याबद्दल माझे जे मत आहे ते मी मांडले आहे पण त्याचा अर्थ सत्तेची खुर्ची मिळाली की, जिभेचा लगाम सुटला असे होता कामा नये. माणसाचा जिभेवर कंट्रोल ठेऊन काही न बोलता जो दरारा निर्माण होतो त्या दराऱ्याला खूप महत्व आहे. गृहमंत्र्यांची खुर्ची तर अशी आहे की, तुमच्या नजरेचा धाक असावयास

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्री. मधुकर सरपोतदार ....

पाहिजे. गृहमंत्री आला म्हटल्यानंतर धाक निर्माण व्हावयास पाहिजे. मला तो जमाना आठवतो. ब्रिटीश काळामध्ये एखादा सार्जंट रस्त्यावरुन चालत असताना ताबडतोब जनता आपोआप बाजूला व्हावयाची. आज पोलीस कमिशनर जरी चालला असला तरी कोण चालला आहे याबाबत कोणी चौकशी करीत नाही. कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती इतकी डिटोरियेट का झाली, इतकी का खालावली ? त्याला काही कारणे आहेत. त्यातील एकमेव कारण म्हणजे माणसाचे हात स्वच्छ नाहीत. ज्याचे हात स्वच्छ आहेत, ज्याचे चारित्र्य स्वच्छ आहे, ज्यांची वर्तणूक स्वच्छ आहे अशा माणसाचा समाजामध्ये दरारा, वचक जरुर राहतो. माननीय श्री. आर. आर. पाटील साहेब, आपल्याकडून ती अपेक्षा आहे. बोलण्यापेक्षा कृती तुम्ही करुन दाखवा आणि सांगा की मी अमूक गोष्ट करीनच. बोलण्यामुळे अनेक प्रकारचे गैरसमज निर्माण होतात. परवा आपण सदनामध्ये सांगितले की कशाही परिस्थितीमध्ये कायदा व सुव्यवस्था राहील. आपण असे 8 तारखेला बोलला आणि 8 तारखेलाच रात्री एक हिंसा होते, एक खून होतो, एका निरपराध माणसाला त्याच्या स्वत:च्या घराबाहेर मारले जाते. ही कायदा व सुव्यवस्थेची शोकांतिका आहे. त्याला दुसरे काहीही नाव देता येणार नाही. पोलीस तेच, यंत्रणा तीच, सगळी परिस्थिती तीच आणि कायदा मोडणारी माणसेही तीच आहे. त्यांचे आरोपपत्र माझ्याकडे आहे. आज ही चर्चा घेता येईल हे माहीत नव्हते. त्या ठिकाणी श्री. श्याम गायकवाड असोत किंवा अन्य कोणी गुन्हेगार असो, त्यांची संपूर्ण कुंडली माझ्याकडे आलेली आहे. सुरुवातीला मी बोललो. नवी मुंबईमध्ये सुध्दा असा प्रकार घडला. श्री. दिलीप म्हात्रे यांच्यावर हल्ला झाला. त्या हल्ला करणाऱ्या माणसांची नावे दिली गेली. त्या माणसांपैकी एक नवरा व त्यांची पत्नी हे दोघेही राष्ट्रवादीचे उमेदवार होते. कदाचित ते निवडून आले असतील. निकालाबाबत काय झाले मला माहीत नाही. पण ते आरोपी होते. त्यांच्यावर कलम 307 खाली आरोप होता. दोन दिवस त्यांना अटक केली नाही. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांनी वकील केला. ते कोर्टात गेले आणि कलम 307 खालची केस बदलून त्यांनी कलम 326 ची केस करुन घेतली आणि त्या कोर्टाच्या मॅजिस्ट्रटने त्यांना जामीन दिला. त्या मॅजिस्ट्रेटला हा अधिकार कोठून आला हे मला माहीत नाही. कारण कोणतीही कलम 326 ची केस असेल तर त्याला सत्र न्यायालयामध्ये जावे लागते. त्याशिवाय जामीन मिळत नाही. महिनोमहिने असे आरोपी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्री. मधुकर सरपोतदार ....

अनेक ठिकाणी तुरुंगामध्ये रखडलेले असतात परंतु यांना जामीन मिळाला. हा श्री. श्याम गायकवाड परवाच्या प्रकरणामध्ये एक नंबरचा आरोपी आहे. काल श्री. श्याम गायकवाड अंबरनाथमध्ये फिरुन लोकांना मतदान करावयास सांगत होता. आरोपी असताना मोकळेपणाने फिरत होता. ते खरोखरच आरोपी सिध्द होतील की नाही ही गोष्ट अगदी नंतरची आहे. तो चौकशीचा प्रश्न आहे. पण श्री. श्याम गायकवाड हा आरोपी नंबर एक आहे ही गोष्ट मला माहीत आहे. असे असताना अंबरनाथमध्ये तो खुलेआम फिरतो, पोलिसांसमोर फिरतो आणि कायदा त्याच्यावर काही करु शकत नाही. आदल्या दिवशी ज्याचा खून केला त्यातील एक आरोपी दुसऱ्या दिवशी निवडणुकीचा प्रचार करीत फिरतो हे दृश्य भयावह आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्यासमोर प्रश्न आहे की, सगळी परिस्थिती हाताळायची कशी आणि ती हाताळण्यासाठी आपण सक्षम यंत्रणा उभी करु शकतो काय ? याचे उत्तर शोधावयाचे आहे. काल नवी मुंबईला पोलिसांनी बोगस ओळखपत्रे, बोगस रेशन कार्ड तयार करणारी टोळीच्या टोळी पकडली आहे. तुम्हाला त्याची माहिती मिळाली असेल. अशी किती ओळखपत्रे बाहेर गेली, किती रेशन कार्डे बाहेर गेली आणि किती बांगलादेशीय किंवा अन्य उमेदवार आल्यानंतर त्यांनी मतदान केले हे आम्हाला माहीत नाही. तेथे आणखी मतदार आले आणि त्यांनी मतदान केले आहे. याचा अर्थ असा आहे की, बोगस गोष्टींवर निवडणुका जिंकू इच्छिता काय ? बांगलादेशी मतदारांच्या साहाय्याने आपण निवडणुका जिंकू शकणार काय ? अशाप्रकारच्या असंस्कृत लोकांना प्रोत्साहन देऊन समाजकंटकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या माध्यमातून निवडणुका जिंकण्याचा इरादा आहे काय ? शेवटी निवडणूक हे एक माध्यम आहे ते केवळ सत्तेसाठी नाही तर एकूण कारभारासाठी आहे. तुम्ही विरोधी पक्षात असा की सत्ताधारी पक्षात असा शेवटी तुम्ही लोकप्रतिनिधी आहात. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येण्यासाठी जे मार्ग आहेत ते मार्ग देशामध्ये चोखाळले जातात याचा अर्थ असा आहे की, बिहारच्या पाठोपाठ आमची वाटचाल सुरु झाली आहे. आज बिहारची परिस्थिती काय आहे ? सगळया पक्षाचे लोकप्रतिनिधी निवडून येऊन सुध्दा तेथे राजवट येऊ शकत नाही किंवा सरकार स्थापन होऊ शकत नाही. याचे कारण एकच आहे की, जनतेचे मत दोलायमान अवस्थेमध्ये आहे. कोणाला मत द्यावे, कोणाला निवडून द्यावे असा संभ्रम जनतेच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. त्याची परिणती अशाप्रकारच्या त्रिशंकू सरकार येण्यामध्ये झाली आहे. म्हणून शासन कोणाचेही असो, आज तुमचे सरकार आहे, आनंदाची गोष्ट आहे. तुमचे शासन असण्याला आम्ही विरोध केला नाही. ज्या खूर्चीवर तुम्ही बसला आहात त्या खुर्चीला न्याय द्यावा अशी आमचे अपेक्षा आहे. आता तुम्ही नवी मुंबईत आणि अन्यत्र डान्सबार बंद केला आहे. परंतु मुंबईमध्ये खुला आहे. त्यामुळे तिकडचे लोंढे मुंबईत येत आहेत. शेवटी डान्सबार ही माणसाची कमजोरी आहे, मी त्याला दुसरा शब्द देत नाही. जे आंबट शौकिन आहेत ज्यांना आयुष्यामध्ये रस नाही अशा माणसांचे लोंढेच्या लोंढे तिकडे जातात. समाजाची एकूण कल्पना आहे की, अशी पुष्कळ माणसे राजकारणी लोकांच्या पाठीमागे फिरतात. मी कोणाचेही नाव घेऊ इच्छित नाही. परंतु ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही यासंबंधी निर्णय घेताना असा पार्शल निर्णय का घेतला ?

2....

NTK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार....

संपूर्ण महाराष्ट्रात ज्या ज्याठिकाणी डान्सबार आहेत, जे जे आपल्या संस्कृतीवर हल्ला करतात, जे जे आपल्या मुलींचे जीवन बरबाद करण्याच्या पाठीमागे आहेत आणि जे जे या माध्यमातून पैसे मिळवून स्वत: ऐष आरामात जीवन जगण्याच्या प्रयत्नात आहेत. त्या सगळयांचा बंदोबस्त करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर डान्सबार नाही. नो मोअर डान्सबार अशाप्रकारचा निर्णय घेतला असता तर या सगळया लोकांची गोची झाली असती. त्याचा परिणाम असा झाला की, तो मनजित सिंग स्टेटमेंट करतो आणि ते वाचून आश्चर्य वाटते. 12 कोटी रुपयांची त्यांच्याकडून आम्हाला ऑफर होती आणि आम्ही 12 कोटी रुपये श्री.आर.आर.पाटील यांना दिले नाहीत म्हणून आमच्यावर हे सर्व गंडांतर आले असे त्यांची संघटना चालविणारा एक माणूस करतो. हे पण योग्य नाही. असे जर असेल तर त्याचा खुलासा होण्याची आवश्यकता आहे. कोण तो मनजित सिंग ? तो आमच्या गृहमंत्र्यांवर कसल्या बळावर आरोप करण्याचे धाडस करतो ? शेवटी महाराष्ट्राला एक प्रतिष्ठा आहे. संपूर्ण राज्य देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. आपल्या राज्याकडे अशा दृष्टीकोनातून पाहिले जाते आणि या राज्याच्या आमच्या गृहमंत्र्यांवर, उपमुख्यमंत्र्यांवर अशाप्रकारचे घाणेरडे आरोप करीत असेल तर त्यावेळेसच त्याची पोलीस चौकशी होऊन खरे काय आणि खोटे काय हे जनतेसमोर येण्याची आवश्यकता होती. परंतु हे घडत नाही. आता त्यांच्यात फूट पडली आहे. त्यांच्यापैकी ठाण्यातील त्याच्या विरोधामध्ये गेले आहेत. जे काय असेल ते पण तो विषय नाही. परंतु कायदा व सुव्यवस्था का बिघडते याच्या पाठीमागे हे कारण आहे. जोपर्यंत या कारणांचा बंदोबस्त करीत नाही तोपर्यंत आपल्याला कधीही सुटकेचा नि:श्वास टाकता येणार नाही. शांतपणे जीवन जगता येणार नाही. सर्वसामान्य जनतेला भीतीयुक्त व धमकीच्या वातावरणामध्ये जीवन जगावे लागेल हे अतिशय भयावह आहे. आज सकाळी सगळे कामकाज रद्द करावे आणि या विषयाची चर्चा घ्यावी अशी मागणी केली होती ? प्रश्नोत्तराचा तास रद्द करावा, संपूर्ण कामकाज रद्द करावे हे सांगण्याची हौस नाही. परंतु हया कालच्या घटना घडल्या आहेत त्या नजरेसमोर आहेत, ती सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर म्हणून या सदनाच्या माध्यमातून तरी याला न्याय मिळविण्याचा प्रयत्न करु या.

नंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

(श्री. मधुकर सरपोतदार पुढे सुरु...)

मा. मुख्यमंत्र्यांना, मा. उपमुख्यमंत्र्यांना येथे बोलवा. पण तुमच्यामध्येच आपसात कलगीतुरे होत असतात आणि त्यामुळे जनमाणसावर त्याचे परिणाम होतात आणि त्यामुळे गुंडाना प्रोत्साहन मिळते. समाजविघात प्रवृत्तीची माणसे त्याचा गैरफायदा घेतात आणि त्यातून हे सारे संघर्ष निर्माण होतात. या निमित्ताने आपणाला एवढेच सांगावयाचे आहे की, पोलिसांनी त्याठिकाणी ज्यापध्दतीने प्रकरण हाताळले ती कृती अतिशय गंभीर आहे. पोलिसांनी एकाच बाजूने संयम बाळगला. त्या ठिकाणी राष्ट्रवादीच्या कायकर्त्यांच्या बाबतीत पोलिसांची खूप नरमाईची भूमिका घेतली होती. मघाशी मी उल्लेख केल्या प्रमाणे पोलीस हे राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते म्हणून फिरत होते, प्रचार करीत होते, कुणाला मतदान करायचे, कुणाला करायचे नाही हे पोलीस सांगत होते. कार्डाची तपासणी करायला गेले तर त्याला सांगायचे की, तू येथून निघून जाता, नाही तर तुला बंद करीन. अशा प्रकारे पोलीस कार्यकर्त्यांना धमक्या देत होते. तेथील कार्यकर्त्यांना ज्या पध्दतीने दामटले गेले ते ऐकल्यानंतर खूप आश्चर्य वाटले. निवडणुकामध्ये कोण जिंकतो तर कोण हरतो. या निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये आपण सर्व जण काम करतो. निवडणुकीमध्ये अपयश आले म्हणून कोणी काम सोडून जात नाही आणि यश मिळाले म्हणून कोणाला इतका उन्माद चढत नाही. परंतु पोलीसच जर सर्वसामान्य जनतेवर अशा प्रकारे धाकदपटशा आणि जुलूम करीत असतील तर ती जनतेची आणि या लोकशाहीची शोकांतिका आहे. मी माझ्या भाषणामध्ये सगळया आरोपिंची नावे सांगितलेली आहे. चॉपर, दंडुके यांचा कोणी कोणी आणि कसा वापर केला हे मी स्पष्ट केलेले आहे. दोन दिवसापूर्वी कालच्या निवडणुकीच्या घटनेच्या वेळी लातूर जिल्हयाचे प्रमुख श्री.व्यंकटेश पंडाळे याला काही कारण नसताना पोलिसांना बेदम झोडले. आमच्या पक्षाचे ते एक पदाधिकारी. त्यांच्यावर पक्षाने संपूर्ण जिल्ह्याची जबाबदारी सोपविलेली आहे. त्या आमच्या कार्यकर्त्याला पोलिसांनी अकारण झ ोडले. हा काय प्रकार आहे ? अशा प्रकारे झोडण्याचा अधिकारी पोलिसांना कोणी दिला? कोणत्या सेक्शनखाली हे पोलीस अशा प्रकारची बेदम मारहाण करतात ? कोणत्या गुन्ह्याखाली ते सजा देतात? हे अधिकारी पोलिसांना कोणी दिलेले आहेत ? पोलिसांच्या बाबतीत ह्याच तक्रारी असतात की, ते कोणालाही केव्हाही उचलून घेऊन जातात, कोणालाही पोलीस स्टेशनवर नेऊन बेदम मारहाण. अशा प्रकारचे पोलिसांचे वर्तन फार भयानक आहे. अशा प्रकारे

..2..

(श्री. मधुकर सरपोतदार पुढे सुरु...)

वर्तन करण्याचे अधिकार पोलिसांना कोणी दिले ? पोलिसांचे अनेक प्रश्न आणि व्यथा आहेत. आपण याठिकाणी तो विषय चर्चेला आणलात तर त्यांचे सर्व प्रश्न आम्ही मांडू. परंतु राज्याच्या पोलिसांच्या एकंदर वर्तणुकीबद्दल तपास करण्याची आवश्यकता आहे, त्यांच्यावर बंधन घालण्याची आवश्यकाता आहे. शेवटी मला सांगावयाचे आहे की, याठिकाणी मा. उपमुख्यमंत्री तसेच गृहराज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे उपस्थित आहेत. आपण अनेक ठिकाणी फिरता. आपणाबद्दलही अनेक प्रकारची व्यक्तव्ये होत असतात. जे अधिकारावर येतात त्यांच्यावर टीका होते तेव्हा सत्य काय आणि असत्य काय याचा शोध घेण्याची आवश्यकता असते. असे काही घडलले नसेल तर त्याची चौकशी करुन त्याच्याशी आमचा काही संबसंध नाही, कशाच्या आधारे तुम्ही आरोप करता असे बेछूट आरोप करणा-यांना विचारले गेले पाहिजे. शेवटी तुम्ही अशा ठिकाणी बसलात की, महाराष्ट्रातील जनता तुमच्याकडे काही अपेक्षेने पहात आहे. आपण सत्तेवर आल्यामुळे महाराष्ट्रातील कारभार अतिशय चांगल्या प्रकारे होईल अशी  जनता अपेक्षा करीत आहे. आपण सत्तेवर असल्यामुळे या निवडणुका शांततेत पार पडतील, जनतेला शांततामय जीवन जगता येईल, कोणाची पिळवणूक होणार नाही, कोणी दहशतीखाली वावरणार नाही, महिलांवर अन्याय होणार नाही, असे एक नाही तर अनेक प्रश्नांच्या बाबतीत लोकांच्या तुमच्या कडून अपेक्षा आहेत आणि त्या प्रश्नांच्या बाबतीत जनतेला विश्वास देण्याचे काम पोलिसांचे आहे. परंतु आज पोलीस जबाबदारीने वागत नाहीत. कालच्या निवडणुकीमध्ये पैशाचे वाटप चाललेले असताना पोलिसांनी त्याकडे लक्ष दिले नाही, कार्डांची तपासणी करायला गेलेल्या कार्यकर्त्यांला पोलीस सांगतात की, तू येथून जातोस की नाही , नाही तर तुला बंद करीन. अशा प्रकारच्या भानगडीत पोलिसांनी पडू नये. पोलिसांनी पोलिसांचा रोल करावा. जनतेमध्ये सामंजशाची आणि निष्पक्षपातीपणा वागणूक पोलिसांनी ठेवावी अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.  याठिकाणी ज्या माध्यमातून प्रस्ताव चर्चेला आणला त्याच्या मागे हाच उद्देश आहे की, सभापती महोदय, हे सर्व प्रश्न तुमच्यापुढे यावेत आणि गृहखात्याने या घटनेची सर्व माहिती घेऊन योग्य ती कारवाई करावी आणि अशा घटनेची पुढे` पुनरावृत्ती होऊ नये. तेव्हा शासन या प्रकरणी योग्य ती कारवाई करील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...नंतर श्री.गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, कुठल्याही हिंसाचाराचे समर्थन करण्यासाठी मी उभा राहिलेलो नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी सांगितले ते गंभीर आहे. राजकीय गुन्हेगारीकणाची चर्चा या सभागृहात होणे हे अत्यंत महत्वाचे आहे. पण मी सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांना सांगू इच्छितो की, संसदीय लोकशाहीमध्ये लोक विश्वासाने मतदान करतात. कोणी स्वप्न दाखविली म्हणून स्वप्न विकणा-यांच्या मागे लोक धावत नाहीत हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. आम्ही लोकांना स्वप्न विकली म्हणून लोकांनी आम्हाला मते दिली हा जो दावा आपण केला तो धादांत असत्य आहे. राज्यातील लोकांनी सत्य परिस्थितीचा अनुभव घेऊन मतदान केले. पाच वर्षाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे जनतेने पुन्हा पाच वर्षे सत्तेची चावी आम्हाला दिली. आमच्याकडे पुन्हा सत्ता दिली हे सत्य आहे आणि ते नाकारुन चालणार नाही. मला मान्य आहे की, हिंसा, हिंसाचार हे विकासाला रोखण्याचे काम करतात. पण सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार दादा इतिहासात जाण्याची गरज आहे. अंबरनाथ, नवी मुंबई आणि बदलापूर येथे जे झाले त्या घटनांचे कोणी समर्थन करु शकत नाही. पण नरेश गायकवाडची हत्या कोणी केली ? त्यात काय राजकारण शिजले ? श्री.कुरुंजले कोण होता ? श्री.वालेकर कोण होता ? या व्यक्तींना राजकीय प्रतिष्ठा कोणी दिली ? या सर्व गोष्टींची कुठे तरी चौकशी होणार आहे की नाही ? श्री.कृष्णा देसाई पासून ते श्री. सत्यविजय भिसे पर्यन्त...

श्री. मधुकरराव सरपोतदार :सभापती महोदय, नियम 97 खाली चर्चा उपस्थित केलेली आहे आणि ती ठराविक विषयापूरती मर्यादित आहे. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्य मागच्या काळात झालेल्या हत्यांबाबतचा उल्लेख करीत आहेत. मागच्या काळातील एकही हत्येबाबतचा मी माझ्या भाषणात उल्लेख केलेला नाही. सन्माननीय सदस्यांना मागच्या काळातील हत्यांच्या संदर्भातील चर्चा करावयाची असेल तर त्यांनी त्यासंदर्भात स्वतंत्रपणे चर्चा या सभागृहात उपस्थित करावी. त्या चर्चेस उत्तर देण्याची आमची देखील तयारी आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : श्री.कृष्णा देसाई पासून ते श्री.सत्यविजय भिसे यांच्या हत्या झाल्या. या सगळयांच्या हत्येंचा इतिहास आपल्याला तपासावा लागेल. ठाणे जिल्हयापूरते बोलावयाचे झाले तर श्री. खोपकर यांची हत्त्या कोणी केली ? श्री.आनंद दिघे यांना राजकीय प्रतिष्ठा कोणी मिळवून

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...

दिली होती ? आजचे उप महापौर कोण आहेत ? "टाडा" मधला आरोपी आहे नां ? त्यांना राजकीय प्रतिष्ठा कोणी दिली ?"Those who live by sword, have to die by sword." हा इतिहास आहे. तो मी किंवा तुम्ही बदलू शकत नाही. 1947 ते 1968 पर्यन्त एकही राजकीय हत्या झाली नव्हती. श्री.कृष्णा देसाई यांची हत्त्या झाली त्यापूर्वी कधी राजकीय हत्या झाली होती काय ? झाली असेल तर मला एखादे तरी उदाहरण द्या.

डॉ. अशोक मोडक : पश्चिम महाराष्ट्रातील श्री.कृष्णा भोई यांची राजकीय हत्या पूर्वीच्या काळात झालेली आहे. ती कोणी केली ? ...

श्री. जितेंद्र आव्हाड : श्री. कृष्णा देसाई यांच्या हत्येचे पकडलेले गुन्हेगार कालांतराने शिवसेनेचे पदाधिकारी होते. श्री. दिलीप पटेल हे भारतीय विद्यार्थी सनेचे अध्यक्ष होते. श्री. चंद्रकांत वाईकर हा तुमचा शहर प्रमुख होता. त्यानंतर आता नजीकच्या काळात म्हणजेच काल डॉ.दत्ता सामंत यांच्या मारेक-यांना डेहराडून येथे पकडले. डॉ.दत्ता सामंत यांचा खून झाला . त्यांचा खून झ ााल्यानंतर दोन दिवसात मारेकरी कोल्हापूर येथे पकडले गेले. मारेकरी जेवत होते असे पोलिसांनी सांगितले. मुंबईतील 1995 ते 2000 मधील सर्वात मोठी हत्या डॉ. दत्ता सामंत यांची होती. आरोपींची नावे सांगितली गेली, आरोपींची नावे समजली होती, आपल्याला आश्चर्य वाटेल, बॉम्बे क्राईमच्या इतिहासात पहिल्यांदाच असे झाले की, एवढया मोठया गुन्हयातील आरोपी हे कोल्हापूरला जेवताना सापडले. आठ वर्षानंतर ते आरोपी परत सापडले. 1995 ते 2000 या कालावधीत हा गुन्हा दाबण्याचा प्रयत्न झाला. सदर गुन्हयांची फेर चौकशी व्हावयास पाहिजे? या घटनेमागे कोणाचे राजकीय हात होते ही बाब देखील तपासून पहावयास हवी. आपण एक्स्टॉरशनच्या गप्पा मारता. आज परिस्थिती अशी आहे की, एक्स्टॉरशनची टक्केवारी जवळ जवळ शुन्यावर आली आहे.आपण माहिती तपासून बघा. 1995 ते 2000 मध्ये काळी दिवाळी आम्ही साजरी केली नाही. व्यापा-यांनी काळी दिवाळी साजरी केली. त्यांच्यापुढे बॉम्ब पडत होते...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 16:05

श्री.जितेंद्र आव्हाड ....

ही सगळी हप्ते वसूली कोणी केली ? काळी दिवाळी कोणाच्या राजवटीत साजरी झाली होती ?

**उपसभापती** : एका अत्यंत गंभीर अशा मुद्यावर ही चर्चा उपस्थित झालेली आहे. याठिकाणी या चर्चेसाठी मा.उपमुख्यमंत्री आणि मा.गृहराज्यमंत्री स्वत: उपस्थित आहेत. माझी सदनातील सर्व मा.सदस्यांना विनंती राहील की, विषयाचे गांभीर्य ओळखून चर्चा व्हावी आणि त्याप्रमाणे सर्व सदस्यांनी वक्तव्य करावे अशाा प्रकारची मी सूचना करतो.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, काळी दिवाळी कोणी साजरी केली ? एक्स्टॉरशनचे गुन्हे 96-99 या काळामध्ये झाले. आता परिस्थिती वेगळी आहे. 97-2000 या काळात गँगवारमध्ये जेवढे मुडदे पडले जेवढे 10 टक्के आजही पडत आहेत. गँगवार संपल्यात जमा आहेत. जेवढे हजारेंबद्दल बोलले पाहिजे तेवढेच नरेश गायकवाडबद्दलही बोलले पाहिजे. मी हजारेंच्या मृत्यूचे समर्थन करीत नाही. नरेश गायकवाडला उमेदवारी देता. खोपकरांच्या हत्येतील आरोपी जिल्हा प्रमुख असतो....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, जे निवडणुकीला उभे आहेत त्यांच्यावर आरोप असते तर निवडणूक आयोगाने त्यांना निवडणुकीतून बाद केले असते. कृपा करुन अशा गोष्टी बद्दल बोलू नये. उद्या हे आपण सिध्द करु शकाल काय ? त्यांच्या अंगावर केसेस असत्या तर उमेदवारी मिळाली नसती. मा.सदस्यांनी अशा गोष्टींचा संबंध याठिकाणी आणू नये.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, गुन्हा सिध्द झाला तरच निवडणुक आयोग कारवाई करते. अन्यथा नाही. ते आरोपी आहेत अजून गुन्हा सिध्द झालेला नाही. आरोपींना राजकारणात आणून प्रतिष्ठा कोणी दिली ? गुंडगिरीला कोणी प्रोत्साहन दिले ? विजय चौगुलेच्या लहान भावाची सुनील चौगुलेची हत्या कोणी केली ? मी ठाण्याच्या बाहेर जात नाही. गेल्या 20 वर्षातील इतिहास तपासण्याची आवश्यकता आहे. ठाण्यामध्ये प्रत्येक हत्येमागील आरोपींना पोलीस स्टेशनमध्ये कोण नेत होते हे समस्त ठाणेकरांना माहीत आहे."Those who live by sword, have to die by sword" हा नियम कोणलाही चुकलेला नाही. हे पाहिले तर अत्यंत गांभीर्याने चर्चा व्हायला हवी. शब्द हे शस्त्र आहे. मुखातून बाहेर पडलेल्या शब्दामुळे कोणाला जखम झाली तर ती भरुन येत नसते. लांडयांना भारतात येऊ देणार नाही असे औरंगाबादला कोण म्हणाले ?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, संभाजीनगरला सभा झाली त्यावेळी मा.सदस्य भाषणाला उपस्थित होते काय ? वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांमधील सगळेच शब्द खरे धरणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

काय ? कुठल्याही हिंदुस्थान प्रेमी मुसलमानांनाविषय असे वक्तव्य केलेले नाही. बांगलादेशी मुसलमानांबद्दल ते वक्तव्य आहे. अशा प्रकारे चुकीचे रेकॉर्डवर राहू नये. मा.सदस्यांना समज द्यावी.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय,मा.सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सेनाप्रमुखांचे नांव घेतले नव्हते. आता मा. सदस्यांच्या वक्तव्यातून आले आहे. ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

: श्री.दिवाकर रावते:सभापती महोदय, बांगलादेशीय लांडे,देशद्रोही लांडे यांना देशातून हाकलून लावले पाहिजे या मतावर शिवसेना ठाम आहे.तेच आमचे धोरण आहे. माननीय श्री.आर.आर.पाटील एवढे कार्यक्षम गृहमंत्री आहेत तर त्यांनी बंगलादेशीय लांडयांना महाराष्ट्राच्या बाहेर काढून दाखवावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मूळ विषयावर बोलण्यास आपण सन्माननीय सदस्यांना सांगावे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी चर्चेच्या अनुषंगाने बोलावे. अन्यथा मला ही चर्चा थांबवावी लागेल.

श्री.जितेन्द्र आव्हाड : सभापती महोदय,मी सभागृहाला सांगू इच्छितो की, हा विषय चार महानगरपालिकेच्या निवडणुकीशी ंसबंधित आहे.चार महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी जी भाषणे केली होती त्यातून हिंसाचार निर्माण झाला होता . त्यामुळे अनेक लोकांच्या भावना दुखावल्या आहेत तेव्हा या भावना या ठिकाणी व्यक्त करण्याचा सन्माननीय सदस्य प्रयत्न करणारच. समोरच्या बाकावर बसलेल्या सन्माननीय सदस्यांच्या भाषणाच्या संदर्भात आम्ही बोलावयाचे नाही असे जर सांगितले तर त्यामुळे आमच्या अधिकारावर गदा येईल. नवीन मुंबईतील महानगरपालिकेची निवडणूक महत्वाची आहे तर औरंगाबाद मधील महानगरपालिकेची निवडणूक सुध्दा तितकीच महत्वाची आहे. जर या ठिकाणी हिंसाचार झाला असेल तर तो कशामुळे झाला आहे हे सुध्दा पाहिले पाहिजे.एका ठिकाणी हिंसाचार झाल्यानंतर दुस-या ठिकाणी हिंसाचार होण्याची शक्यता आहे आणि ती कशामुळे होणार आहे यासबंधी सभागृहाला माहिती करुन देणे हे मी गरजेचे समजतो. हा हिंसाचार फक्त औरंगाबाद पुरता मर्यादित नाही तर त्यातून कदाचित सपूर्ण महाराष्ट्रात पेटण्याची शक्ययता आहे.अशा गंभीर प्रश्नाकडे जर मी सभागृहाचे लक्ष वेधले नाही तर मी माझ्या कर्तव्यापासून चुकत आहे , मी माझ्या कर्तव्या पासून लांब पळत आहे असे होईल आणि ते मला मंजूर नाही. शब्द हे शस्त्र आहेत आणि आपण ते जपून वापरले पाहिजे असे मी मघाशी म्हटले होते.एका शब्दामुळे संपूर्ण परिस्थिती बिघडू शकते.हे लक्षात ठेऊन सर्वानी बोलले पाहिजे आणि हेच सर्वानीच पाळले पाहिजे. हे पाळत असताना त्यामध्ये कोणी मोठे नाही आणि कोणीही लहान नाही.सन्माननीय सदस्यांना मी सांगतो की आपले म्हणणे बरोबर आहे .

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेन्द्र आव्हाड ....

एखाद्याची हत्या झाली तर सर्वानाच वाईट वाटते. सज्यविजय भिसे यांचा 80 वर्षाचा म्हातारा बाप ज्यावेळी काठी घेऊन चालतो तेव्हा तो पोराच्या नावाने टाहो फोडत असतो.त्याचे घर त्याला विकावे लागले आहे. त्यामध्ये आपले काहीही नुकसान होत नाही आपण फक्त भाषणे करीत असतो.आपल्या घरावर पोलिसांचा बंदोबस्त असतो.परंतु गरीब कार्यकर्ते मरतात आणि त्यांच्या आईवडिलांना त्रास सहन करावा लागतो.तेव्हा मला असे सांगावयचे आहे की, गेल्या 30 वर्षात ज्या हत्या झाल्या आहेत त्याचा इतिहास आपण तपासून पहावा तसेच ज्यांच्या हत्या झाल्या आहेत त्यांच्या आई वडिलांना किती त्रासन सहन करावा लागला हा इतिहास सुध्दा आपण तपासून पहावा.ज्यांची हत्या झालेली असेल त्यांचे आई वडील आज काय करीत आहेत? आज ते कोठे आहेत ?एवढेच मी बोललेला नाही तर टी.व्ही.च्या मुलाखतीमध्ये मी हे सुध्दा सांगितले होते की, आमदारांच्या हत्या झाल्यानंतर त्यासबंधी आपण दोन तास चर्चा केली होती पंरतु त्या आमदाराची सुविद्य पत्नी आज काय करीत आहे ? याची सुध्दा पक्षांना आज आठवण होत नाही.ज्यांची हत्या झाली त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सुध्दा कोणी जात नाही तेव्हा भाषणे फक्त निवडणुकीपुरती मर्यादित ठेवली पाहिजेत. मी आपल्याला एक उदाहरण देऊ शकतो प्रेमकुमार शर्मा यांच्या पत्नी आज काय करीत आहेत हे कोणाला माहीत आहे काय ?या बाबतीत कोणी काही सांगू शकेल काय ? ते आपले साथीदार होते ना ?

श्री.मधुकर चव्हाण : प्रेमकुमार शर्मा यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीची आवश्यक ती सर्व काळजी आम्ही घेतली आहे.त्या आमदारसुध्दा होत्या. त्यांचा पूत्र आमच्या युवा मोर्चाचा अध्यक्ष आहे. वात्सल्याच्या भावनेतून त्या कुटूंबाची पूर्ण काळजी आम्ही घेतलेली आहे.त्याचबरोबर केन्द्रामध्ये आमची सत्ता असतांना अतिशय मानाच्या पदावर आम्ही त्यांना बसवलेले होते.त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष केलेले नाही.त्याचबरोबर .रामदास नायक यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी खालच्या सदनाच्या सदस्या होत्या.आमच्या कार्यकर्त्याची आम्ही चांगली काळजी घेत आहोत.

श्री.जितेन्द्र आव्हाड :गेल्या तीस वर्षात महाराष्ट्रात अनेक जणांच्या हत्या झाल्या आहेत त्यातील राजकारणाचे गणित ओळखून व खास करुन ठाणे जिल्हयाला केन्द्रबिंदू मानून जर आपण विचार केला तर बरे होईल.सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी एका चांगल्या

3...


VTG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.कानडे 16.10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेन्द्र आव्हाड.....

विषयाला आज वाचा फोडली आहे. त्या संदर्भात आम्हालासुध्दा पुष्कळ बोलता येण्यासारखे आहे.तीन महानगरपालिका व 2 नगरपालिका यांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने झालेल्या हिसांचाराबद्दल बोलत असतांना एका पक्षाने दुस-या पक्षावर केलेल्या अतिक्रमणाबद्दल या ठिकाणी बोलले गेले आहे. ठाण्यामध्ये गेली 20 वर्षे सातत्याने हेच घडत होते. त्यामागे कोणाचे आशीर्वाद होते ? हे सुध्दा माननीय गृहमंत्र्यांनी तपासून पाहिले पाहिजे.अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आव्हाड ....

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.फुंडकर यांना मी सांगू इच्छितो की, या निवडणुकांमागील इतिहास हा वेगळा आहे. विजय चौगुले त्वेषाने मैदानात का उतरतो ? कारण आपल्या सख्ख्या भावाची 6 गोळ्या मारून झालेली हत्या तो विसरू शकत नाही. श्याम गायकवाडचे यामध्ये नाव आले. परंतु हा श्याम गायकवाड खरे तर समाजवादी पठडीतील एक कार्यकर्ता, जनता दलाचा एक सुविद्य कार्यकर्ता. तो केव्हाही हत्येमध्ये सहभागी होणार नाही. एक प्रामाणिक आणि चांगला कार्यकर्ता केवळ करंजुलेला त्रस देणारा कार्यकर्ता म्हणून करंजुलेने त्याचे नाव देण्यास सांगितले आहे. परंतु श्याम गायकवाड हे करू शत नाही. त्याच्या नीतीमत्तेमध्ये ते बसत नाही. परंतु ठीक आहे. आपण श्याम गायकवाडचे नाव घेतले. परंतु नरेश गायकवाडची हत्या कोणी केली ? याचा तपास काही लागला का ? मग त्वेषाचे आणि सूडाचे राजकारण माणसाला कोठपर्यंत घेऊन जाते हे आपण या सगळ्या इतिहासातूनच शिकलेलो आहोत. त्याला हा इतिहास साक्ष आहे म्हणून या सगळ्या प्रसंगांची आठवण करीत करीत आपण महाराष्ट्र बिहारकडे नेतो आहोत असे म्हणायचे. परंतु तसे म्हणून आपण आपल्या जबाबदारीतून मुक्त होतो का ? कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी जशी पोलिसांवर आहे तशीच ती राजकीय पक्षांवर आणि सर्व सामान्य माणसांवरदेखील आहे. म्हणून या तिन्ही महानगरपालिकांमध्ये कोठे हिंसाचार झाला असेल तर त्याचे समर्थन मी करीत नाही आणि करणारही नाही. पण या हिंसाचाराला रोखण्याचा प्रयत्न करीत असतानाच गेल्या 10 वर्षातील गुन्हेगारीचे प्रमाण पाहिल्यानंतर 1995 ते 2000 मधील गुन्हेगारीकरण आणि 2006 मधील गुन्हेगारीकरण पाहता आज एक्स्टॉर्शन, खून, गँगवॉर यांचे प्रचंड कमी झालेले प्रमाण हे महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचे द्योतक आहे. अशा परिस्थितीत झालेल्या या निवडणुकांचे राजकारण करून कोठल्या पक्षाला वा पक्षनेतृत्त्वाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न आपण करीत असू तर ते आजच्या राजकारणाला वेगळी दिशा देणारे असणार आहे. म्हणून माझी या निमित्ताने सर्वच पक्षांना प्रामाणिकपणे विनंती आहे की, राजकारणाचे गुन्हेगारीकरण करण्याची जबाबदारी कोणीही टाळू शकणार नाही, टाळून चालणार नाही. परंतु याचा पूर्वेतिहास पाहण्याचीही गरज आहे. कारण सूडाच्या राजकारणाचा बळी आज जरी ते असतील तरी उद्या आम्ही सुद्धा असू शकतो. तेव्हा सूडाच्या राजकारणाची सुरूवात कोठे झाली आणि त्याचा अंत कोठे होणार आहे याचा विचार करून याची संपूर्ण जबाबदारी आपल्या अंगावर घेतली पाहिजे तरच यातून आपली सुटका होईल एवढे बोलून मी भाषण थांबवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, मला वाटते आमचे मित्र श्री.जितेंद्र आव्हाड यांनी काल दोन दिवस नवी मुंबई येथे असायला पाहिजे होते. म्हणजे मग तेथील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती कशी होती, कायदा व सुव्यवस्थेचे तेथे कसे वाटोळे झालेले होते हे त्यांना दिसले असते. अध्यक्ष महाराज, खरे तर सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना धन्यवाद द्यायचे आहेत. कारण मी सकाळी 8 वाजता एका अन्यायकारक गोष्टीसंबंधी त्यांना सांगितले असता त्यांनी 15 मिनिटांमध्ये त्याचे निरसन केले आणि शब्द दिला की, पुढे काही होणार नाही. परंतु ते गेल्यानंतर तेथे काय झाले ते मी त्यांना सांगतो. त्यापूर्वी प्रथमत: मी त्यांचे आभार मानतो. त्यांचे आभार मानण्यासाठीच खरे तर मी त्यांना फोन देखील केला होता. अध्यक्ष महाराज, मी कोणत्याही राजकीय अभिनिवेषाने बोलत नाही. परंतु आपली राजकीय लोकप्रियता आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी चाललेली धडपड कदाचित कोणाला तरी पहावत नसावी. आताच सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी उपमुख्यमंत्र्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. शेटेने धमकी दिल्यानंतर, कोण तो धमकी देणार ? सुधीर मुनगुंटीवारांनी त्याबाबत विधानसभेमध्ये एक हक्कभंगाचा प्रस्ताव आणला होता. आम्ही राजकारणाने पेटलेलो असतो तर आर.आर.पाटील यांच्या विरोधात तो ठराव होता तेव्हा आम्हाला त्याबद्दल काय करायचे आहे म्हणून गप्प बसलो असतो. आम्हीही येथे सभागृहामध्ये बोललो असतो की त्यांनी 10 कोटी रुपये घेतले म्हणून. पण आम्ही तसे काही बोललो नाही. पण एक सांगतो की, नवी मुंबईमध्ये तुमच्या कायदा आणि सुव्यवस्थेचे बारा वाजलेले होते. राजकीय अभिनिवेशाने नाही पण बिहारचे उदाहरण अशासाठी येथे दिली जात आहेत की, आज बिहारमध्ये सर्वच पक्षीयांना चिंता लागलेली आहे. तेथे उघड उघड वर्तमानपत्रातून आणि इलेक्ट्रॉनिक मिडियामधून उमेदवार, त्यांचे नेते शस्त्रास्त्रे घेऊन फिरत आहेत आणि आपण अभिमानाने सांगतो आहोत की, या महाराष्ट्रात गेल्या 30-40-50 वर्षांच्या इतिहासामध्ये एकाही निवडणूक केंद्रावर पुन्हा मतदान घेण्याची पाळी आलेली नाही. हे आपणा सगळ्यांना अभिमानास्पद आहे. पण त्याला कोठे तरी सत्तेच्या हव्यासापोटी गालबोट तर लागत नाही ना ? काँग्रेसला ही सवय आहे. ग्रामपंचायतीपासून दिल्लीपर्यात सत्ता ही आपल्याच हाती राहिली पाहिजे. एन केन मार्गाने ते साध्य आपण करू पहात आहात. आणि आता आम्हाला सांगता आहात की, महाराष्ट्रात सत्तेच्या पोटी ... काल तर तुम्ही नव्या मुंबईत सामान्य माणसाची अगतिकता विकत घेतली होती. त्या मतदाराची गरज विकत घेतली. त्याचे अज्ञान,

..... एस 3 ...



KBS/SBT/MHM. श्री. गायकवाड नंतर --- 16.15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दारिद्र्य विकत घेतले, त्याची दहशत विकत घेतली. हे सारे प्रकार नव्या मुंबईमध्ये झाले. मग काय राहिले तेथे ? कायदा व सुव्यवस्थेच्या गोष्टी करताना मागे जायचे झाले तर मी उदाहरण देऊ शकतो. मी राजकारण म्हणून हे बोलत नाही. पण महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये आयपीएस अधिकारी आमच्या राज्यामध्ये तेव्हा कधी जेलमध्ये गेलेला नाही. याची कोणी चिंता केली पाहिजे की नाही ? शर्मा, वगळ, सावंत .. ज्या जेलमध्ये, तुरुंगात दुपारी किंवा संध्याकाळी जेवण घेण्यासाठी एक थाळी आणि जर्मनची वाटी घेऊन 302 चे दरोडेखोर, लुच्चे, लफंगे, बदमाष, खिसेकापू, चोर उभे राहतात किंवा राहिले आहेत तेथेच आमचे मुंबईचे पोलीस आयुक्त जेवण घेण्यासाठी राहिले असतील ...

( यानंतर श्री. जागडे ...टी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण........

कशामुळे हे झाले आहे ? आता मागच्या इतिहासात मी जाऊ इच्छित नाही. सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये पोलिसांनीच सर्व काही हातात घेतले होते. तेरणा केंद्राजवळ श्री. सुरेश शंकर चौघुले हे कॉन्स्टेबल 680 रेशन कार्ड घेऊन उभे होते. काल निवडणूक झाली आणि कार्ड इश्यु सहा तारखेला करण्यात आली होती. मतदान केंद्रावरील अधिकारी लोकांना असे सांगत होता की, आम्हाला दुसरे कोणतेही परिचय पत्र नको. आम्हाला तुमचे पॅन कार्ड नको, आम्हाला तुमचे ड्राईव्हींग लायसन्स नको, आम्हाला तुमचे आयकार्ड नको. फक्त आम्हाला रेशन कार्डच पाहिजे. वॉर्ड क्र. 83 व 88 मधील तसेच कोपरखैराणे, तुर्भे येथील मतदान केंद्रावरील सर्व अधिकारी हेच सांगत होते. सभापती महोदय, त्या ठिकाणचे सर्वच पोलीस अधिकारी बदमाश होते, असे मी मानीत नाही. सभापती महोदय, मा. आर. आर. पाटील यांनी विजय कांबळे यांना आदेश दिल्यानंतरही त्यांची अंमलबजावणी तीन वाजता झाली. नेरुळचे पोलीस अधिकारी श्री. हांडे यांनी असे सांगितले की, गृहमंत्री राज्याचे असतील, माझ्या भागातील मी गृहमंत्री आहे. आपला सिनीयर इन्स्पेक्टर अशा प्रकारे बोलण्याची हिम्मत करीत आहे. मी त्याला असे सांगितले की, सकाळी श्री.आर.आर.पाटील यांनी जे निर्दोष आहेत, त्यांना सोडण्याचे आश्वासन दिले आहे. आयुक्त आश्वासन देत आहेत. असे असताना तेथील कार्यकर्त्यांना पोलीस रात्री दोन वाजता घेऊन गेले. आम्हाला तेथील पोलीस अधिका-यांनी विचारले की, हे बाहेरील कार्यकर्ते आहेत का ? मी त्यांना सांगितले की, ज्या ठिकाणी पोट निवडणूक असते, त्यावेळी बाजुच्या भागातील कार्यकर्ते वातावरण निर्मिती करण्यासाठी येत असतात. जवळपास सर्वच पक्षामध्ये हे चालते ? आता कोणाचे कार्यकर्ते नवी मुंबईत आले नव्हते ? साता-याहून कॉंग्रेसचे कार्यकर्ते येऊन त्या ठिकाणी भारती विद्यापीठाच्या बाहेर बोगस मतदान करीत होते. सातारा, सांगली, कोल्हापूर या भागातून एस.टी. च्या बसेसमधून कॉंग्रेसचे कार्यकर्ते त्या भागात आले होते. आम्ही त्या गाडयांचे नंबर घेतले आहेत. या बाबतची माहिती आम्ही निवडणूक अधिका-यांना दिली आहे. आमच्या कार्यकर्त्यांच्या बाबतीत मा.उपमुख्यमंत्र्यांना मी असे सांगितले की, आम्ही नवी मुंबईबाहेरील कार्यकर्त्यांना बाहेर पाठवितो. त्याप्रमाणे आम्ही आमचा शब्द पाळला. मी मा. उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, तेरणा या मतदान केंद्रावर दिवसभरात जवळ जवळ 580 लोकांनी बोगस मतदान केले. त्या ठिकाणी एका रांगेत 900 लोक उभे होते. त्यामध्ये 280 महिला होत्या. आपण नवी मुंबईतील प्रत्येक प्रभागातील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

मतदार यादी पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, प्रत्येक मतदार यादीमध्ये कमीत कमी 700 आणि जास्तीत जास्त 1400 मतदार दिसून येतील. प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते आपल्या पक्षाचे काम करावयाला त्या भागात गेले होते. कोणी पत्रक वाटावयाला गेले होते, कोणी कार्ड वाटावयाला गेले होते. भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते त्या भागात जाऊन मतदारांची माहिती घेत होते. मतदार बाहेर गेला आहे काय ? मतदार मृत झाला आहे काय ? याची माहिती आमच्या कार्यकर्त्यांनी घेतली. सी वूडमधील आठ इमारतींमध्ये कोणीही राहत नाही. असे असताना त्या मतदान बुथमध्ये 600 मतदान झाले. आमच्या कार्यकर्त्यांनी तक्रार करण्याचा तसेच ऑब्जेक्शन घेण्याचा प्रयत्न केला असता, तेथील अधिका-यांनी आम्हाला असे सांगितले की, " बाहेर 600 ते 700 मतदार उभे आहेत. आम्हाला वेळ नाही. आम्ही रेशनकार्ड बघून मतदान करण्यास परवानगी देतो. आता तो मतदार खोटा आहे की, खरा आहे याची आम्हाला माहिती नाही." पोलिसांकडे आम्ही तक्रार केली असता, त्यांनी आम्हाला असे सांगितले की, आतील अधिकारी हे सर्व पाहणार. आमचे ते काम नाही. आतल्या अधिका-यांला विचारले की तो सांगणार की, पोलीस हे पाहणार. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सदनात आठ तारखेला असे आश्वासन दिले होते की, नवी मुंबईची निवडणूक सुरळीतपणे पार पडेल. माननीय आर.आर.पाटील अतिशय कार्यक्षमतेने काम करीत आहेत, परंतु त्यांच्या नेतृत्वाखालील गृहखाते अकार्यक्षमतेने काम करीत आहे. सभापती महोदय, संभाजीनगरला मा. मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत असे सांगितले की, पोलिसांची दादागिरी वाढली आहे. आता हे माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगावयाला पाहिजे होते. माननीय मुख्यमंत्री ज्या अर्थी जाहीर बोलतात, त्या अर्थी काही तरी असेल. राज्याचे मा. मुख्यमंत्रीच असे म्हणत आहे. याचे प्रत्यंतर काल आम्हाला पाहावयाला मिळाले. सभापती महोदय, नेरुळमधील वॉर्ड क्र. 88 मध्ये डीएव्ही स्कूल आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

त्या डीएव्ही स्कूलमध्ये शंकर जाधव बक्कल क्र. 536 , प्रमोद पाटील बक्कल क्र. 1184 आणि सबइन्सपेक्टर पाटील हे तर त्या ठिकाणी कुणालाही आत जाऊ देत नव्हते. नव्या मुंबईमध्ये शिवसेना व बीजेपीच्या उमेदवाराच्या प्रतिनिधीला त्यांनी तीन नंतर बुथमध्ये जायचे बंद केले. हा जो चौगुले आहे त्याने त्या ठिकाणी आमच्या रीना बोरकर नावाच्या उमेदवार आहेत.... त्यांच्याकडे तक्रार केली की, या उमेदवार आहेत, तुझ्या बहिणीच्या वयाच्या आहेत, राजकारण निवडणूक सोडून द्या. परंतु महिलेबद्दल व्यक्तिगत जीवनामध्ये सभ्यता असते. त्यांनी असे म्हटले असते की, ताई तुम्ही बाहेर जा.... उमेदवाराला बाहेर जाण्याचा अधिकार आहे. उमेदवार रांगेत सांगू शकत नाही की, मला मते द्या. उमेदवार त्या ठिकाणी प्रचार करु शकत नाही, उमेदवार त्याठिकाणी चाललेल्या निवडणूक प्रक्रियेमध्ये दादागिरी करुन अडथळा आणू शकत नाही. तो जाऊ शकतो. किती मतदान झाले आहे हे आपल्या पोलींग एजंटला विचारु शकतो. उमेदवाराला बंदी? बाई, तू एकसारखे इथे यायचे नाही... आणि संध्याकाळी साडे पाच वाजता मतदान संपले, पावणे सहा वाजता 22 राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते त्या महिलेच्या अंगावर धावून गेले. आणि त्या रडत रडत कार्यालयात आल्या. आम्ही काय करणार, म्हटले काय करणार?... असहाय्यपणे बघण्याची स्थिती आली? मा. सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड आता भाषण करुन गेले. महाराष्ट्रामध्ये तुम्ही कसले समर्थन करीत आहात? आता सगळा इतिहास मी सांगत नाही. तुमच्या निवडणुका कशा जातात? ए तुला कर्ज दिले आहे, मला मत दे. ए तुला तगाई दिली आहे मला मत दे. ए तू साखर कारखान्यासाठी कर्ज घेतले आहेस... लोकांची अगतिकता, त्यांची गरज, त्यांचे दारिद्रय, त्यांचे अज्ञान हे प्रत्येक निवडणुकीत विकत घेतले आहे. कुणी 500-500 रुपये वाटले? आम्ही सवय लावली? कशासाठी अट्टाहास चालला आहे? एखादी विधानसभा, एखादी लोकसभा आपल्या पक्षाच्या हातात असणे, आणि त्यासाठी जनतेला कार्यक्रमाच्या माध्यमातून, आणि व्यक्ती म्हणून उमेदवाराच्या माध्यमातून लोकांना अपिल करुन सत्ता मिळविणे हे समजू शकतो. पण ग्रामपंचायत आमच्या हातात राहिली पाहिजे, जिल्हा परिषद आमच्या हातात राहिली पाहिजे, लोकल निवडणुका आमच्या हातात राहिल्या पाहिजेत, नगरपरिषदाही आमच्या हातात राहिल्या पाहिजेत. अशी बातमी आली आहे की, श्री. हजारेंना लोकांनी सांगितले की, तुझ्यामुळे मागील निवडणुकीत आम्ही हरलो आहोत. या

श्री. मधुकर चव्हाण...

निवडणुकीत तुला आम्ही बघून घेऊ. ही निवडणुकीमध्ये भाषा चालते. त्यानंतर दुसरी एक महत्वाची गोष्ट अशी की, याठिकाणी रेशनकार्डचा कारखाना काढलेला होता याची आपण चौकशी करा... त्यानंतर दुसऱ्या एका गोष्टीच्या पुनरावृत्तीचा दोष पत्करुन आपल्या लक्षात आणून देतो की, माननीय श्री. आर.आर. पाटील साहेबांना सांगितले की, आमचे कार्यकर्ते कार्यालयातून नेले आहेत. त्यानंतर त्यांनी आदेश दिले. ज्यावेळी कमिशनर श्री. विजय कांबळे हे नव्या मुंबईचे आयुक्त आहेत. संध्याकाळी चार वाजेपर्यंत मला त्या ठिकाणी सांगण्यात आले की, आम्ही आदेश पाळत नाही. तिथला मिसाळ नावाचा जो अधिकारी आहे तो ऑन डयुटीवर होता, मी त्याला म्हटले की, तुम्ही आदेश कां पाळत नाही? तो म्हणाला की, कमिशनरला आदेश द्यायला काय हरकत आहे? इथे आम्हाला किती काम पडलेले आहे.... आणि मग मी साहेबांना फोन केला, त्याठिकाणी त्यांच्या पी.ए. ने पुन्हा फोन केला तेव्हा त्यांना अर्ध्या तासात सोडले. ही कायदा व सुव्यवस्था आहे? काल नव्या मुंबईमध्ये काही ठिकाणी रिपोल घेणे अत्यंत आवश्यक आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, सत्ता येते सत्ता जाते. काही माणसे मिळालेल्या सत्तेचा जनतेची सेवा करण्यासाठी आणि आपली विश्वासार्हता वाढविण्यासाठी त्याठिकाणी तिचा दुरुपयोग करतात. काही माणसांच्या डोक्यात सत्ता चढते. परंतु लक्षात ठेवा की, नियती आपल्या सगळयांना बघत असते. या ठिकाणी त्यांच्याबद्दल आदर ठेऊन बोलतो की, श्रीमती इंदिरा गांधी व संजय गांधी यांच्या डोक्यात देखील सत्तेची हवा गेली होती. पण 1977 साली जनतेने त्या ठिकाणी त्यांना हिसका दाखविला, ती जनता दाखविते. 1980साली आम्ही जनता पार्टीमध्ये होतो, आम्ही त्या ठिकाणी नको तेवढी भांडणे करायला लागलो, दिलेली वचने विसरलो. आम्हाला 1980 साली जनतेने धडा शिकविला. इथे त्यांनी सांगितले की, कार्यक्रमाच्या आधारावर निवडणुका जिंकायच्या. आपली क्षमा मागून मी एक उल्लेख करतो. कारण तो याठिकाणी विषय नाही. कोणी दाखविली त्या ठिकाणी इंदिरा गांधींची तीन-तीन दिवस, चार-चार दिवस प्रेतयात्रा? गोळया लागलेली पोस्टर दाखविली?... होय ते म्हणाले ते बरोबर आहे....लोकांमध्ये मायाजाल पसरवून, लोकांमध्ये भावनात्मक आवाहन करुनच तुम्ही निवडणुका जिंकलात. कार्यक्रमाच्या आधारावर निवडणुका जिंकला नाहीत. श्रीमती इंदिरा गांधीची गोळया लागलेली पोस्टर्स लावलीत. त्याच्यानंतर स्वर्गीय राजीव गांधींची हत्या झाली. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सहानुभूतीच्या लाटेवर आरुढ होऊन तुम्ही देशात आणि महाराष्ट्रात निवडणुका जिंकलात. कार्यक्रमाच्या आधारावर जिंकला नाहीत. आमची आर्थिक निती आहे... नव्या मुंबईमध्ये जर या निवडणुका झाल्या असत्या, नव्या मुंबईमध्ये आम्ही लोकांना अशापध्दतीने पाणी देणार आहोत... नव्या मुंबईमध्ये 25 वर्षे लक्षात घेऊन... मा. श्री. कुलकर्णी साहेब शहरे कां वाढली? लोक हातावर घेऊन महाराष्ट्रात, शहरात कां आली?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

आज महाराष्ट्रातील शहरांची अवस्था बकाल झाली आहे. महाराष्ट्रात 247 नगरपालिका, 22 महानगरपालिका आहेत. तुम्ही याचा कधी विचार केला आहे का ? या सगळया नगरपालिका, महानगरपालिका येनकेन प्रकारेन महापौर आपला पाहिजे, नगराध्यक्ष आपला पाहिजे. परंतु ही नगरे का वाढली ? पोट हातावर घेऊन माणसे येथे अशासाठी आली की, ग्रामीण भागातील हजारो एकर जमीन, हेक्टर जमीन, निसर्गाने दिलेल्या नैसर्गिक संपत्तीचा उपयोग करुन शेतक-यांना दिलासा दिला नाहीत, हाताला काम दिले नाहीत, शेतीला पाणी दिले नाहीत, पोटाला अन्न दिले नाहीत, चालण्यासाठी रस्ता दिला नाहीत, प्रवासासाठी एस.टी.दिली नाहीत म्हणून ही सगळी माणसे येथे शहरात येऊन राहीली. पण या शहरातील लोकांना पुढच्या 25 वर्षात या शहराची लोकसंख्या किती वाढेल हे तुम्ही नवी मुंबईत सांगितले नाहीत. नव्या मुंबईमध्ये सांगितले की, 20 वर्षे तुम्हाला टॅक्स द्यावा लागणार नाही. कोणी अधिकार दिला ? दर पाच-पाच वर्षांनी निवडणूक होत असते. 20 वर्षे अव्याहतपणे माझ्या हातातच सत्ता राहणार आहे, माझ्या पक्षाच्या हातातच सत्ता राहणार आहे अशा प्रकारे नव्या मुंबईमध्ये, आम्हाला पहिल्यांदा असे वाटले आणि शेवटच्या दिवसापर्यंत मी पाटीलसाहेब, प्रामाणिकपणे सांगतो की, काहीही झाले नाही, काहीही झाले नाही. सगळयांच्या अतिशय चांगल्या प्रकारे सभा झाल्या. सगळयांचा प्रचार झाला. कोणाचीही टिंगलटवाळी झाली नाही. कोणी एक दगड मारला नाही. परंतु शेवटच्या रात्री, आम्ही सगळे असहाय्यपणे पहात राहीलो. मला तर पलिकडे जावयाचे होते. पण तेथील कॉन्स्टेबलने मला सांगितले की, तुम्ही आमदार असा, नामदार असा. आम्हाला असे सांगण्यात आलेले आहे की, येथे कोणीही जावयाचे नाही. मी सांगितले की, अरे बाबा, मी या रस्त्यावरुन त्या रस्त्यावर जात आहे. मी तुझ्या केंद्रामध्ये जात नाही. मला माहिती आहे की, आमदार असलो तरी निवडणुकीच्या काळात एक नागरीक आहे अशा त-हेनेच त्याठिकाणी आणि आम्ही सत्तेचा माज चढलेले लोक नाही, सत्तेचा कैफ चढलेले लोक नाही. पण येनकेन प्रकारेन कॉंग्रेसचा पराभव झाला पाहिजे, शिवसेना-बीजेपीचा पराभव झाला पाहिजे आणि त्याठिकाणी आमच्या हातातच सत्ता राहीली पाहिजे. हा धडा? पाटीलसाहेब, आपण एक उत्सुकता म्हणून तेथे काय-काय झाले ? याची चौकशी करावी. प्रामाणिक अधिका-यांना विचारा. सत्ता मिळाली, नाव मिळवून जाऊ. का लोक कै.वसंतराव नाईक यांचे नाव घेतात. कै.यशवंतराव चव्हाण यांचे नाव घेतात. लोक महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या चांगल्या-

. . . .व्ही-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

चांगल्या लोकांचे नाव का घेतात ? लोक कै.बाळासाहेब देसाई यांचे नाव का घेतात ? लोक माजी माननीय गृहमंत्री कै.कल्याणराव पाटील यांचे नाव घेतात ? काही बाबतीत लोक कै.वसंतराव नाईक यांचे नाव घेतात ? पक्षअभिनिवेष, पक्षाच्या सीमारेषा ओलांडून विरोधी पक्षाच्या लोकांनी त्यांना सभागृहात साथ दिलेली आहे. आता आम्हाला कधी-कधी वाटते की, मघाशी दादा, याठिकाणी गरजेपेक्षा जास्त स्तुती करीत आहेत की काय ? पण दुसरे मन असे म्हणते की, नाही. महाराष्ट्रातील गृहमंत्र्यानां जर अशा प्रकारचे . . . .ते प्रामाणिकपणे बोलत होते. पण त्याची आव्हाड यांनी कदरच केली नाही. आव्हाड यांनी एक मुद्दा सांगितला नाही की, होय, हे नव्या मुंबईमध्ये हे घडले नाही. तुम्ही कसले समर्थन करता ? हजारेची काय चुक होती ? काय त्या मोहोळमध्ये चुक घडली होती ? होय, आम्ही कोणीही त्याठिकाणी कृष्णा देसाईच्या हत्येचे समर्थन केलेले नाही. आम्हीही "मार्मिक वाचत होतो. कृष्णा देसाईंची हत्या बरोबर झाली असे कुठेही मार्मिकमध्ये आले नाही. "सामना" नंतर आला. त्याठिकाणी आम्ही कार्यकर्ते होतो. त्याचे कधीही कोणीही समर्थन केले नाही. दत्ता सामंत यांच्या हत्येचे समर्थन कोणीही केले नाही, कोणीही केले नाही. जर महाराष्ट्राचा बिहार होऊ नये असे वाटत असेल, आज बिहार का झाला ? कारण तेथील प्रत्येकाला, लालूप्रसादला असे वाटते की, बस, सत्ता आमच्या हातात असली पाहिजे. मिडियावाले जेव्हा शस्त्र,अस्त्र हातात घेऊन उभे राहतात, त्यावेळी महाराष्ट्राचा बिहार होऊ नये असे वाटत असेल तर नव्या मुंबईमध्ये झालेल्या घटनांची चौकशी आपण करा. on your own. काही वेळेला स्वत:, कारण charity begins at home. याप्रमाणे सत्कार्याला सुरुवात स्वत:पासून करावी लागते. तुम्ही असे ठाण्याला खोपकर यांचे केले, म्हणून आमचे हे समर्थनीय, तर No, not at all. हे असे आज आपण सगळे मिळून पेरु, तर जो सुसंस्कृत महाराष्ट्र जीवनाच्या सर्व क्षेत्रात, काही डाग लागणा-या गोष्टी सोडल्या तर आपल्याला निदान अभिमान वाटावा असा आहे, ते सुध्दा संपेल आणि आपण बिहारच्या वाटेला जाऊ. म्हणून नव्या मुंबईमध्ये रेशन कार्ड कुठून आली ? नव्या मुंबईत पोलीस कसे वागले ? नव्या मुंबईमध्ये पोलिसांनी कसा अन्याय केला ? तेथील मतदान केंद्रातील अधिकारी कसे वागले ? तेथील लोकांनी उमेदवारांशी कसे बेशिस्त आणि बेशरमपणाचे वर्तन केले ? याची सुध्दा आपण चौकशी करावी आणि मला असे वाटते की, सर्वांनी याबाबतीत चिंता करावी.यापुढे होणा-या निवडणुकीमध्ये सत्ता येईल, कोणाच्याही हातामध्ये जाईल.

. . . .व्ही-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

म्हणून नगराध्यक्ष आपला नाही आला, महापौर आपला नाही आला. मी मागे एकदा म्हणालो होतो आणि पुन्हा सांगतो की, आईच्या पोटातून कोणी सत्तेचा ताज घेऊन येत नाही. कोणी मुख्यमंत्री, कोणी आमदार, कोणी नगरसेवक ठरत नाही. परंतु मी अतिशय नम्रपणे आणि ठामपणे सांगू इच्छितो की, सत्ता मिळविण्यासाठी येनकेन प्रकारेन, वेगवेगळया वाईट गोष्टींचा पायंडा या देशात आणि महाराष्ट्रात वेगवेगळया निवडणुकीमध्ये जर कोणी पाडला असेल तर तो कॉंग्रेसने पाडलेला आहे. आम्ही पाडलेला नाही, आम्ही पाडलेला नाही. हजारो उदाहरणे देता येतील. म्हणून या नव्या मुंबईच्या निवडणुकीच्या निमित्ताने याठिकाणी अतिशय गंभीरपणे या मुद्यांची चर्चा होऊन, त्याच्यातून काहीतरी चांगले निघेल आणि पुन्हा येथे दुर्दैवी घटना घडणार नाहीत. मी आपले एकच मिनिटे घेतो. आमचे कार्यकर्ते, तुमचे कार्यकर्ते गेल्यानंतर, कार्यकर्त्याचा, त्याचा स्तर असेल, त्याप्रमाणे त्याची मिरवणूक काढली जाते. "अमर रहे" अशा घोषणा दिल्या जातात. दोन-तीन दिवस अग्रलेख येतात. पण त्याच्या कुटुंबाची वाताहात होते. कृष्णा देसाईची मुले खायला मोताद झाली होती हे मी मान्य करतो.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू...

शेवटी त्यांच्या कुटुंबाची काय अवस्था झालेली होती, हे आम्ही पाहिलेले आहे. त्याचे कोणी समर्थन केलेले नव्हते. त्या दृष्टीने जी चर्चा झालेली आहे, त्या चर्चेच्या माध्यमातून नवनित्य निघेल, काही चांगल्या गोष्टी निघतील आणि निडणुका या निर्भिडपणे आणि मतदाराला पक्षाच्या कार्यक्रमाच्या आधारावर, उमेदवाराच्या योग्यतेच्या आधारावर लोक मते देतील, इतका आत्मविश्वास का निर्माण करु नये ? त्या दृष्टीने या चर्चेचा उपयोग निर्णयासाठी झाला पाहिजे, असे मला वाटते, एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

--

**उपसभापती** : यानंतर 5-35 वाजता मा.मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह चर्चा संपवायची आहे. बरेच सन्माननीय सदस्य बोलावयाचे आहेत. त्यांना विनंती राहील की, त्यांनी थोडक्यात बोलावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या विषयावर या ठिकाणी चर्चेची मागणी होण्यापूर्वी खालच्या सदनामध्ये चर्चेची मागणी करण्यात आली होती आणि त्या ठिकाणी अध्यक्षांनी चर्चा मान्य केलेली आहे. मागण्यांवरील चर्चेनंतर ही चर्चा त्या ठिकाणी सुरु होणार आहे. त्यामुळे येथील चर्चा आवरून खालच्या सदनामध्ये आजच चर्चेला उत्तर द्यावयाचे आहे. तसे मा.सभापती महोदयांच्या दालनामध्ये ठरलेले आहे. आपल्याजवळ आणखी वेळ असली तरी यापेक्षा लवकर चर्चा आवरण्याचा प्रयत्न केला बरे होईल. सन्माननीय सदस्यांनी तेच तेच मुद्दे रिपीट न करता, त्यांच्याकडील त्यांनी अन्य मुद्दे सांगितले तर लवकर चर्चा संपेल आणि खालच्या सभागृहातही मला जाता येईल.

**उपसभापती** : ठीक आहे. मला वाटते की, या विषयावर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्यांची बरीच नावे आलेली आहेत, परंतु त्यांना विनंती आहे की, झालेले मुद्दे पुन्हा रिपीट न करता दोन-तीन मिनिटांमध्ये म्हणणे मांडून संपवावे. दालनामध्ये तसे ठरलेले असल्यामुळे, सदस्यांनी कमी वेळेमध्ये चर्चा संपवावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी या चर्चेला सुरुवात केली. सभापती महोदय, नगरपालिकेची निवडणूक 10 तारखेला होती. ती निवडणूक झालेली आहे. अंबरनाथ शहरातील शिवसैनिक श्री.हजारे यांची निर्धृण हत्या झाली, याबाबत सर्वांनाच खेद होतो. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी राज्यामध्ये गेल्या 20-25 वर्षामध्ये काय घडले, याबाबत सांगितले, त्याची पुन्हा पुनरुक्ती करणार नाही. अंबरनाथ नगरपरिषदेमध्ये शिवसेनेच्या तिकिटावर नगराध्यक्षपदावर उभे राहिलेले, श्री.गुलाबराव करंजुले हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष होते. मागच्या निवडणुकीला मी स्वत: त्या ठिकाणी गेलो होतो, त्यावेळेस त्या ठिकाणी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने स्वतंत्रपणे कॉंग्रेस पक्षाच्या विरूध्द निवडणूक लढविली आणि जवळजवळ 7 जागेवर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले. त्यावेळेस श्री.नरेश गायकवाड यांचा खून झाला. त्यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे आज 9 लोक निवडून आलेले आहेत. सभापती महोदय, तत्कालिन नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री.वाळेकर यांच्याबाबतीत क्रिमिनल केस दाखल करण्यामध्ये कोणतेही सेक्सन राहिलेले नाही. सर्व क्रिमिनल केसेस दाखल केलेल्या होत्या. त्यांनी नगराध्यक्ष म्हणून काम केले, मध्यंतरी त्यांना राजीनामा द्यावा लागला, पुन्हा काही अडचणी निर्माण झाल्या होत्या, कायद्यामधून मार्ग निघून ते पुन्हा नगराध्यक्ष म्हणून उभे राहिले. श्री.नरेश गायकवाड यांच्या हत्त्येमागे जसे श्री.वाळेकर यांच्यावर चार्ज आहे तसाच श्री.गुलाबराव करंजुले यांच्या संगनमताने हा संपूर्ण खून झालेला आहे...

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

ही वस्तुस्थिती आहे. त्या ठिकाणी आजही कोर्टात केस प्रलंबित आहे.ज्यावेळी श्री. गुलाबराव करंजुले यांचे नाव त्या ठिकाणी आले आणि वर्तमानपत्रात बातमी आली. त्यावेळी ताबडतोब त्यांना राष्ट्रवादी कॉन्ग्रेस पक्षाच्यावतीने पदावरुन काढण्यात आले. यावेळी सुध्दा नगराध्यक्ष पदाची मला उमेदवारी द्या असा आग्रह करण्यासाठी ते त्यांच्या समर्थकांसह राष्ट्रवादी कॉन्ग्रेस पक्षाच्या कार्यालयात आले होते. तेथे मला स्वत:ला ते भेटून गेलेले आहेत. कै. नरेश गायवाडच्या खून प्रकरणात त्यांचा त्याठिकाणी हात असावा असा संशय असल्या कारणाने कुठल्याही परिस्थितीत नगराध्यक्ष पदाची उमेदवारी आम्ही देऊ शकत नाही, असे राष्ट्रवादी कॉन्ग्रेस पक्षाच्यावतीने त्यांना सांगण्यात आले. नंतर एका रात्रीत अचानक काही तरी बदल झाले आणि दुस-या दिवशी वर्तमानपत्रात बातमी आली की, ते शिवसेनेच्यावतीने नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवित आहेत.सभापती महोदय, या घटना या ठिकाणी घडल्या. दुर्दैवाने ठाण्यामध्ये जसा हिंसाचार गेले वीस-पंचवीस वर्षे थैमान घालतोय, राजकीय कार्यकर्त्यांच्या हत्या त्याठिकाणी वारंवार होत आहेत. हे सर्व लोन कोकणपट्टीमध्ये गेलेले आहे, हेही तुम्हाला आम्हाला विसता कामा नये. श्री. मधुकर चव्हाण आता या ठिकाणी असायला पाहिजे होते. मी त्यंचे अभिनंदन करणार होतो. मघाशी ते कॉन्ग्रेसच्या संदर्भात बोलले असतील पण ग्रामपंचायतीपासून सगळया निवडणुका, मग ग्रामपंचायत असेल. जिल्हा परिषद असेल,पंचायत समिती असेल,नगरपरिषद असेल किंवा त्या भागामध्ये असलेल्या महानगरपालिका असतील या कॉन्ग्रेसने जिंकायला पाहिजे. राष्ट्रवादी कॉन्ग्रेसने पाठीमागे जावे ही जी इर्षा आहे या इर्षेमुळे त्या ठिकाणचे वातावरण बिघडते आणि असंतोष मोठया प्रमाणावर निर्माण होतो, हेच मी या ठिकाणी सांगणार आहे. या ठिकाणी श्री. अरविंद सावंत बसलेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयातील किंवा कोकणपट्टीतील विचार जर मी या ठिकाणी मांडला तर मला या ठिकाणी कृपया मला कोणी अडवू नका. मी वस्तुस्थिती सांगणार आहे. आणि मी सत्य सांगत आहे. 100 टक्के ग्रामपंचायती आमच्या असायला पाहिजे. समझोता आम्ही करु आणि हया ग्रामपचांयती आमच्याच राहिल्या पाहिजेत. नगरपरिषदेमध्ये आमच्याच पक्षाचे सदस्य असले पाहिजेत. त्या ठिकाणी दुस-या पक्षाचे कोणी येता कामा नये. जिल्हा परिषद, पंचायत समित्या आमच्याच असल्या पाहिजेत. आमच्याशिवाय त्या ठिकाणी दुसरे कोणी येता कामा नये. कालच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

विधानसभेच्या निवडणुकीच्यावेळी मी जाहीरपणे भाषण देतांना एक उदाहरण दिले होते. महाभारत टळले असते. धर्मराजाने त्या ठिकाणी काय मागितले होते? पाच पांडव आणि माझी आई कुंती यांच्यासाठी मला फक्त घर बांधण्यासाठी जमीन द्या. एवढाच धर्मराजाचा आग्रह होता. श्रीकृष्णाला त्या ठिकाणी नेण्यात आले आणि श्रीकृष्णाची शिस्टाई. फक्त पांडवांना एक घर बांधायला जागा द्या अशी धर्मराजाची मागणी. त्यानंतर त्या ठिकाणी दुर्योधनाने जे सांगितले ते श्रीकृष्णाने ऐकून घेतले. त्यानंतर घर बांधण्यासाठी जागा तर सोडाच पण सुईच्या अग्रा एवढी जमीन सुध्दा तुम्हाला मिळणार नाही असे सांगण्यात आले. हे सर्व राजकारण. आज या ठिकाणी ही चर्चा राजकारणावर करण्यात येत आहे दुर्दैवाने माझ्या सिंधुदुर्ग जिल्हयात हे राजकारण दर दिवशी चाललेले आहे. त्या ठिकाणी.असंतोष आहे. भितीचे वातावरण आहे.सगळे आमचेच आमच्या शिवाय दस-या कुणाचे नाही, ही भूमिका घेऊन त्या ठिकाणी राजकारण केले जाते .म्हणून गेल्या विधानसभा निवडणूकीच्या वेळी मी जाहीरपणे भाषण केले होते की, सुईच्या अग्रा एवढी जमीन देणार नाही, ही जर तुमची भूमिका असेल तर तुम्ही त्या ठिकाणी यशस्वी झालात. विधानपरिषदेच्या निवडणूकीमध्ये तुम्ही 30 हजार मतांनी निवडून आलात. पण तुम्हाला विरोध करणारे सुध्दा 29 हजार मतदार या मतदारसंघात आहेत आणि मी जाहीरपणे सांगितले की, पुढच्या निवडणुकीच्या काळापर्यंत या 29 हजार मतदारांचे प्रतिनिधीत्व हा गरुनाथ कुलकर्णी त्या ठिकाणी करील.आज त्या ठिकाणी आपण जे पेरतो दुर्दैवाने आज तेच त्या ठिकाणी उगवलेले आले. श्रीधर नाईक यांची हत्या झाली. त्यांची मुले आणि बायको आज त्या ठिकाणी काय करतात हे मला माहीत नाही.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

हे सर्व आरोपी कोण होते ? ज्यांना त्यामध्ये सजा झाली त्यावेळी तत्कालीन महसूल मंत्री हे आरोपीच्या पिंजऱ्यात बसलेले होते. दोन अडीच महिने त्या ठिकाणी सावंतवाडीच्या कोर्टामध्ये ट्रायल चालली.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ते निर्दोष सुटले. त्यांच्यावर आरोप नाही. असे रेकॉर्डवर आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : माझा त्यांच्यावर आक्षेप नाही. मला पुढचे बोलावयाचे आहे.

श्री. नितीन गडकरी : आपण महसूल मंत्री असे नाव घेऊन श्री. नारायण राणे यांचा उल्लेख करीत आहात. श्री. नारायण राणे यांच्या याबाबतीत न्यायालयात केस झाली. ते निर्दोष सुटलेले आहेत त्यांचा त्या खुनाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. त्यांचे नाव, रेफरंस त्यांच्याशी जोडून हे सांगणे बरोबर नाही. . Mr. Chairman, Sir, what is the locus-standi of the hon. Member here?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मी आपला आभारी आहे. मी त्यांच्या संदर्भात या ठिकाणी वक्तव्य करीत नाही. ते त्या ठिकाणी सुटले. मी त्याबाबतीत आक्षेप घेत नाही. कोर्टाने त्यांना निर्दोष सोडले. पण जे आरोपी ..

श्री. नितीन गडकरी : ते निर्दोष होते म्हणून सुटले.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : जे आरोपी त्या ठिकाणी पकडले गेले आणि कलम 302 खाली ज्यांना सजा दिलेली आहे ते तीन चारही आरोपी चेंबूरच्या घाटला गावचे आहेत. आपल्याला माहीत नसेल तर मी रेकॉर्ड आणून दाखवितो. माझा त्या ठिकाणी आक्षेप नाही. या ठिकाणी तुमचे सरकार आले. एकदा सेशन कोर्टामध्ये सजा झाल्यानंतर जो खटला राज्यभर गाजला त्याचे गांभीर्य असते. त्यावेळी हायकोर्टामध्ये फर्स्ट अपील मॅटर ऑफ राईटचे करावयाचे असते. Sir, if there is a decision against the acquittal of the accused in the lower Court then the first appeal in the High Court is the matter of right. सरकार त्या ठिकाणी अपिलामध्ये का गेले नाही ? हे सर्व निर्दोष असले तरी पहिले अपील हायकोर्टामध्ये दाखल करावयास पाहिजे ते करण्यात आले नाही. श्री. श्रीधर नाईक यांची पत्नी ज्यावेळी हायकोर्टामध्ये

...2..

RDB/ MAP/ KGS/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

गेली. त्यावेळी हायकोर्टाने सांगितले की, "The appeal is time bound." क्रिमिनल केसमध्ये The State is the Party and, Sir, the first appeal is the matter of right and the State Government had to have file an appeal. राज्याने त्या ठिकाणी अपील दाखल केले नाही. त्यामुळे मयताची पत्नी जरी असली तरी वैयक्तिक अपील हायकोर्टाने इंटरटेन केले नाही. त्यामुळे त्या महिलेला आणि मुलाला न्याय मिळू शकला नाही. श्री. सत्यजित भिसे यांच्या बाबतीत ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. खरे म्हणजे वकिलाने न्यायालयाचा अवमान करु नये. What is your locus standi here and the State is the Party and any decision is given by the Court.. ते निर्दोष सुटल्यानंतर त्या ठिकाणी अर्जदाराला अपील करण्याची मुदत संपली, अपील केले गेले नाही म्हणून त्यांना न्याय मिळाला नाही असे महनीय विधितज्ज्ञ, महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल होण्याचे स्वप्न पाहणारे आणि विधी मंत्री पदावर मीच योग्य आहे असे सांगणारे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी बोलत आहेत, हे बरोबर नाही. ही बाब त्यांचीही प्रतिष्ठा घालविणारी आहे आणि सभागृहाचीही प्रतिष्ठा घालविणारी आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, तो प्रश्न नाही. आपण प्रश्न लक्षात घेतलेला नाही. त्यावेळी युतीचे शासन असल्या कारणाने त्या ठिकाणी जर पहिली ॲक्विटल केस झाली असेल तर हायकोर्टामध्ये मॅटर ऑफ राईटचे अपील दाखल करावयाचे असते ते अपील दाखल करण्यात आले नाही हा माझा आक्षेप आहे.

श्री. नितीन गडकरी : हायकोर्टाने कोणताही निकाल दिल्यानंतर प्रत्येक निकालावर सुप्रीम कोर्टात अपील केलेच जाते हे खरे नाही. अनेक केसेसमध्ये हे होत नाही. हायकोर्टामध्ये लागलेल्या प्रत्येक केसच्या निकालाबाबत सुप्रीम कोर्टामध्ये अपील केलेच पाहिजे आणि शासन तसे करते असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? असा काही कायदा आहे काय ?

Shri Gurunath Kulkarni: Sir, as I said earlier, the first appeal is the matter of right and the State has to file an appeal.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

Shri Nitin Gadkari : Sir, when any decision of the Lower Court is challenged in the High Court, then the decision taken by the High Court on any such matter is final. How, the hon. Member is quoting the decision of the Lower Court here?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : हायकोर्टामध्ये अपील दाखल झाले नाही.

श्री. नितीन गडकरी : ते पूर्णपणे निर्दोष सुटलेले आहेत. अशा प्रकारे दुरान्वयाने नाव घेऊन या सभागृहामध्ये तुम्हाला मिळालेल्या संधीचा उपयोग करुन एखाद्या व्यक्तीला बदनाम करणे बरोबर नाही. ते या सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यांच्याबद्दल असे उद्गार काढणे बरोबर नाही. बाकीचे जे बोलावयाचे ते आपण बोलावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मी कोणतीही व्यक्ती डोळयासमोर ठेवून बोलत नाही.

श्री. नितीन गडकरी : श्री. श्रीधर नाईक यांच्या प्रकरणाच्या संदर्भात माजी महसूल मंत्री कोण होते ? तुम्ही नथीतून तीर कशाला मारता ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा आक्षेप एवढयापुरताच मर्यादित आहे की, त्या ठिकाणी फर्स्ट अपील राज्य सरकारने दाखल केले नाही. हाच माझा आक्षेपाचा मुद्दा आहे. Mr. Chairman, Sir, once the accused is acquitted by the Court, it is okay and the matter ends there. But, afterwards, the first appeal has to be filed in the High Court by the State and at that time you were ruling the State and the appeal was not filed. तोच माझा आक्षेपाचा मुद्दा आहे. त्या ठिकाणी श्री. सत्यविजय भिसे यांची हत्या झाली. त्याची हत्या का झाली ? त्या ठिकाणी एक ग्रामपंचायत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जिंकली. एक ग्रामपंचायत जिंकल्यावर तो त्या ठिकाणी सरपंच होणार याबाबत त्यांचा आक्षेप होता. त्या ठिकाणी जिल्हा परिषदेची निवडणूक झाली. त्यामध्ये जिल्हा परिषदेचे माजी प्रमुख शिवसेनेचे उमेद्वार होते. ते सहा मतांनी पडले त्यामुळे श्री. सत्यविजय भिसे यांची हत्या केली. आपण त्यावेळी त्या ठिकाणी आला होता....

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मा.सदस्यांचे राजकीय भाषण चालू आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी त्यावेळी भेटण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी त्यांच्या सास-यांकडे मी गेलो होतो. तो जरी राष्ट्रवादी कॉंग्रेसचा असला तरी त्याचे सासरे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघचालक होते. त्यांची बहीण त्याला दिलेली होती. म्हणून मी ज्यावेळी कणकवलीला गेलो तेव्हा त्यांच्याही घरी सांत्वन करण्यासाठी गेलो होतो. कारण मेलेला माणूस हा कोणत्याही पक्षाचा नसतो तर घटना वाईट असतात, या घटना पुन्हा घडू नये. आता तुमचे ऑग्र्यूमेंट सुरु आहे की, भाजपावाल्यांनी उद्या एक खून केला म्हणून मी चार खून केले, मी चार खून केले म्हणून शिवसेनेने पाच खून केले, त्यांनी पाच केले म्हणून कॉंग्रसने इतके केले अशा थीमवर तुम्ही बोलता काय ? वाईट ते वाईट, मग भाजववाला करो, की कॉंग्रेवाला करो की सेनेवाला करो, चांगले ते चांगले. तुमचे आज राज्य आहे आणि एखाद्याने वाईट गोष्ट केली असेल तर त्याचा आधार घेऊन आम्ही काय वाईट केले असे सांगून तुम्ही आपली बाजू मांडता, यापेक्षा काय वाईट आहे, स्व.यशवंतराव चव्हाणांच्या सुसंस्कृत राजकारणाचा उल्लेख करुन महाराष्ट्रामध्ये खुनाच्या राजकारणाला तुम्ही सपोर्ट करणार आहात काय ? तुमच्यात जो सुसंस्कृतपणा आहे तो येथे दाखवा ना ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : त्याठिकाणी हजारो यांचा जो खून झाला त्याचा मी दहा वेळा निषेध करतो. परंतु त्याचबरोबर खेडमध्ये जो एक्स-आर्मीमन होता त्या माणसाचा निर्घृण खून झाला आणि शिवसैनिकांनी सांगितले की, होय, भिलारेचा खून आम्ही केलेला आहे. त्याबाबत तुम्ही त्यांना काय सजा केली ? त्याठिकाणी किती लोकांना तुम्ही पकडले ? त्यावेळी त्या भागातील आमदार गृहराज्यमंत्री होते, तुमचे सरकार होते. त्या भिलारेच्या कुटुंबाला तुम्ही किती न्याय दिला ? सभापती महोदय, उद्या सत्ता, सत्तेतून पैसा, पैशातून मस्ती, मस्तीतून सत्ता हे जे दुष्टचक्र सुरु झाले आहे आणि हे थांबले पाहिजे. हे थांबविण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन यासंबंधीचा निर्णय घेतला पाहिजे. हजारेंची हत्या झाली आहे त्याचे समर्थन कोणीही करणार नाही. ज्याला काळीज आहे, ज्याला हृदय आहे, तो मनुष्य त्याचे समर्थन कधीही करणार नाही. परंतु त्याला काय कारणे हेती. आज कायदा व सुव्यवस्थेबद्दल बोलले गेले. आज गृहमंत्री

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

श्री.आर.आर.पाटील हे आहेत, उद्या कोणीतरी गृहमंत्री येतील. पण कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी राजकीय पक्षांची आहे, लोकांची आहे, तशी तुमची आमची सर्वांची आहे. हजारे यांचा खून झाला. त्याचा निषेध करीत असताना मी श्री.गडकरीसाहेब आणि शिवसेना पक्षाचे अभिनंदन करतो. औरंगाबादमध्ये 83 सदस्यांचे सभागृह आहे, भाजपाला 30 आणि शिवसेनेला 19 जागा प्राप्त झाल्या आहेत. कुळगाव नगरपरिषदेमध्ये, अंबरनाथमध्येही तुमची सत्ता आली आहे, तुम्ही निवडणूक जिंकला आहात. तुमचे मी अभिनंदन करतो, परंतु ज्या कारणामुळे या सर्व घटना घडल्या आहेत त्या कारणांचा तुम्ही आम्ही शोध घेतला पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : नव्या मुंबईमध्ये मशिनरीची काय भानगड आहे त्याबद्दल जरा बोलावे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, शिवसेनेला 25 जागा, भाजपाला 21 जागा, राष्ट्रवादीला 10 आणि काँग्रेसला 16 जागा प्राप्ता झाल्या आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आमचे तेथे काहीच नव्हते, आता तेथे आम्हाला 10 जागा मिळाल्या आहेत. आम्ही खूष आहोत आणि तुम्हाला जास्त जागा मिळाल्या म्हणून मी तुमचे अभिनंदन करतो. काल मी दिवसभर नवी मुंबईत होतो. (अडथळा) मशिनरी हा प्रचाराचा भाग आहे. एका बूथवर शिवसेनेचे उपनेते श्री.विजय लोके माझ्यासमोर होते, मी त्यांना विचारले की काय अडचण आहे काय ? मी दिवसभर तेथे फिरत होतो. काही ठिकाणी निवडणुकीच्या वेळी घटना घडल्या असतील. परंतु जाणूनबुजून घडना घडविल्या हा जो आक्षेप व आरोप आहे आणि त्यादृष्टीने चौकशी करावी ही जी मागणी आहे ती मला नामंजूर आहे. मा.सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांचे अभिनंदन करतो. त्यांनी गंभीर विषयावर चर्चेला सुरुवात केली. त्या हजारे यांची निर्घृण हत्या झाली त्याचा मी निषेध करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खरे म्हणजे ही चर्चा राजकीय पक्षाच्या हेवेदाव्यामधून निर्माण झालेल्या एका मृतात्म्याच्या चे जे आक्रंदन आहे, त्याच्या कुटुंबाचे जे आक्रंदन आहे त्यांच्या सांत्वनाकरिता आहे. तो आमच्या पक्षाचा आहे म्हणून हा प्रस्ताव आम्ही येथे आम्ही मांडला, आणि तो तुमच्या पक्षाचा असता तर तुम्ही देखील हिरिरिने असा प्रस्ताव मांडला असता. परंतु या चर्चेचा सूर पाहिल्यानंतर मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, काही पक्षाच्या मंडळींनी या चर्चेला प्रतिरोध करताना आणखी कुठच्या कुठच्या हत्या जमा करुन हत्यारांना शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या हे लक्षात आले नाही की, त्यांच्या विधवा, त्यांच्या आई, त्यांच्या कुटुंबाचे काय झाले ? एवढया जाणिवेने आपण बोलत असताना काल परवापर्यन्त जे त्यांच्यामध्ये होते आणि कोणत्या ना कोणत्या हल्ल्यात मृत झाले त्या माझ्या उद्ध्वस्त झालेल्या भगिनीचा वर्तमानपत्रातून येणारा हृदयद्रावक फोटो पाहिल्यानंतर आपण त्यांचा अवमान करीत आहोत असे आपणाला वाटत नाही काय ? मी याठिकाणी उखाळयापाखाळया काढण्यासाठी उभा नाही. उखाळयापाखाळया काढायचे म्हटले की, हा एक गुंड या पक्षात होता आणि नंतर तो दुस-या पक्षात गेला आणि नंतर तिस-या पक्षात गेला हे सांगण्यासाठी मी येथे उभा नाही. बोलायचे म्हटले तर खूप बोलता येईल. आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांच्या काळात पप्पू कलानी कसा वाढला, हितेंद्र ठाकूरला कसा वाढला अशा किती तरी गोष्टी सांगता येतील. पण अगदीच सांगायचे झाले तर - आमच्या शब्दामध्ये नाही तर- तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांची सभागृहातील रेकॉर्ड झालेली भाषणे याठिकाणी वाचून दाखविता येतील. शेवटी या सदनाच्या माध्यमातून आपण काय निर्माण करणार आहोत ? सभापती महोदय, आम्ही आपच्या खुर्चीचा आदर करतो. आपण श्री. डावखरे म्हणून या खुर्चीवर बसला नाहीत तर सभापती या नात्याने आपण येथे बसलेले आहात. हे सभागृह अत्यंत पवित्र असे मंदिर आहे असे मी मानतो. येथून न्याय मिळतो अशी आमची भावना आहे. मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे राष्ट्रवादीचे आहेत, आदरणीय गृहमंत्री हे राष्ट्रवादीचे आहेत आणि सभापती पदावर बसलेले आपण देखील राष्ट्रवादी पक्षाचे आहात म्हणून आम्हाला न्याय मिळणार नाही असे म्हणून चालेल काय ? प्रत्येक प्रकरणाचे स्वत:चे मेरिट असते. कृष्णा देसाई प्रकारण काढले, आणखी काही प्रकरणे काढली.ती प्रकरणे त्या त्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 16:55

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

काळामध्ये घडली. त्या त्या काळामध्ये खटले उभे राहिले आणि ज्यांनी त्या गोष्टी केल्या ते कोणत्या पक्षाचे होते यापेक्षा त्यांनी ते गुन्हे भोगले, सोसले. मा.सदस्यांना याठिकाणी काय सांगावयाचे आहे ? त्या घटनांचा उल्लेख करुन आता घडलेल्या घटनेचे मा.सदस्यांना समर्थन करावयाचे आहे काय ? मला फार वाईट वाटते. काल-परवा झालेली हत्या अत्यंत गंभीर होती. तुम्हाला असे म्हणावयाचे आहे काय की, तुमच्यातील एक गुन्हेगार शिवसेनेत आला आणि म्हणून त्याला मारले , मग कशाला रडताय ? हत्यारे म्हणून तुम्हाला तुमचा लौकिक वाढवायचा आहे काय? मा. सभापती महोदय, आपण गमतीने का होईना पण पटकन बोलून गेलात. सभापती नसताना आपल्या पक्षात बसल्यानंतर पक्षामध्ये काय चालले आहे याचे मार्गदर्शन आणि दिग्दर्शन केल्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतो. आपण काय म्हणालात ? उपमुख्यमंत्री हे उद्याचे मुख्यमंत्री असतील. होय. राष्ट्रवादी पक्षाला निर्विवाद बहुमत मिळून पुढच्या निवडणुकीमध्ये स्वतःच्या पक्षाचा मुख्यमंत्री बसविण्याचे जे स्वप्न आहे त्या स्वप्नाची याठिकाणी काही मा.सदस्य टिंगलटवाळी करीत होते. ते आता सभागृहामध्ये दिसत नाहीत. पण ते स्वप्न आपण निर्माण केलेले आहे आणि त्या स्वप्नाच्या दिशने वाटचाल करण्याची तुमची सुरुवात आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ प्रथम शिगम 17:00

श्री.दिवाकर रावते...

सत्तेचा वापर, सत्तेचा दुरुपयोग आणि सत्तेचा आधार यासंबंधी सन्माननीय श्री. गुरुनाथजी सत्ता, सत्तेतून खूर्ची, खूर्चीतून पैसा आणि पैशातून पुन्हा सत्ता असे आपण बरोबर सांगितले. हिंदुस्थानातील दोन एअरवेजना संपूर्ण जगात आपण फिरावयास पाठवून दिले. पुढच्या निवडणूकीची व्यवस्था आपण केली असे आम्ही म्हणू शकतो. सत्तेत कसा पैसा येतो इत्यादि सर्व काही आम्हाला सांगता येईल. सभापती महोदय, ताक घुसळल्यानंतर लोणाी निघत असते. पाणी घुसळल्यावर लोणी कसे निघणार ? सभापती महोदय, ज्या घटना घडल्या त्या महाराष्ट्र राज्याच्या गृहमंत्र्यांना माहिती नाहीत. या सभागृहाचे जेष्ठ सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी या ठिकाणी प्रत्येक घटनेचा उल्लेख केलेला आहे. त्या घटनेचा पुनरुच्चार करुन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु छोटया-छोटया घटनांमधून सुध्दा भविष्यात अराजकता कशी निर्माण होईल याचे तुम्ही दिग्दर्शन करीत आहात. भविष्यात माननीय श्री. आर.आर. पाटील हे या राज्याचे मुख्यमंत्री कसे होणार आहेत याची पाऊले तुम्ही आज उमटावीत आहात. आमचा श्री.दिलीप हा शाखा प्रमुख होता. त्याच्यावर खूनी हल्ला झाला. या अनुषंगाने श्री.एम.के.मढवी आणि त्याची पत्नी यांच्यावर एफ.आय.आर. दाखल झाला. त्यांचे विरुध्द कलम 307 अंतर्गत गुन्हा नोंदविला गेला. त्या घटनेचा देखील उल्लेख श्री, सरपोतदार यांनी केला. मला एक गोष्ट कळत नाही की, आपल्या कार्यकत्यांना वाचविण्याकरिता सरकार खोटे बोलते, असत्य बोलते, त्यामुळे असे सरकार भविष्यात रहाणार नाही याचा चोर पावलांच्या खूणा आहेत. दिनांक 8 एप्रिल, 05 रोजी माननीय गृहमंत्र्यांनी असे सांगितले की, ते फरारी आहेत. ही माहिती रेकॉर्डवर आलेली आहे. परंतु त्या संबंधित व्यक्ती कालच्या निवडणुकीमध्ये उपस्थित होत्या. त्या व्यक्ती उघडपणे फिरत होत्या. श्री. गुरुनाथजी आपण देखील त्यांच्याबरोबर फिरताना सोबत होतात. ही गोष्ट तुम्ही नाकारु शकत नाही. या सदनात गृहमंत्र्यांनी आपल्या कार्यकर्त्या विषयी फरारी आहेत अशी माहिती दिली. असे असताना त्या कार्यकर्त्यांना आपण काल सोबत घेऊन फिरलात. मी तुम्हाला दोष देणार नाही. त्या ठिकाणी निवडणूक होती, ते निवडणुकीतील ते कार्यकर्ते होते. तुम्ही गुन्हेगारांना घेऊन फिरलात असे मी म्हणणार नाही. परंतु या सदनाला काही किंमत आहे की नाही ? 8 तारखेस सदर व्यक्ती फरार असल्याचे जाहीर केले जातात, त्याच व्यक्ती दुस-या दिवशी निवडणुकीत उघड माथ्याने फिरतात. अशी परिस्थिती पाहता तुमचा गृह खात्यावर काही अंकूश आहे काय ? तुमचा गृह खात्यावर कसा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

अंकुश आहे याची माहिती सदनाला दिली पाहिजे. बिहारमध्ये 15 हजार लोकांना तुरुंगात टाकले. त्या ठिकाणी निवडणुकीच्या वेळी सर्व गुन्हेगार फिरत होते. बिहारची परिस्थितीची प्रतिकृती लक्षात घेऊन तुम्ही देखील निवडणुकीत आरोपींना फिरविता हे सत्य हळूहळू बाहेर येऊ लागले आहे. या ठिकाणी श्री. वाघमारे, कॉन्स्टेबलसंबंधी सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी माहिती सांगितली. या कॉन्स्टेबलला कसला माज आला ? कसली मस्ती आली ? कसले पोलीस राज ? पोलिसांना कोणी अधिकार दिले ? मतदानाला कोणी जावयाचे, कोणी जाऊ नये यासाठी प्रत्येक मतदार बुथवर पोलिंग एजन्ट बसविले होते. मतदाराच्या सर्व गोष्टी पाहण्यासाठी निवडणूक अधिकारी सक्षम होते. कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही एवढेच काम पोलिसांनी करावयाचे होते. परंतु काल नवीन मुंबईत पूर्णपणे पोलीस राज चालले होते. या सदनात बसणारे तसेच या सरकारमध्ये असलेले सन्माननीय दारुबंदी आणि उत्पादन शुल्क मंत्री यांनी पोलिसांना आपल्या कार्यकर्त्यांमध्ये कनव्हर्ट केले. पोलिसांनी कार्यकर्त्यांची भूमिका बजाविण्याचे काम केले. हे सर्व प्रकार कालच्या निवडणूकीत घडले. यासंदर्भात तुम्ही काय उत्तर देणार आहात ते या ठिकाणी सांगा. निवडणूका जिंकण्यासाठी मोठया प्रमाणात पैशांचा वापर केला गेला, त्याच प्रमाणे सत्ता मिळविण्यासाठी पोलिसांचा मोठया प्रमाणात वापर करण्यात आला. यासंबंधीचा देखील खुलासा या ठिकाणी केला गेला पाहिजे. त्या ठिकाणी महिला उमेदवार होत्या, त्यांना पोलिसांनी मतदानास अडविले. एक पोलीस अधिकारी निवडणुकीतील उमेदवाराला अडवितो. त्या महिलेमध्ये काही धमक नव्हती काय ? त्या महिला उमेदवाराने त्या अधिका-यास ढकलून सांगावयास पाहिजे होते की, तू तुझे काम कर. मला मतदान केंद्रावर जाण्याचा अधिकार आहे. तो अधिकार तू घेऊ शकत नाही.माझ्ा मतदार करण्याचा अधिकार आहे, मला तू अडवू शकत नाही. मतदानाच्या दिवशी उमेदवार आणि मतदान यंत्रणा सक्षम असते....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 17:05

श्री. दिवाकर रावते ...

एवढा बळाचा वापर ? कसले खाते चालविता तुम्ही ? सभापती महोदय, मघाशी आमच्या आदरणीय विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केला की, उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी संभाजीनगरला भाषण करताना कॉंग्रेसला गाडून टाकू असे म्हटले. मध्यंतरी श्री.मणिशंकर अय्यर प्रकरणामध्ये श्री. आर.आर.पाटील यांनी शिवसैनिकांना चिरडून टाकू असे म्हटले होते. एक लक्षात ठेवा शिवसेना म्हणजे ढेकूण वाटले काय ? तुमच्यामध्ये एवढी हिंम्मत असेल तर करा. आम्ही तुमचे आव्हान स्वीकारायला तयार आहोत. पक्षापक्षाच्या अभिनिवेशात पक्षकार्याच्या एकमेकांच्या संघर्षामध्ये या महाराष्ट्रामध्ये तुम्ही सत्तेमध्ये बसला आहात ते गाडून टाकू आणि चिरडून टाकू हे सांगण्याकरिता बसला असाल तर समोर मुडदाडांची अवलाद नाही हे लक्षात ठेवा. आता फार झाले. कार्यकर्त्यांचे स्तंभ उभे करायला आम्ही तयार नाही. ज्या पध्दतीने तुम्ही करीत आहात त्याच्या दुप्पट पध्दतीने `प्रतिकार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही हे आजच्या चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो. संभाजीनगर वॉर्ड क्र. 27 शताब्दीनगर येथून श्रीमती नवले या उभ्या होत्या.ट्रफिक अेपीआय ची पत्नी आहे. तिला लोकशाहीमध्ये निवडणुकीसाठी उभे राहण्याचा अधिकार आहे. माझा त्या भगिनीबद्दल आक्षेप नाही. हा अेपीआय आपल्या पिवळया दिव्याच्या गाडीतून येऊन बूथवर उभा राहतो. प्रिसायडींग ऑफीसरच्या जवळ बसतो आणि मतदार करा म्हणून जबरदस्ती करतो. पोलिसांना एवढे अधिकार कोणी दिले ?पोलिसांना जी माज मस्ती कुठून आणि कशी आली ? कोणी दिली ? मा.सदस्य श्री. विलास अवचट हे स्वत: गेले आणि त्यांनी श्री.वाघ यांच्याकडे तक्रार केली. त्यांनी सांगितले आम्ही यांची व्यवस्था करु. आजच्या चर्चेतून अधिकृतरित्या सांगतो की आपण सरकार म्हणून पक्षाच्या कार्यकर्त्यांना निपक्षपातीपणाने अभय देणार असाल,गुन्हेगारांचा बंदोबस्त करुन सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी उभे रहावयाचे अशा प्रकारचा संदेश जायचा असेल तर श्री.नवले यांचा बंदोबस्त करुन त्यांना निलंबित करणार किंवा नाही हे तुम्हांला करावे लागेल अन्यथा तुम्ही पोलिसांना भयकवलेत अशा प्रकारचा संदेश गेल्याशिवाय राहणार नाही.लातूरमध्ये पोलिसांनी हैदोस घातला .पोलिसांच्या समोर व्यंकटेश पन्हाळे आणि इतर शिवसैनिकांवर हल्ला केला. कशासाठी तर बेकायदेशीर आणि बोगस मतदार करणा-याला अडविले म्हणून केला. निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांनी काय काम करायचे आणि पोलिसांनी काय काम करायचे याचे एकदा कोडिफिकेशन करुन घ्या. पोलिसांनी बेकायदेशीर आणि बोगस मतदान

...2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

करणा-याला जर कुणी अडविले तर त्याला सहकार्य केले पाहिजे आणि लोकशाहीची लाज राखली पाहिजे.लोकशाहीचे वस्त्रहरण करणारी ही पोलिसांची मुडदाड मंडळी आरआर आबांच्या मस्तवाल कारभारामध्ये मशगूल आहेत. 2/4 चांगल्या गोष्टी केल्या गवगवा झाला की त्यांना वाटते आम्ही काहीही करु शकतो. किंबहुना पोलिसांमध्ये आता हा संदेश गेलेला आहे. आमदार श्री.राजन पाटील यांचे चिरंजीव सापडत नाहीत.राजन पाटील यांचे चिरंजीव फिरत आहेत. एका शिवसैनिकाचा हत्यारा सापडत नाही. आमदारपुत्र आहे म्हणून काय झाले ? तुम्ही त्यांना अटक करणार किंवा नाही हे सांगा. राजेंद्र हजारेच्या प्रकरणामध्ये इत्यंभूत माहिती आली आहे. आम्ही काही बोलण्याऐवजी आक्रंदन हे महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचे वृत्तपत्र आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

हे आक्रंदन महाराष्ट्रातील सर्व सामान्य जनतेचे आहे तसेच राजकीय कार्यकर्त्याचे आहे .भविष्यात राजकीय कार्यकर्त्यांना दोन गोष्टी कराव्या लागतील.त्यातील एक गोष्ट म्हणजे राजकीय कार्यकर्त्याना घरी बसावे लागेल किंवा प्रतिकारा करिता हातात शस्त्रे घेऊन फिरावे लागेल. हे आक्रंदन अशा प्रकारचे संदेश देणारे आहे.सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे या सभागृहाचे नेते आहेत,तसेच ते .राष्ट्रवादी पक्षाचे माजी अध्यक्ष आहेतव या पक्षाचे आदरणीय नेते आहेत. त्यांनी हळूच चिठ्ठी पाठवून आपल्या पक्षाच्या सदस्यांना असे सांगावयास पाहिजे होते की, तुम्ही अशा प्रकारचे वक्तव्य करणे चांगले नाही. परंतु तुमच्या पक्षाची संस्कृती काय आहे हे तुम्ही आज येथे दाखवले असल्यामुळे तुम्हाला धन्यवाद द्यावे काय असे मला वाटते.? तुम्ही अमूक केले म्हणून आम्ही तमुक केले असे आज सांगण्यात आले आहे. इसापनीतीतील शेळीच्या गोष्टीत सांगितले होते की," तू नाही परंतु तुझ्या बापाने पाठविले म्हणून मी तुला खाणार आहे". असे त्या गोष्टी सांगितले होते आणि तीच तुमची प्रवृत्ती असल्याचे तुम्ही आज येथे सिध्द केलेले आहे.अशा प्रकारची संस्कृती तुमची भविष्यात सुध्दा राहणार आहे. या गुन्हयातील एफ.आय.आर.मध्ये सर्वश्री.श्याम गायकवाड,सुनील वाघमारे,प्रशांत कारंडे, प्रताप भोसले,बबन अशा पाच सहा व्यक्तींची नावे आहेत. तेव्हा या लोकांना केव्हा अटक करण्यात येणार आहे ? या लोकांना अजूनही अटक केली जात नाही. निवडणुकीच्या वेळीसुध्दा त्या व्यक्ती फिरतच होत्या आपले राज्य हे बिहार सारखे होत चालले आहे. निवडणुकीच्या वेळी गुन्हेगारांना मोकळे सोडले जात आहे. सभापती महोदय, या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जास्त वेळ बोलू नये अशी सर्व सन्माननीय सदस्यांना आपण विनंती केलेली असल्यामुळे त्या विनंतीचा मान मी राखणार आहे. मी जास्त काही बोलणार नाही परंतु मला अत्यंत खेदाने असे नमूद करावेसे वाटते की, नालासोपारा येथील श्री.विवेक पंडीत यांच्या प्रकरणामध्ये त्या भागातील आमदार श्री.हितेन्द्र ठाकूर यांनी रिव्हॉल्वर काढले होते त्यावेळी सर्व पोलीस बाजूला उपस्थित होते. पोलिसांच्या समक्ष श्री.हितेन्द्र ठाकूर यांनी रिव्हॉल्वर काढले आणि श्री.विवेक पंडित त्यांच्या अंगावर धावून जाऊन त्यांनी हल्ला केला होता. तसेच आजच याला संपवावयाचे आहे अशी भाषा केली होती.हे सर्व प्रकार चालू असताना श्री.विवेक पंडित यांना कोणतेही संरक्षण दिले गेले नाही त्यामुळे त्यांना मार खावा लागला होता.परंतु श्री.हितेन्द्र ठाकूर यांना संरक्षण दिले गेले आहे. त्यांना आमदार म्हणून हे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

संरक्षण दिलेले आहे काय ? की आपल्या पक्षाबरोबर त्यांनी आघाडी केली आणि त्या आघाडीत त्यांचे सर्व उमेदवार घेऊन ते सत्तेत येणार आहेत म्हणून त्यांना संरक्षण दिलेले आहे ? या बाबतीत माननीय मंत्रीमहोदय खुलासा करणार आहेत काय ? श्री.विवेक पंडित यांनी तक्रार केल्या नंतर व त्याची नोंद करण्यात आल्यानंतर संबंधिताच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे याबाबत माननीय गृह मंत्री आम्हाला काही सांगणार आहे काय ? ज्या ज्या घटनांचा येथे उल्लेख करण्यात आला आहे त्याचा मी पुन्हा उल्लेख करणार नाही.परंतु एक गोष्ट स्पष्ट शब्दात सांगतो की, या पुढे अशाच प्रकारची आपली जर आक्रमकता राहणार आहे याची चाहूल आपण दिली असेल तर राजकीय क्षेत्रात त्याच आक्रमकतेने आम्ही तुम्हाला उत्तर दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही .याची आपण नोंद घ्यावी.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. हकनाक मरण्यासाठी राजकारणात काम करणारे आम्ही नाही.तुमचा मार खाऊन हुतात्मे होण्यासाठी आम्ही जन्माला आलेलो नाही.आम्ही तुम्हाला हुतात्मे करु असे मी सांगत नाही.परंतु आपण एक गोष्ट लक्षात ठेवा यापुढे आपल्याला जे काही करावयाचे असेल ते करण्यापूर्वी त्याचा दहा वेळा विचार करावा.अन्यथा सक्षम आणि सबळ राजनीती करण्याच्या बाबतीत आपण महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेत असाल तर ती सक्षम आणि सबळ राजनीती राज्यात निर्माण करण्यासाठी त्या सक्षमतेने प्रयत्न केले पाहिजेत असे मला सांगावयाचे आहे. माननीय श्री.शरद पवार आजच असे म्हणाले की," माननीय शिवासेना प्रमुखांचे आणि माझे वैर नाही.तर आमचे राजकीय मतभेद आहेत." आपला नेता प्रगल्भ आहे परंतु ही प्रगल्भता आपल्यामध्ये येत नसेल तर तुम्ही पक्ष कार्याला योग्य नाहीत असेच म्हणता येईल. जाता जाता एका गोष्टीचा मी उल्लेख करतो की, तुम्ही खुनी आहात, तुम्ही गुंड आहात, तुम्ही दहशतवादी आहात.हे तीनही गूुण घेऊन राजनीतीमध्ये आपली सत्ता संपादन करण्याचे काम आपण करीत आहात.असे मी म्हणत नाही तर आदरणीय राज्याचे मुख्यमंत्री म्हणत आहेत. निवडणुकीच्या प्रचारासाठी ते संभाजीनगर येथे गेलेले असतांना त्यांनी असे सांगितले आहे. त्याचबरोबर नवीन मुंबईमध्ये सुध्दा त्यांनी सांगितलेले आहे.ते असे म्हणाले की, " या राज्यामध्ये तुमची गुंडगिरी मी चालू देणार नाही. तुमची धाकदपटशा चालू देणार नाही, मी मुख्यमंत्री आहे ." म्हणजे त्यांना असे सांगावे लागत आहे की ,मी मुख्यमंत्री आहे.माझा काही अधिकार चालतो. यु आर ब्रॅन्डेड. मी मघाशी तीनही गुणांचा उल्लेख केला होता. या चर्चेतून....

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

जे काही उत्तर यायचे आहे ते येईलच. घ्या कौतुक करून, अमुक अमुक झाले म्हणून सांगा. परंतु हा विषय यापेक्षा वेगळा आहे. फार कौतुक करावे अशातील भाग नाही. स्वतःच्या पक्षामध्ये देखील त्या पध्दतीने तुम्हाला साथ मिळत नाही. म्हणून कालच या सर्व प्रकरणांमध्ये राष्ट्रवादीच्या कार्यकर्ते गुंतलेले असताना, गृहखाते तुमच्याकडे असल्यामुळे तुमच्याकडे नैतिकता असेल तर तुम्ही राजीनामा द्यावा आणि आमच्या या सदनामध्ये बसून मोठमोठ्या गप्पा मारून, माननीय मंत्री श्री.गणेश नाईक हे दारूबंदी आणि उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री असताना देखील कालच्या दोन दिवसामध्ये नवी मुंबईमध्ये दारू कशी वहात होती, त्याची कशी व्यवस्था केली गेली होती याचा तपास आपण करावा. अध्यक्ष महाराज, मृत झालेल्या कार्यकर्त्यांना या निमित्ताने मी मनापासून श्रद्धांजली अपर्ण करतो आणि शिवसेना त्यांच्या मागे समर्थपणे उभी निश्चितपणे राहील, त्याची आपण चिंता करावी अशातील तो भाग नाही. आपण आपल्याकडील माणसांचीच चिंता जरूर करावी एवढे बोलून भाषण संपवितो.

****

....... इइ 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 17:15

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, मी आपला अधिक वेळ घेणार नाही. अध्यक्ष महाराज, सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथे शिवसेनेचे उपतालुका प्रमुख पंडित देशमुख तसेच अंबरनाथ येथील शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख श्री.हजारे यांच्या हत्येचा निषेध करणारा जो ठराव मांडण्यात आलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. अध्यक्ष महाराज, पुन्हा सत्ता हाती आल्यानंतर गेल्या 4-6 महिन्यातील वर्तमानपत्रे पाहिली असता एक दिवस असा जात नाही की ज्या दिवशी दरोडा पडल्याची बातमी नाही किंवा खून, बलात्कार झालेला नाही, खंडणीचे व्यवहार झालेला नाही वा एखाद्या लहान मुलीवर ॲसिड फेकले गेलेले नाही. तरीही आम्ही म्हणतो की, आमचा कारभार उत्तम चालला आहे. लातूरबाबत आताच सांगितले. परंतु तेथे प्रत्यक्षात काय घडले ? तर पोलिंग एजंटने बोगस मतदानावर ऑब्जेक्शन घेतले होते म्हणून त्याला मतदार केंद्रामध्ये मारले. ही हिम्मत कशामुळे त्यांची वाढते ? कारण त्यांना वाटले की, राज्यकर्ते आमच्या मागे उभे आहेत, आपण काहीही केले तरी आपल्याला कोणीही काहीही करणार नाही. अशा पध्दतीने या राज्यामध्ये कारभार चालला आहे. अध्यक्ष महाराज, मला आज सन्माननीय आर.आर.पाटील यांच्या भाषणांची आठवण येते. शिवरायाचे कैसे चालणे, शिवरायाचे कैसे बोलणे, असे आपण म्हणायचे आणि शिवरायाचे कैसे वागणे ... तो एक मतितार्थ घेऊन आपण येथे वेगळेच काही करतो आहोत असे ते जे बोलतात तेव्हा मला या ठिकाणी त्यांच्याच भाषणातील काही वाक्ये येथे वाचून दाखवाविशी वाटतात. अध्यक्ष महाराज, या सदनातील एक ज्येष्ठ सदस्य सन्माननीय श्री.बी.टी.देशमुख या सदनातून निवृत्त होत होते तेव्हा सन्माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी येथे भाषण केले होते. त्यातील दोन ओळी मी येथे मुद्दाम वाचून दाखवितो. त्यांनी म्हटले आहे ... '... सभापती महोदय, विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांतून ते प्रतिनिधी येथे निवडून येत आहेत त्यातील एका प्रतिनिधीने माझ्याकडे अशी भावना व्यक्त केली आहे की, विधान परिषदे पेक्षा विधान सभेची निवडणूक लढविणे कमी खर्चाचे होते ... ही भावना आपल्या सगळ्यांनाच विचार करायला लावणारी आहे ...' अध्यक्ष महाराज, हा ठराव त्या निवडणुकीतून आलेला असल्याने मी जाणीवपूर्वक हे येथे सांगतो आहे. ...' ... वास्तविक खालच्या स्तरावर पक्षीय वातावरणातून निवडणूक होतात असे असताना खर्च करण्याची हिंमत असणारे लोक, विद्वानांना, राजकारणातील सज्जनांना पाठीमागे टाकून या सदनामध्ये निवडून येणार असतील तर आज आपण सगळ्यांनीच कोठे तरी अंतर्मुख व्हावयास पाहिजे ... अध्यक्ष

...... इइ 3 ...

श्री.अरविंद सावंत ..

महाराज, त्यांचे पुढील वाक्य तर आणखीनच महत्त्वाचे आहे. '... संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये उमेदवार निवडताना, उमेदवाराला मत देताना जर जात बघितली जाणार असेल, धर्म बघितला जाणार असेल, आर्थिक देवघेव होणार असेल आणि हे निकष लावून उमेदवार निवडून येणार असेल आणि अशा तऱ्हेने निवडून येणाऱ्या उमेदवाराकडून रामराज्याची अपेक्षा केली जाणार असेल तर ते रामराज्य कसे येऊ शकते ? कैसे बोलावे, कैसे चालावे, बोले तैसा चालावे आबा, तुमचीच वाक्ये मी तुम्हाला वाचून दाखवित आहे. रामराज्य कसे येणार ? आज ऐपतीच्या जोरावर, गुंडगिरीच्या जोरावर, मनी पॉवर आणि मसल पॉवर हे फॅक्टर जर निवडणुकीमध्ये महत्त्वाचे ठरत असतील तर विधानसभेच्या निवडणुकांचे पावित्र्य राखणे कठीण जाईल हे आपणच आबासाहेब म्हटलेले आहे, तेव्हा लोकसभेमध्ये एनडीए सरकारने निश्चितपणे चांगल्या भूमिका घेतल्या ....

( यानंतर श्री. जागडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

लोकसभेत निवडून कसे जावयाचे, ही भूमिका आपण घेतली आहे. प्रत्यक्षात काय घडते हे पाहण्याची आवश्यकता आहे. माननीय सदस्य श्री. जितेंद आव्हाड यांनी असे सांगितले एक्स्टॉर्शन थांबले आहे. मी सकाळ या वर्तमानपत्रातीलच वृत्त त्यांना वाचून दाखवितो. खून, दरोडा, खंडणी यांच्या घटनानी एकाच दिवशी खळबळ माजली आहे. एकाच दिवसात सगळ्या गोष्टी घडत आहेत. डोंबिवलीत अलिकडेच केबल चालक श्री. म्हात्रे यांची निघृण हत्या झाली. मुंबईत संजय गुप्ता याची देखील भरदिवसा हत्या झाली आहे. सभापती महोदय, ठाण्यामध्ये महिलांना लुटले आहे. नवी मुंबईमध्ये गुन्हेगारी फोफावत आहे. आता हे कोण बोलले आहे. तर सन्माननीय आयुक्त हे बोलले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत 2004 मध्ये 3571 गुन्हे दाखल झाले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत 808 गुन्ह्यांची वाढ झाली आहे. आता हा आपला कारभार पहा. आम्हाला याचे वाईट वाटते. नवी मुंबईतील बांगला देशीय घुसखोरांवर पूर्णपणे कारवाई होऊ शकत नाही. असे तेथील पोलीस आयुक्तांनी पत्रकारांना सांगितले. सभापती महोदय, आपण रोज फुले, आंबेडकरांचे नांव घेत आहोत. असे असताना त्यांच्या विचारांचा खून आपल्याच हाताने आपण या राज्यात करीत आहोत. सभापती महोदय, मी परवा एक विशेष उल्लेख उपस्थित केला होता. नव्या मुंबईतील भ्रष्टाचार मांडताना मी या रेशनकार्डचा उल्लेख त्यावेळी केला होता. सभापती महोदय, आपणच त्यावेळी मला संरक्षण दिले. त्यामुळे उद्या कार्यकारी अभियंत्यांना आपण बोलाविले आहे. ते उद्या येणार आहेत. मतदार यादीमध्ये नोंदणी करण्यासाठी अशा प्रकारची रेशन कार्ड यापूर्वीच देण्यात आली आहेत. सभापती महोदय, विधानसभेचे निवडणूकीच्या वेळी असे प्रकार झाले होते. सभापती महोदय, आता ही चोरी मिडीयाने पकडली आहे. याचे शुटींगसुध्दा झाले आहे. परंतु ते कोठेही दाखविले गेले नाही. आता याच्या पाठीमागे कोणाचा पाठींबा आहे ?

सभापती महोदय, कॉंग्रेस संस्कृतीचे हे वैशिष्ठ्य आहे. श्री. कलमाडीने असे वक्तव्य केले होते की, शिवसेनेला खंडाळाच्या घाटाच्या पुढे जाऊ देणार नाही. मी माननीय गुरुनाथ कुळकर्णी यांना सांगू इच्छितो. ज्यावेळी शिवसेना बालवयात होती तेव्हा आपण जळगाव तालुक्यातील दोन निरपराध मुलाना पकडले होते. आपले साने गुरुजी त्या ठिकाणी आहेत, त्यांना आपण हे विचारा. त्यांचे याच्याशी लागेबांधे आहेत. कापूस चोरमार्गाने मध्यप्रदेशात जात होता. त्याला रोखण्याच प्रयत्न या दोन मुलांनी केला असता, त्या दोन मुलांना पोलिसांनी पकडले. त्यानंतर त्यांना इतके

श्री. अरविंद सावंत....

मारले की, ती दोन्ही मुले जेलमध्ये मेली. हा काँग्रेसचा इतिहास आहे. जी मुले चांगली चळवळ निर्माण करतील, ती चळवळ तेथल्या तेथे ठेचण्याचे काम आपण केले आहे. जमले तर त्यांचा खून करण्याची मजल गेली आहे. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवा. माननीय शिवसेना प्रमुखांच्या विचारांने निर्माण झालेली आमची संघटना आहे. आपण बॉल जेवढा आपटाल, तेवढा तो उसळी मारुन येतो. त्याप्रमाणे आम्ही उसळी मारुन येऊ. तुम्हाला वाटेल की, आम्ही शिवसैनिकांना दाबून टाकू. परंतु तसे होणार नाही. शिवसैनिकांनी बांगड्या हातात भरलेल्या नाहीत. आमच्यातही हिम्मत आहे. आज जे काही चालले आहे, त्याला राज्यकर्त्यांचा पाठींबा आहे, असे चित्र आज निर्माण होत आहे. सगळ्यात वाईट गोष्ट अशी आहे की, राज्यकर्त्यांचे या लोकांना अभय आहे. काय करायचे आहे ते करा. आम्ही तुम्हाला सोडवून आणू. ही जी भावना निर्माण झाली आहे, त्यातून हे सर्व काही घडत आहे. आम्ही बिहारपुढे जावयाला लागलो आहोत.

सभापती महोदय, मा. शिवसेना प्रमुखांनी केव्हाही जात विचारली नाही. दुर्देवाने मंडल आयोग आला. त्यानंतर राखीव मतदारसंघ निर्माण झाले. त्यावेळी मा. शिवसेना प्रमुखांना वेदना देणारी एक गोष्ट वाटली. त्यांना जात कोणती ? असे विचारावे लागले. मा.शिवसेना प्रमुखांनी आयुष्यात कधीही जात विचारलेली नाही. ब्राह्मण - ब्राह्मणेतर, मराठा - मराठेतर, शहाण्णव कुळी, ब्याण्णव कुळी असे सारे भेद गाडून सा-या मराठी माणसांनी एकत्र या, तरच तुमचा विकास होईल, असे सांगणारे मा. शिवसेना प्रमुख आहेत.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही.

श्री. अरविंद सावंत...

सभापती महोदय, गुन्हेगारीकरण कुठे सुरु झाले? शर्मा बंधू कुणाच्या विमानातून आले? मागे वळून पहायला लागलातर तुम्ही 66 पासून काय काय केले याची मढी उकरायला लागतील? मला त्यामध्ये जायचे नाही. आता दांडीयात्रेचे नवीन प्रकरण सुरु झाले आहे. तुम्ही दांडीयात्रा काढीत आहात. ईकडे खून तिकडे दांडीयात्रा. दांडी यात्रा काढून अहिंसेचे व्रत घेणारे आपण आहोत असे स्वत:ला म्हणता. परंतु गांधींजींचे वाक्य मी आपल्याला ऐकवतो "अहिंसेने होत नसेल तर हिंसेचा आधार घ्या, परंतु भितीने घरात बसू नका. कारण भ्याडपणा ही मोठी हिंसाच आहे. भिणे म्हणजे आत्म्याची हिंसा आहे." हेच ब्रम्हवाक्य घेऊन मी तुमच्यासमोर उभे रहातो. गांधीजी असे म्हणाले म्हणून आम्ही सुध्दा सुरुवात करतो. "अहिंसा म्हणजे भ्याडपणा आहे", हिंसेला हिंसेने उत्तर द्यायचे असा त्याचा अर्थ आहे असे मला वाटते. इथे सत्तेची नशा आली आहे. प्रबोधनकार ठाकरेंचे एक वाक्य सांगतो. "एक वेळ मद्याची नशा उतरेल पण सत्तेची नशा उतरणार नाही." ही नशा कालच तुमच्या कार्यकर्त्यांमध्ये इतकी भिनली आहे की काहीही करा आम्ही आहोत. कालच्या नव्या मुंबईच्या निवडणुकीत मी सुध्दा फिरलो. मा. सदस्य श्री. चव्हाण सांगत होते त्याप्रमाणे एकेक भयानक प्रकार होत होते. म्हणून तुमचे वाक्य मी सुरुवातीला वाचले. दुर्दैव असे आहे की, तुमचा विचार प्रगल्भ आहे. पण तो सगळे जण आचरणात आणणार आहेत कां? निवडणुकीमध्ये पैसा, मसल पॉवर, मटन पार्टया सगळे जोरदार चालते. तुमचा हा नैतिकतेचा पराभव आहे तो तुम्हाला सहन होता कामा नये. नवी मुंबईतील बंगलादेशी घुसखोरांचा विचार आपण केला पहिजे. तुमच्यामध्ये संवेदनशीलता असल्यामुळे तुम्ही मी चिरडून टाकेन वगैरे बोलत रहाता. प्रत्यक्ष तुमच्याही पायात कुणीतरी बेडया घालीत आहे. अजूनही विचार करण्याची वेळ गेली नाही. पण जर कधी गांधींजीच्या म्हणण्याप्रमाणे हा भ्याडपणा आपल्याला सहन करायचा नसेल तर अंतर्मुख व्हा. आणि तुम्हाला चिरडून टाकण्याचे कोण ठरवित आहे ते पहा. त्या खात्याचा सातत्याने पराभव करण्याचे तुमच्याच नेतृत्वाखाली होत आहे हे आणखी दुर्दैव आहे. मी आपल्या सामर्थ्याचे कौतुक करतो आणि आपल्याकडून तातडीने या सर्वांवर कारवाई व्हावी एवढी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड,रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याकरिता संधी दिल्याबद्दल मी प्रथमत: आपणास धन्यवाद देतो. आमचे नेते माननीय श्री. मधुकर सरपोतदार यांनी नियम 97 अन्वये प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. दिनांक 8 एप्रिल रोजी माननीय श्री. सरपोतदार साहेबांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती आणि माननीय सभापतींकडे आजच्या आज निवेदन झाले पाहिजे असा आग्रह धरला. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्या संदर्भात सभागृहामध्ये निवेदन केले. माननीय श्री. सरपोतदार साहेबांना त्या दिवशी अभिप्रेत होते की, आज अपरिमित घटना घडणार आहे. आणि येत्या 24 तासामध्ये कदाचित 2-4 लोकांचे मृत्यू ओढवणार आहेत. त्याकरिता शासनाच्या गृह खात्याने काळजी घेण्याची गरज होती. माननीय श्री. सरपोतदार साहेबांनी सांगून सुध्दा माननीय गृहमंत्र्यांनी निवेदनामध्ये शासनाने पूर्णपणे काळजी घेतली असून कोणतीही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती उद्‌भवणार नाही असे सांगितले. परंतु हे निवेदन झाल्यानंतर पाच ते सहा तासानंतर अंबरनाथमध्ये श्री. जयेंद्र हजारे यांची निर्घृण हत्या झाली. या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेची स्थिती शिल्लक राहिली नाही, गुंडाच्या मनामध्ये पोलिसांबाबत भिती उरलेली नाही. पोलीस गुंडांना अटक करतात परंतु त्यांना नंतर जामीन मिळतो व गुन्हेगार सुटतात. ठाण्याच्या जेलमध्ये एका कैद्याचा मृत्यू झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे . . . .

त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. तुम्ही-आम्ही महापौर होतो, तेथे सदस्य होतो. तेथे कोणत्याही कैद्याने अशा प्रकारे गळफास घ्यावा याचे काही प्रयोजन नाही. उलट ज्याने आत्महत्या केली, त्याच्या गुप्तांगावर जखमा आढळल्या आहेत. जेलमध्ये सुध्दा माणूस सुरक्षित राहू शकत नाही अशी परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. मध्यंतरी श्री.अशोक बसप्पा, वय 22 याने देखील गळफास लावून घेतला अशी सुध्दा घटना घडलेली आहे. शिवसेनेचे उप विभाग प्रमुख जयेंद्र हजारे यांनी हत्या झाली. त्याचबरोबर अंबरनाथ येथे यापूर्वी श्री.देवराम वाळूंज, नगरसेवक श्री.प्रसन्ना कुलकर्णी आणि आता हजारे यांची हत्या झाली. 19-3-2005 रोजी 15 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर 3 नराधमांनी बलात्कार केला . याठिकाणी दुस-याचे पाप दाखवून, आपण पुण्यवान आहोत असे सांगून सत्ताधारी पक्षाला बाजूला होता येणार नाही. माननीय श्री.आर.आर.पाटीलसाहेब, आपण फार कर्तृत्ववान आहात असे आम्हाला वाटले होते. आपण या राज्याचे पहिले गृहमंत्री आहात की, ज्यांनी महासंचालकांना आत पाठविले, पोलीस आयुक्तांना आत पाठविले.त्यांच्याविरुध्द कार्यवाही केली.पण याठिकाणी आता जे घडले आहे, ते पाहिल्या नंतर निश्चित स्वरुपात आपले कर्तृत्व यामधून दिसत नाही. ॲन्टॉप हिल येथे सहा वर्षाच्या मुलीची निघृण हत्या झाली. ऐरोली येथे शिवसेना शाखा प्रमुख श्री.दिलीप म्हात्रे यांना मारहाण झाली. यासंबंधात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. मी फक्त एकाच गोष्टीचा उल्लेख करु इच्छितो. भिवंडीमध्ये भर दुपारी 1.30 वाजता श्रीमती भावना रामदानी या महिलेची निघृण हत्या झाली. त्यांच्या घरामध्ये चोर शिरले आणि त्यांनी चोरी करताना, त्या बाईची हत्या केली. चार वर्षाच्या मुलीने त्या चोरांना पाहिले आणि त्याला ओळखले. पोलिसांनी त्या चोराला पकडले आहे.पण सातत्याने वरुन फोन गेल्यामुळे पोलिसांनी अजूनपर्यंत केस रजिस्टर केली नाही. हे फोन कोणाकडून जातात ? फोन कोण करते ? याचा शोध पाटीलसाहेब आपण घ्यावा. याठिकाणी सन्माननीय आमचे कोकण सुपूत्र यांनी सत्यविजय भिसेचा उल्लेख केला. मी येथे सत्यविजय भिसे यांची जी हत्या झाली, त्याचे समर्थन करणार नाही. ती सुध्दा दुःखद घटना आहे. परंतु त्याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री.नारायण राणेसाहेबांच्या बंगल्याला आग लावली. जर माननीय श्री.राणेसाहेब, त्या बंगल्यामध्ये असते तर काय झाले असते गुरुनाथजी ? हे कृत्य समर्थनीय आहे का आणि आपण त्याठिकाणी पुढाकार घेत होतात असा आरोप आहे. अशा प्रकारचे

. . . .2 एच-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे . . . .

जे आरोपी आहेत, त्यांना या प्रकारचे वक्तव्य करण्याचा अधिकार आहे का ? हे सुध्दा तपासून पाहण्याची गरज आहे. मी शेवटचा उल्लेख करु इच्छितो.

Shri Gurunath Kulkarni: I am not accuse in any case. त्यामुळे मी त्यात आरोपी आहे असे जर याठिकाणी नमूद केले असेल तर ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

**उप सभापती** : ते काढून टाकण्यात येईल.

श्रीअनंत तरे : सभापती महोदय, शेवटी एवढेच सांगतो. माननीय श्री.पाटीलसाहेबांनी आजच्या "सामना" मधील अग्रलेख वाचावा. माननीय शिवसेना प्रमुखांनी जाहीरपणे चेतावणी दिलेली आहे की,"शिवसेनेचे रक्त आता इतके सांडले आहे की, त्या प्रत्येक थेंबातून उद्या प्रतिकाराची ठिणग्या उडल्याच तर राष्ट्रवादीचे सत्ताधारी, गुंड, झुंडच काय तर अन्यायी, अत्याचारी, सरकारलाही वरवंटयावर ठेचावयास शिवसैनिक कमी करणार नाहीत." अशा प्रकारचे आपल्याला आवाहन केलेले आहे. म्हणून याठिकाणी या राज्यामध्ये . . . .

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांचा वेळ संपलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आता माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, फक्त एक मिनिट.

**उप सभापती** : मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर देण्यास सुरुवात करावी असे सांगितले आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी आपल्याकडे एक बोगस कार्ड, ओळख पत्र पाठवितो.

**उपसभापती** : ते माझ्याकडे पाठवा.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, मघाशी येथे सन्माननीय सदस्यांनी माननीय गृहमंत्र्यांच्या कर्तृत्वाबद्दल उल्लेख केलेला आहे. कालच अहमदनगर मधील एस.पी.यांनी गावातील अत्यंत प्रतिष्ठित लोकांचा जुगार पकडला. त्यांना अटक केली आणि त्यानंतर फार मोठे पोलीटीकल प्रेशर माननीय गृहमंत्र्यांवर आलेले असतानाही, त्यांनी त्या एस.पी.नां फोनवर सांगितले की, तुम्ही जे केले ते बरोबर आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख (पुढे चालू...

म्हणून सांगू इच्छितो की, डिपार्टमेंटमध्ये काही घडत असेल, पण गृहमंत्री महोदयांच्याबद्दलचा जो उल्लेख केला, तो बरोबर नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी आपल्याकडे ओळखपत्र पाठवून देतो.

**उपसभापती** : ठीक आहे.

-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

श्री.आर.आर. पाटील ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, या राज्यामध्ये नुकत्याच झालेल्या इलेक्शनच्या संदर्भात या सभागृहात संवेदनशील अशाप्रकारची आज चर्चा होणे अपेक्षित होते. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे सुरुवातीला बॅलन्स ठेवून बोलले, नंतर मात्र त्यांनी या विषयावर मते व्यक्त केली. सभापती महोदय, घटना नुकतीच घडलेली असल्यामुळे, त्यावर राजकीय अभिनिवेश होणे थोडेसे स्वाभाविक होते. पण या सन्माननीय सदनाचे महत्व लक्षात घेता,केवळ रस्त्यावरील भांडणासारखे स्वरुप या चर्चेला येणे हे खचितच अपेक्षित नव्हते. ही गोष्ट खरी आहे की, आज या पध्दतीमध्ये दोष निर्माण झालेले आहेत. आज देशाचा सगळा इतिहास पाहिला तर आजपर्यन्त सर्वसामान्य समाजाला मताचा अधिकार नव्हता, आपल्या देशामध्ये प्रदीर्घ काळ लोकशाहीसुध्दा नव्हती. देशाला स्वातंत्र्य मिळाले, सगळयांना मतांचा अधिकार मिळाला आणि लोकशाहीची प्रक्रिया सुरु झाली. सभापती महोदय, जगातल्या लोकशाहीचे टप्पे पहाता, देशातील लोकशाहीला प्रदीर्घ परंपरा आहे, असा निष्कर्ष आपण काढू शकत नाही. तरीसुध्दा अत्यंत कमी कालावधीमध्ये जे दोष लोकशाहीमध्ये यायला नको, ते आज आलेले दिसत आहेत. सभापती महोदय, पैशाचा काही ठिकाणी वापर होतो, काही ठिकाणी मसल पावरचा वापर केला जातो, काही ठिकाणी जाती धर्माच्या नावाचा वापर केला जातो. एकेकाळी राजकारण्यांना सहाय्य करणारे गुंड स्वत:च राजकारणात यायचा प्रयत्न करतात. या सगळ्याच प्रश्नांना उत्तरे देऊ शकत नाही. काही प्रश्नांची उत्तरे ही राजकारण्यांनी देण्याची आवश्यकता आहे. ते कोणत्या पक्षाचे आहेत, तो भाग गौण आहे. काही प्रश्नावर राजकीय उत्तरच मार्ग काढू शकते. आज जे दोष निर्माण झालेले आहेत, त्याबाबतीत सगळ्या राजकीय पक्षांनी अंतर्मुख होऊन विचार करुन, त्यातील दो्ष दूर केले पाहिजेत. लोकशाहीमध्ये चांगल्या प्रथा आणि परंपरा कशा निर्माण होतील याबाबतीत अंतर्मुख होण्याची गरज आहे. राज्यातील काही नगरपरिषदा आणि काही नगरपालिकांच्या या वर्षी सार्वत्रिक निवडणुका झाल्या, देश स्तरावर निवडणुका झाल्या, त्या अत्यंत शांततेत पार पाडण्यासाठी महाराष्ट्राला कमालीचे यश आले. कोणत्याच केंद्रावर फेर मतदान घ्यावे लागले, बुथ ताब्यात घेतला गेला, असे झाले नाही. अशाप्रकारे कायदा व सुव्यवस्था राखण्यामध्ये पोलीस दल कमालीचे यशस्वी ठरले. गेल्या वर्षी ईद आणि गणेशोत्सव एकाच वेळेस आलेला होता अशा संवेदनशील बाबी असतानासुध्दा पोलीस बंदोबस्त चोख ठेवल्यामुळे गुन्हेगारी कोठे दिसली नाही. मी नेहमीच पाहिलेले आहे की, काही विभाग हे लोकांच्या चर्चेचे विषय रहातात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.आर.आर पाटील (पुढे चालू..

पोलिसांची संख्या असतांनासुध्दा राज्यामध्ये कोणी सुरक्षित नाही, अशी टीका करणारे, त्यांना दिलेल्या पोलीस संरक्षणामध्ये एखादा पोलीस कमी केला तर त्यांना असुरक्षित वाटायला लागते.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार... 17:40

श्री. आर.आर. पाटील....

एका बाजूला विश्वास नाही असे वातावरण निर्माण करावयाचे आणि दुस-या बाजूला संरक्षणासाठी दिलेला एखादा पोलीस कमी झाला की, असुरक्षिततेची भावना व्यक्त करायची. याचा सरळ अर्थ असा आहे की, केवळ राजकीय अभिनिवेशातून टिका केली गेली पाहिजे. आणि तोच करण्याचा प्रयत्न आज काही सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्यातून झाला. मी या विषयाकडे बघतांना रजाकीय अभिनिवेशातून नक्की बघत नाही. आणि केवळ पोलीस दलाला आरोपीच्या पिंज-यात उभे करण्याचा प्रयत्न कुणी केला तर सगळी शक्ती पणाला लावून तसे मी करुही देणार नाही. घटना काय घडल्या याचाही बारकाईने विचार केला पाहिजे. प्रत्येक नेत्याला आपले कार्यकर्ते सांगतात तेवढे सत्य वाटत असते.आज जर बघितले तर कालच्या घडलेल्या घटनेनंतर सगळयात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करणारे फोन कुठल्या पक्षातील कार्याकर्त्यांनी केले असतील तर सन्माननीय सभापती महोदय, मला या गोष्टीचा खेद होतो, वाईट वाटते. पण "तुम्ही गृहमंत्री असतांना सुध्दा पोलिसांनी आम्हाला काहीही सहकार्य केले नाही", असे म्हणणारे जास्त फोन राष्ट्रवादी कॉन्ग्रेस पार्टीतून आले. मुख्यमंत्र्याकडे तक्रारी केल्या. त्यांनीही त्यांच्या काही भावना बोलून दखविल्या. आज सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या आणि सदस्यांच्या या बाबतीतील काय प्रतिक्रया आहेत त्याही सदनाने ऐकल्या. सभापती महोदय, कुणाच्या दोषासाठी आपण पोलिसांना आरोपीच्या

पिंज-यात उभे करीत आहोत, याचाच विचार केला जाण्याची गरज आहे. चुकणार आम्ही आणि आरोपीच्या पिंज-यात उभा राहणार पोलीस. सांगली जिल्हयात काही महिन्यापूर्वी एक खूप मोठी टिका पोलीसदलावर झाली. एक घटना अशी घडली होती की, ती कदाचित नीलमताईंना माहीत असेल. जन्म देणा-या पित्याने आपल्या मुलीवर बलात्कार केला होता. सभापती महोदय, घराघरात पोलीस रक्षणासाठी ठेवला जऊ शकतो. एवढे मोठे पोलीस दल आपल्याजवळ आहे. मुलीचे गुंडापासून संरक्षण किंबहुना समाजव्यवस्थेची जबाबदारी आहे, राज्य सरकारची जबाबदारी आहे. पण पित्यापासून मुलीचे संरक्षण ही जबाबदारी कुणाची असू शकते? चो-या वाढल्या की, पोलिसांना आरोपीच्या पिंज-यात टाकले जाते. कधी तरी आपण अर्थ कारणाचाही विचार करण्याची कां गरज भासू नये? जर समाजामध्ये गरिबी असेल, दारिद्रय असेल, वाढती बेकारी असेल तर या सगळया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील..

घटनांचा परिणाम होतच असतो.चो-या तरी कुठल्या समाजव्यवस्थेत आज नाहीत? इंग्लड, अमेरिका सुध्दा या पासून पूर्णपणे बाजूला होऊ शकलेले नाही. तेथेही काही प्रमाणात हे गुन्हे घडत आहेत. बलात्कारासारख्या बाबीपासून या जगातले प्रगत देश सुध्दा पूर्णपणे मुक्त होऊ शकलेले नाहीत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.येथे जो विषय मांडला गेला त्यासंदर्भात बोलत असतांना इंग्लड अमेरिकेत काय चालले आहे, जगामध्ये काय चालले आहे याची जशी मंत्रिमहोदयांना माहिती आहे तशी आम्हालाही थोडी माहिती आहे. आपल्याकडे काय चालले आहे? आता गेल्या वर्षभरामध्ये तुमची सत्ता आल्या नंतर काय सुरु आहे त्याबद्दल मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हया घटनांच्या संदर्भात सदस्यांनी जी जी वक्तव्य केली, ती जर सगळी वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकणार असाल (अडथळा)

(काही सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. आर.आर.पाटील :सभापती महोदय, आपण सगळे उल्लेख करणार, कंटाळा येईपर्यंत बोलणार आणि उत्तर देतांना मात्र त्याला प्रतिबंध करणार? आपण मला प्रतिबंध करु शकत नाही. आपण बलात्काराबद्दल बोललात. आपण माझ्या वक्तव्याबद्दल बोललात, आपण पक्षाच्या भूमिकेबद्दल बोललात, सगळेच सदस्य बोलले. केवळ निवडणुकीपुरते आणि या घडलेल्या घटनेपुरते कुणी बोलले नाही.एका बाजूने सगळ्या पोलीस दलाला सगळया कामांच्या बाबतीत क्रिटिसाईज करण्याची भूमिका घ्यायची आणि दुस-या बाजूने शांतपणाने उत्तरही ऐकून घ्यायचे नाही.

( काही सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपसभापती** :सर्व सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही या घटनेच्या पलिकडे काहीच बोललो नाही.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपले सगळे सदस्य कुठल्या, कुठल्या विषयावर बोलले आहेत ते प्रोसिडिंग काढून वाचा आणि मग मला सांगा. एका बाजूने राज्यामध्ये पोलिसांचे संख्याबळ कमी आहे. पण या सदनामध्ये सन्माननीय सदस्यांनी या निवडणूकीमध्ये गांभीर्याने जी

..3..





श्री. आर. आर. पाटील...

बाब लक्षात आणून दिली त्यानंतर राज्य सरकारने काही भूमिका घेतल्या आणि या परिसरात कमी मनुष्यबळ असेल तर मनुष्यबळ वाढते दिले पाहिजे म्हणून जिथे निवडणूका आहेत त्या ठिकाणी पोलीस वाढवून देण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

नवी मुंबईमध्ये राज्य पोलीस दल 1300 होते, राज्य राखीव पोलीस दलाच्या 6 कंपन्या अतिरिक्त दिल्या. रेल्वे पोलीस दल 100 ने अधिकचे वाढवून दिले. अंबरनाथला 1 पोलीस उपायुक्त, 1 पोलीस सहआयुक्त, 1 पोलीस निरीक्षक, पोलीस, महिला पोलीस, राज्य राखीव दल पोलीस कंपनी 200 आणि साधारणत: 2 हजार जवान, क्विक रिस्पॉन्स टीम आणि कमांडो दिले. अंबरनाथच्या निवडणुका शांततेने पार पाडण्यासाठी आवश्यक असणारे सर्व मनुष्यबळ त्या ठिकाणी देण्यात आले होते. तीच स्थिती बदलापूरची होती. तीच स्थिती औरंगाबादची होती. सभापती महोदय, या ठिकाणी ज्या पहिल्या घटनेचा उल्लेख केला गेला तो उल्लेख लातूरच्या घटनेच्या बाबतीत करण्यात आला. 11.00 वाजताच्या दरम्यान श्री. मारोती इटनकर याच्याबद्दल सेनेच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतला की, याने एकदा मतदान केले आहे आणि हा दुसऱ्यांदा मतदान करीत आहे. आक्षेप घेतल्यानंतर तो ओरडून सांगत होता की, मी पूर्वी मतदान केलेले नाही आणि यांचा आक्षेप होता की, त्याने एकदा मतदान केले आहे. ही बाब पूर्णपणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कक्षेमधील होती. परंतु ज्यावेळी तो म्हातारा टाहो फोडून सांगत होता त्यावेळी शिवसैनिक आले आणि त्यांनी त्याला चोपले. या घटनेची सुरुवात इथून झाली. तो तसाच ओरडत बाहेर आला. त्या ठिकाणी काँग्रेसचे कार्यकर्ते बूथवर थांबलेले होते. मला मतदान करु देत नाही, मला मारले ही तक्रार त्याने ज्यावेळी केली त्यावेळी दुसऱ्या बाजूने काँग्रेसचे कार्यकर्ते उठले आणि जाब विचारावयास गेले. मी इतकेच विचारु इच्छितो की, जो जर खोटे मतदान करीत होता तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे तक्रार करण्यास आपला मार्ग मोकळा होता. असा एखादा लेखी अर्ज कोणी दिला होता काय ? असा अर्ज कोणी दिला नाही. काही जणांचा असा समज झाला आहे की, पुढे सैनिक लावून घेतल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांपासून डायरेक्ट जाब विचारण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त होतो, कारण आपण सैनिक आहोत. त्या मतदाराला मारले नसते तर पुढचे प्रसंग घडले नसते. दोन शिवसैनिकांना मारल्यानंतर त्यांनी पोलिसात जाऊन तक्रार नोंदवावयास पाहिजे होती. त्यांनीही तक्रार नोंदविली नाही. त्यांनी पाच पन्नास शिवसैनिक जमा केले आणि काँग्रेसच्या दहा वीस कार्यकर्त्यांना जाब विचारण्यासाठी धावून जाण्याची भूमिका घेतली. आपल्या कार्यकर्त्यांवर हल्ला होतो म्हटल्यानंतर शहरातील आणखी काँग्रेसचे कार्यकर्ते जमले. पोलिसांना मध्ये यावे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

श्री. आर. आर. पाटील .....

लागले आणि काँग्रेसचे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते ज्या दिशेला होते त्या दिशेला गोळीबार करावा लागला, लाठीचार्ज करावा लागला. या ठिकाणी काँग्रेसचे कार्यकर्ते, राष्ट्रवारी काँग्रेसचे कार्यकर्ते टीका करीत आहेत की, ज्यांनी आमच्या मतदाराला मारले त्यांना आम्हाला जाब विचारु देत नाहीत आणि ज्यावेळी आम्ही मर्दुमकी आणि मर्दानगी दाखववायस पुढे आलो त्यावेळी पोलीस आमच्यावर गोळीबार करीत आहेत. आमच्या मतदाराला मारले त्यावेळी गोळीबार का केला नाही ? शिवसैनिकांना वाचविण्याची भूमिका पोलीस दल घेत आहे ही टीका एका बाजूने आहे तर आमच्या जिल्हा प्रमुखावर दगडफेक केली अशी टीका दुसऱ्या बाजूने आहे. या गुन्हयाची सुरुवात कोठून झ ाली ? ती झाली नसती तर कदाचित पुढचा सगळा प्रसंग घडला नसता. सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये श्री. म्हात्रे, शाखा प्रमुख हे रात्री अडीच वाजता तू राष्ट्रवादीचा प्रचार का करतो म्हणून जाब विचारावयास गेले. रात्री अडीच वाजता दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्याच्या घरी जाब विचारण्यास जाण्याची आवश्यकता आहे काय ? दुसऱ्याच्या घरी रात्री अडीच वाजता घुसण्याचा अधिकार कोणी दिला ? त्या ठिकाणी कायदा कोणी हातामध्ये घेतला ? एका बाजूने रात्री अडीच वाजता दुसऱ्याच्या घरात जाऊन घुसण्याची, जाब विचारण्याची भूमिका घ्यावयाची, जणू काही आपल्यालाच जाब विचारता येतो अशा पध्दतीने करावयाचे. तरी सुध्दा असे प्रकार घडता उपयोगाचे नाही, जाब विचारण्यास गेला असेल तर तुम्ही त्याला पकडून द्यावयास पाहिजे होते, तुम्हाला मारण्याचा अधिकार कोणी दिला हा जाब मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना विचारला. ज्यावेळी माझ्याकडे तक्रार आली की, आमच्याच घरी येऊन दम देतो, जाब विचारतो, त्यावेळी काही लोकांनी प्रतिकार केला. बाकीच्या कार्यकर्त्यांना कळले. तेही त्या ठिकाणी जाऊन आले.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

आणि ज्यांच्या घरी जाब विचारण्यासाठी गेला त्यांच्या घराच्या हद्दीमध्ये हल्ला झाला, काठीने मारले होते, परंतु दुस-या दिवशी 300 शिवसैनिक पोलीस स्टेशनवर जमले आणि 307 चा गुन्हा लावला पाहिजे अशी आग्रही भूमिका त्यांनी घेतली. विश्वास बसला पाहिजे आणि असा प्रसंग घडला आहे. असा प्रसंग घडला आहे आणि पुन्हा असा प्रसंग घडू नये म्हणून पोलिसांनी 307 कलम लावण्याची भूमिका घेतली. काल कोर्टामध्ये ही केस गेल्यानंतर विरोधी पक्षाचे वकीलच सांगू शकले नाहीत की तेथे 307 कलम का लावले ? तरी सुध्दा पोलिसांनी जो उल्लेख केला ते 307 चे कलम कमी करण्याची कोणतीही भूमिका घेतलेली नाही आणि आजही 307 खालीच या संपूर्ण घटनेचा तपास सुरु आहे. एक गोष्ट मी कबूल करीन की, मोहोळच्या घटनेबाबत...

श्री.अनिल परब : सभापती महोदय, ज्यावेळी कोर्टामध्ये हे प्रकरण गेले तेव्हा विरोधी पक्ष कधीही हरकत घेत नाही. हे समर्थन पोलिसांनी करावयाचे असते की, 307 आम्ही का लावले आहे ? पोलिसांनी समर्थन केले नाही म्हणून 307 चे 326 कलम केले गेले आहे. मी पोलीस स्टेशनकडून ही माहिती घेतलेली आहे.

श्री.आर.आर.पाटील : मा.सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांचे भाषण सुरु असताना 307 कलमाचे 326 कसे झाले असा उल्लेख झाला आहे. ही माहिती घेण्यासाठीच मी आपल्या दालनामध्ये बसलो होतो. मी स्वत: पोलीस आयुक्तांबरोबर बोललो आहे. आताही तपास 307 खाली सुरु आहे आणि पोलिसांकडून हे कलम कमी करण्याची भूमिका स्वीकारलेली नाही आणि स्वीकारली जाणार नाही. जामीन देणे हा पूर्णपणे कोर्टाचा अधिकार आहे आणि जी बाब न्यायधीशांसमोर असते त्यासंबंधी निर्णय घेण्याची जबाबदारी आणि अधिकार न्यायधीशांचा आहे. जामीन कसा मिळाला हे न्यायाधीशांना कसे विचारणार ? (अडथळा) सभापती महोदय, कलम 307 खाली तपास सुरु आहे आणि न्यायालयाने जामीन दिलेला आहे. अंबरनाथला उपविभाग प्रमुखाची निवडणुकीच्या वादातून हत्या झालेली आहे आणि या गोष्टीचे कोणीही समर्थन करु शकत नाही. ज्यांची हत्या झालेली आहे त्यांनी तेथे माझ्या जीवाला धोका आहे अशी थोडीशी कल्पना दिली असती तरी चालले असते. कारण ज्या ज्या उमेदवारांनी, ज्या ज्या लोकप्रतिनिधींनी संरक्षण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

मागितले या निवडणुकीच्या कालावधीमध्ये मोकळेपणाने देण्याची भूमिका स्वीकारली होती. जयेंद्र हजारे हे आंबेडकर नगरमध्ये राहत होते. प्रचार करुन रात्री 1.30 वाजताच्या सुमारास घरी आल्यानंतर दबा धरुन बसलेला सुनील वाघमारे आणि त्यांच्या साथीदाराने त्यांच्यावर हल्ला केला. याप्रकरणी पोलिसांनी हयगय न करता जे आरोपी आहेत त्यापैकी 5 आरोपींना पकडण्याचे काम निश्चितपणे केले आहे. जे आढळतील आणि जे या तपासामध्ये निष्पन्न होतील त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी कोणताही प्रत्यवाय येऊ शकत नाही, कोणताही निर्बंध असू शकत नाही. परंतु याच्यातून किती राजकारण करावयाचे याही गोष्टीचा तपास झाला पाहिजे. सुनील वाघमारे हे आरपीआयमध्ये आहेत. हे फक्त सहा महिन्यापूर्वी शिवसेनेमध्ये होते. ते आपल्या पक्षाचे नगरसेवक होते. त्यांनी आपल्या व्हीपप्रमाणे मतदान केले नाही. म्हणून त्यांना पक्षातून काढून टाकण्याची भूमिका स्वीकारली गेली. हे थोडेसे जुने भांडण आहे. त्यांनी एकमेकांच्या विरोधात निवडणुका लढविलेल्या होत्या. शिवसेनेमध्ये असतानाचे हे संघर्ष आहेत आणि आज ते उफाळून आले. येथे खून घडला आहे यासंबंधी मी एवढीच ग्वाही देईन की, कोणाचेही समर्थन कधीही शक्य नाही, जी म्हणून कारवाई करावी लागेल यासाठी जे पुरावे गोळा करावे लागतील, मयत झालेला कार्यकर्ता कोणत्या पक्षाचा आहे यापेक्षा हे खूनी आहेत असे पाहूनच सगळे खरे गुन्हेगार शोधले जातील आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल. आतापर्यंत पोलिसांनी केलेली कार्यवाही ही योग्य पध्दतीने आहे. मोहोळच्या घटनेचे समर्थन करु शकत नाही आणि कोणालाही करणे शक्य नाही. यातील जे गुन्हेगार आहेत मग ते मधुकर दगडू माळी, पोपट नागनाथ उरणे, राजू भगिरथ गूण, बापू चंदू उघडे, मारुती तुकाराम उघडे या सगळया गुन्हेगारांना पकडण्यात आले आहे. याच्यातील एक आरोपी फरार आहे. त्यासाठी 3 टीम करण्यात आल्या आहेत.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...

तेही आरोपी लवकर सापडतील. हे जुने भांडण होते. या देशमुखांच्या बाबतीत मा.सदस्य श्री.रावतेसाहेब मी आपणास सांगू इच्छितो की, आपण महाराष्ट्रभर फिरता त्यामुळे यांच्या बंधुचे व्यवसाय थोडसे तपासून बघा. पोलीस स्टेशनवर हल्ला झाला तो खून झाला म्हणून झाला की त्या परिसरातील धाडसाने अवैध धंदे बंद केले म्हणून झाला हे तपासून बघा ? मी बालू इच्छित नाही, कारण त्यांचे एक भाऊ मयत झाले आहेत. पण त्यांचे कोणते उद्योग व्यवसाय होते आणि कोणते गुन्हे त्यांच्यावर रजिस्टर आहेत याची थोडीशी आपण माहिती घ्या. एका बाजूने अवैध धंदे बंद केल्यानंतर चिडलेल्या काही लोकांनी या खुनाचा फायदा घेऊन पोलीस स्टेशन जाळून टाकण्याची भूमिका स्वीकारली. राजन पाटलाच्या संदर्भात पतसंस्थेचे करण मी समजू शकतो. पण रस्त्यावर असणारी 38 दुकाने सुध्दा जाळण्याची भूमिका स्वीकारली. नेमके आज जे पोलिसांना दोष देत आहेत त्यांचा पोलिसांवर आणि कायदा आणि सुव्यवस्थेवर पहिल्यांदा विश्वास आहे काय की मनगटरावरच विश्वास आहे ? या गोष्टीचा प्रथम खुलासा करण्याची आवश्यकता आहे. चालते तेथे मनगट चालवाचे आणि जेथे चालत नाही त्याठिकाणी पोलिसांवर टीकाटिपणी करायची ही दुटप्पी भूमिका सोडून देण्याची गरज आहे. याठिकाणी कोट्यवधी रुपयांची मालमत्ता या खुनानंतर जळलेली आहे. जे दोषी असतील त्यांना कोणीही कुठे वाचविण्याचा प्रयत्न करु शकत नाही आणि तसा प्रयत्न केला जाणार नाही या गोष्टीची मी आपल्याला ग्वाही देतो. पण त्याच बरोबर कुठलाही प्रसंग घडला तर पोलीस स्टेशन जाळणॄ, तहसिलदार कार्यालय पेटवणे, बसेस फोडणे, लोकांच्या मालमत्ता जाळणे ह्या भूमिकाही राज्यामध्ये सहन केल्या जाऊ शकत नाहीत. म्हणून मागील एका घटनेमध्ये मी सांगितले की, अशा मालमत्ता जळल्या तर जाळणारे जे आरोपी आहेत त्यांची प्रसंगी मालमत्ता विकून या वसुली केल्या पाहिजेत आणि जे नुकसान होते ते भरुन काढण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे आणि तशाच त-हेची भूमिका येथेही स्वीकारली जाईल. ज्यावेळी सुरुवातीला 50-60 जणांचा मॉब चालून आला त्यावेळी पोलीस स्टेशनमधील काही लोक पळून गेले.स्टाफ कमी होता. पण आता पळपुटया पोलिसांची गय करण्याची भूमिका सुध्दा स्वीकारणे उचित ठरणार नाही. जाब विचारायला आल्यानंतर पळून जाण्याची भूमिका स्वीकारली जात असेल आणि जे स्वत:च्या कार्यालयाचे संरक्षण करु शकत नसतील तर ते जनतेच्या जिविताचे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...

आणि मालमत्ते रक्षण कसे करु शकतील ही भूमिका घेऊन त्यांना पोलीस दलामध्ये ठेवायचे की नाही वा अन्य कोणती शिक्षा द्यायची याचाही विचार आम्ही अतिशय गांभीर्याने करीत आहोत. मी मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आज जर या निवडणुका धाकदपटशाच्या वातावरणात झाल्या असत्या, सत्तेचा आम्ही शंभर टक्के गैरवापर केला असता, गुंडगिरी, पैसा अशा सर्व मार्गांचा अवलंब आम्ही केला असता तर बदलापूरला भारतीय जनता पार्टीची मेजॉरिटी येऊन त्यांचा नगराध्यक्ष कसा निवडून आला असता ? अंबरनाथला शिवसेना कशी निवडून आली असती? आज औरंगाबादला त्यांची मेजॉरिटी कशी होऊ शकली असती ? उलट आम्ही सत्तेत असताना तुम्ही निवडून येता याचा अर्थ पोलिसांनी त्यांची कामगिरी चोखपणे केलेली आहे. मोकळेपणाने निवडणुका होतील अशा पध्दतीचे वातावरण पोलिसांनी ठेवलेले आहे. लोक आमच्या पक्षाच्या विरोधात जाऊन तुम्हाला मतदान करण्याइतपत मोकळया वातावरणामध्ये होते. म्हणूनच तुम्ही निवडून येऊ शकलात. सभापती महोदय, ही तर गोष्ट पहिल्यांदा कबूल केली पाहिजे की, खोटी मतपत्रिका, खोटी ओळखपत्रे तयार करणारी यंत्रणा पोलिसांनी वेळीच पकडलेली आहे...(अडथळा) पोलीस दलाने ती यंत्रणा पकडली या गोष्टीवर आपण विश्वास ठेवा. त्यांना त्या गोष्टीसाठी मुक्तता दिली नाही आणि आज कोणत्याही पक्षाने स्वत: साव आहे आणि दुसरीकडे चोर आहेत असे म्हणण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही. त्यामुळे मी मा.विरोधी पक्षनेते श्री.गडकरीसाहेबांना सांगू इच्छितो की, यापेक्षा अधिक बोलण्याची आवश्यकता नाही. काल नवी मुंबइर्मध्ये 1400 लोक पकडले. एखाद्या आमदाराने तेथे जाऊन निवडणुका शांततेने होतात की नाहीत हे पाहणे मी समजू शकतो. पण शाखाच्या शाखा उठवून नव्या मुंबईमध्ये ऐन निवडणुकीच्या दिवशी संचार बंदीची भूमिका स्वीकारलेली असताना, सीपीने सर्व जनतेला, दुस-या शहरातील माणसांनी निवडणुकीच्या निमित्ताने कायदा आणि सुव्यवस्था ठेवण्यासाठी सहकार्य करावे अशा पध्दतीची भूमिका घेतलेली असताना मा.सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी माझ्या या प्रश्नाचे उत्तर देण्याची आवश्यकता आहे की, किती शिवसैनिक काल नव्या मुंबईत ठाण मांडून बसले होते ? प्रचाराची मुदत संपल्यानंतरही तेथे राहाण्याची कोणती आवश्यकता होती ?

**(सभापतीस्थानी मा. सभापती)**

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ प्रथम श्री.शिगम 18:00

श्री. आर.आर.पाटील...

सभापती महोदय, राज्याच्या गुप्तचर विभागाकडून माहिती मिळाली होती की, काही लोकांचा मतदान बुथ ताब्यात घेण्याचा डावा होता. त्या परिसरामध्ये गोंधळ घालावयाचा होता. परंतु तुमचा हा डाव हाणून पाडल्यामुळे त्यासंबंधीची तुमची पोटतिडीक मी समजू शकतो. या राज्याचा मी गृहमंत्री असेपर्यन्त ही संधी आपल्याला कधीही मिळणार नाही या गोष्टीची ग्वाही या राज्यातील जतनेला मी देतो...

श्री. दिवाकर रावते : या ठिकाणी माझ्या नावाचा मघाशी उल्लेख केला गेला. काल नवीन मुंबईत 144 कलम लावला गेलेला असताना सन्माननीय मंत्री श्री. गणेश नाईक यांच्यामागे जवळपास 400 ते 500 लोक होते. त्यांना कलम 144 लागू नव्हता काय याचा या ठिकाणी गृह मंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांचे तेथे गाव आहे. ते त्यांच्या गावात फिरत होते. परंतु मुंबईतून तुम्हाला नवीन मुंबईत जाण्याची गरज काय होती ? श्री. गणेश नाईक यांचा मतदार तेथे आहे. त्यांचे गाव तेथे आहे. त्यांचे व्यवसाय त्या ठिकाणी आहेत. परंतु मुंबई येथून नवीन मुंबईत जाऊन निवडणूक प्रक्रियेमध्ये अडथळा आणण्यासाठी काही तुमचे काही लोक तेथे गेले होते, मतदान बुथ ताब्यात घेण्याच्या उद्देशाने तुमचे लोक त्या ठिकाणी गेले होते. परंतु या गोष्टी करण्यास त्यांना व्यत्यय आणल्यामुळे त्यांच्यामध्ये पोटशूळ उठलेला आहे. या गोष्टी करता आल्या नसल्यामुळे ते चिडणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रात झुंडगिरी करुन बुथ ताब्यात घेण्याचे दिवस आता संपलेले आहेत एवढीच मी या ठिकाणी कल्पना देऊ इच्छितो. या महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जे करणे शक्य होते ते सगळे केलेले आहे. म्हणून निवडणूका खूल्या आणि मोकळया वातावरणामध्ये झालेल्या आहेत. भविष्यात तरी आत चूका चालत नाहीत असा काही जणांनी बोध घेण्याची आवश्यकता आहे. रात्री तीन-तीन वाजता जाब विचारावयास जाणे, कोणी खोटे मतदान करण्याचा मलाच अधिकार आहे असे समजून हातात कायदा घेणे या भूमिका भविष्यात सोडण्याची आवश्यकता आहे.राज्यातील पोलीस दल जास्तीत जास्त निपक्षपातीपणे वागेल असा आमचा प्रयत्न आहेच. परंतु आपण देखील पोलीस दलाकडे निपक्षपातीपणेच बघण्याची आवश्यकता आहे. एका विभागाचा मंत्री आहे म्हणून संपूर्ण पोलीस दलास आरोपीच्या पिंज-यात उभे करणे योग्य नाही. या चारही प्रकारामध्ये पालिसांनी कुठेही

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

हलगर्जीपणा केलेला नाही. पोलिसांकडून हलगर्जीपणा होऊ शकत नाही या बाबतीत सदनाला ग्वाही देतो. या ठिकाणी काही सूचना चांगल्या भावनेने झालेल्या आहेत. त्या सूचनांच्या बाबतीत जरुर दक्षता घेतली जाईल. या ठिकाणी काही अधिका-यांच्या नावांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यांच्यावर आरोप करण्यात आला की, त्यांनी एकतर्फी कारवाई केली. दोन्ही, तिन्ही बाजुने अशा प्रकारच्या तक्रारी सांगण्यात आलेल्या आहेत. पोलीस दल निपक्षपाती असले पाहिजे या भूमिकेशी शंभर टक्के मी सहमत आहे आणि त्या भूमिके बरोबर मी कायम राहीन. ज्या अधिका-यांच्या बाबतीत उल्लेख झालेले आहेत, त्यांच्या बाबतीत जरुर चौकशी केली जाईल. कोणी अधिकारी चुकला असेल तर त्यास पाठिशी घालण्याची भूमिका स्वीकारली जाणार नाही. परंतु आपण टीकेसाठी टीका करणे आणि कुठल्या तरी स्टेटमेंटचा गैरअर्थ काढणे,त्यातून आव्हान देण्याची भाषा करणे श्री.रावते साहेब आपल्या सारख्या सिनियर माणसाला हे न शोभणारे आहे. मी शिवसेनेच्या संदर्भात कोणतीची भूमिका व्यक्त केली नव्हती.पण जे गुन्हेगारी स्वरुपाचे आहेत त्यांना ठेवावेच लागेल अशा स्वरुपाचे वाक्य मी उदगारले होते. या राज्याच्या गृहमंत्र्यांनी गुन्हेगारांना ठेचावयाचे नाही तर कोणाला ठेचावयाचे याचे आपणच मला उत्तर द्यावे. जे कायदा मोडत असतील त्यांना धडा शिकविण्याची भूमिका आम्हाला घ्यावीच लागेल. पण बाहेर फेकलेला हा दगड जणू काही आपल्यालाच लागला अशा पध्दतीने आपण मनाला का लावून घेत आहात ? आपल्याला बोलण्याचा मुळीच उद्देश नव्हता. पण मी केलेली टीका आपल्याला फीट बसत असेल तर त्यामध्ये मी दोषी ठरत नाही. आपण अशी केलेली टीका, गुन्हेगांरावर केलेली टीका, देशद्रोहयांवर केलेली टीका आपल्याला लागू पडणार नाही असे आपण वागले तर माझ्या स्टेटमेंट ऐकण्याची काहीही गरज नाही. सभापती महोदय,..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय....

**सभापती** : आपण जे बोललात ते सगळयांनी ऐकू न घेतलेले आहे. तेव्हा माननीय मंत्र्यांचे उत्तर तुम्हाला ऐकून घ्यावे लागेल.

3...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित आहे. दोन तीन घटना घडलेल्या आहेत. या घटनेची सुरुवात कोणी केली होती याचा वेध घेण्याची आवश्यकता आहे. आजपर्यन्त निपक्षपातीपणाने काम करणारे पोलीस दल भविष्यात देखील निपक्षपातीच राहील, त्यांना आपण सगळयांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय,....

**सभापती :** नियम 97 खाली उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेनंतर प्रश्न विचारण्याची पध्दत नाही. नियम 260 अन्वये चर्चा असेल तर चर्चेनंतर प्रश्न विचारता येतात.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. दिवाकर रावते असे म्हणाले की, कलम 144 असताना मा.मंत्रीमहोदय जे नवी मुंबईचे आहेत ते आपल्याबरोबर 400 लोक घेऊन तेथे फिरत होते. त्यावेळी गृहमंत्र्यांनी असे उत्तर दिले की, ते 400 लोक घेऊन फिरत होते ते स्थानिक होते. याचा अर्थ स्थानिक मंत्र्यांना 144 कलमाचा भंग करुन 400 लोकांना घेऊन फिरण्याचा अधिकार आपण दिला आहे काय ? प्रत्येक मंत्री आपल्या गावात असे करील. कायदा आणि सुव्यवस्थेबाबत सांगत असताना यांनी कायदा मोडला तरी चालेल असे मंत्रीमहोदय सांगत आहात.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय,स्थानिक लोकांना सुध्दा अशा प्रकारे फिरण्याचा अधिकार नव्हता. परंतु बाहेरील लोकांनी येऊन निवडणूक प्रक्रियेमध्ये व्यत्यय आणू नये अशी ठाम भूमिका पोलिसांनी घेतली असे असताना बाहेरच्या लोकांना ताब्यात घेण्यात आले. त्या डिस्टींक्शनमध्ये जाण्याचे काम 70 टक्के पेक्षा अधिक लोक सीपींचा नियम मोडून यशस्वी ठरलेले एका पक्षाचे आहेत त्यांचे नांव मी सांगण्याची आवश्यकता नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय,मा.उपमुख्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले ते रोग कोणता आणि इलाज काय अशा प्रकारचे आहे . हे संपूर्ण राजकीय उत्तर आहे. ज्या उद्देशाने आम्ही ही चर्चा घडवून आणली त्याबाबतीत आमची अशी अपेक्षा होती की भविष्य काळात महाराष्ट्रातील पोलिसांचा कारभार बदलण्यासाठी काही सूचना केल्या जातील परंतु तसे न करता या चर्चेला राजकीय स्वरुप दिले. निवडणुका म्हटल्यानंतर सर्व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते येणार अशा प्रकारची राजकीय भाषणे न करता आम्ही जे प्रश्न उपस्थित केले त्याला मा.गृहमंत्र्यांनी उत्तर दिले असते तर आम्ही त्याचे स्वागत केले असते एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

**सभापती :** ही चर्चा आता येथे संपलेली आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विरोधी पक्षनेत्यासंबंधी घोषणा.

**सभापती** : माझ्याकडे महाराष्ट्र विधानमंडळ शिवसेना-भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र विधानमंडळ पक्षाच्या नेत्यांनी दिनांक 4 एप्रिल,2005 रोजी पत्र देऊन असे कळविले आहे की,विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेता म्हणून श्री. नितीन जयराम गडकरी यांच्याऐवजी श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर यांची दिनांक 11 एप्रिल,2005 रोजी पासून निवड करण्यात येत आहे. तरी याबाबतची घोषणा सभागृहात करण्यात यावी, सदर पत्रावर,

1. श्री. गोपीनाथ मुंडे,भाजपा विधीमंडळ पक्षनेते.
2. श्री. नारायण राणे,शिवसेना विधीमंडळ पक्षनेते तथा विरोधी पक्षनेता,विधानसभा
3. श्री. नितीन जयराम गडकरी,विधानपरिषद सदस्य तथा अध्यक्ष भाजपा,महाराष्ट्र
4. श्री. मधुकर सरपोतदार,शिवसेना,विधानपरिषद गटनेते
5. श्री. मधु चव्हाण,प्रतोद,भाजपा,विधानपरिषद सभागृह
6. डॉ. दीपक सावंत,प्रतोद,विधानपरिषद सभागृह

यांच्या सहया आहेत.

श्री.नितीन जयराम गडकरी,वि.प.स. यांची दिनांक 20 जुलै 2002 रोजी विरोधी पक्षनेते म्हणून निवड झाली होती. आता त्यांच्या ऐवजी विरोधी पक्षनेते म्हणून श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर हे दिनांक 11 एप्रिल,2005(मध्यान्होत्तर पासून) विरोधी पक्षनेते म्हणून राहतील असे मी घोषित करीत आहे. अधिनियम व नियमाप्रमाणे उपलब्ध असणा-या सोयी सवलती त्यांना मिळतील.
श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर यांनी आता विरोधी पक्षनेत्याचे स्थान ग्रहण करावे.

( श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर यांनी विरोधी पक्षनेत्याचे स्थान ग्रहण केले.)

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, वरिष्ठ सदनाचे विरोधी पक्ष नेता म्हणून माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांची निवड आज आपण घोषित केलेली आहे. त्या निवडीचे मी पहिल्यांदा स्वागत करत आहे. अनेक दिवसांपासून त्यांची निवड होणार असल्याचे वर्तमानपत्रातून आम्ही सगळेजण वाचत होतो. परंतु त्यांची निवड होण्यासाठी मुहूर्त सापडत नव्हता. आज हा मुहूर्त सापडला आहे आणि या पदावर त्यांची रितसर निवड झाली आहे. विधान सभेचे सदस्य म्हणून गेल्या अनेक वर्षापासून मी श्री.पांडुरंग फुंडकर यांचे काम अतिशय जवळून पाहिलेले आहे. ते अत्यंत सौम्य प्रकृतीचे आहेत. शेतकरी आणि कामगार यांच्या प्रश्नासबंधी विशेषत: कापूस उत्पादक शेतक-यांच्या प्रश्नासबंधी त्यांनी अत्यंत प्रभापवीपणे आपले विचार या सभागृहात मांडलेले आहेत. लोकसभेचे सदस्य म्हणूनही त्यांनी काही वर्षे दिल्लीमध्ये काम केले होते. संसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी आहे.विदर्भासारख्या मागासलेल्या भागातून ते येथे आलेले असल्यामुळे विदर्भाच्या विकासाच्या संदर्भात त्यांच्या ज्या काही संकल्पना आहेत. त्या त्यांनी अनेक ठिकाणी अनेक वेळा मांडलेल्या आहेत. या पुढच्या काळात सुध्दा ते आपले विचार या सभागृहात मांडत राहणार याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. त्यांच्या कारकिर्दीला मी शुभेच्च्छा देतो . विधिमंडळाच्या कामकाजात विरोधी पक्ष नेता म्हणून जी जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आलेली आहे ती जबाबदारी ते उत्तम प्रकारे पार पाडतील याबद्दल मला शंका नाही. सदनाचे कामकाज व्यवस्थितपणे होण्यासाठी सहकार्याची भूमिका लागत असते हे सहकार्य मी त्यांच्याकडून अपेक्षित केले तर ते चुकीचे ठरणार नाही. असे मला वाटते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचे एका बाजूला स्वागत करीत असतांना दुस-या बाजूला सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या बाबतीत मी हे सांगू इच्छितो की, विरोधी पक्ष नेता म्हणून त्यांनी अतिशय प्रभावीपणाने काम केलेले आहे याची आठवण आज आमच्या सर्वाच्या मनात राहणार आहे. सभापती महोदय, हे दोघेही विदर्भातील असले तरी दोघांच्या प्रकृतीत खूप अंतर आहे.पूर्वीच्या काळात जहालमतवादी आणि मवाळमतवादी अशी संकल्पना समोर मांडली जावयाची.स्वातंत्र्याच्या लढयात अशा दोन संकल्पना मांडल्या जात होत्या. परंतु कोणी जहाल किंवा मवाळ मतवादी असले तरी सर्वाचे उद्दिष्ट एकच असावयाचे. त्यांची मत मांडण्याची पध्दत कदाचित वेगळी असेल, आक्रमकता कदाचित वेगळी असेल परंतु मूळ उद्देश मात्र एकच होता. समाजामध्ये ते ज्यांचे प्रतिनिधित्व करीत आहे त्याला न्याय मिळवून देणे हा त्यांचा उद्देश होता व

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MAP/ KGS/ प्रथम श्री

श्री.विलासराव देशमुख .......

त्यांच्या या भूमिकेत काही फरक पडत असेल असे मला वाटत नाही. या मुद्यापासून कोणी बाजूला जाणार नाही असे मला वाटते.विरोधी पक्ष नेते म्हणून श्री.नितीन गडकरी यांनी काम करीत असतांना आपले आगळे वेगळे अस्तित्व या सदनात निर्माण केलेले आहे. कोणत्याही प्रश्नाच्या संदर्भात बोलत असताना त्या प्रश्नाच्या मूळाशी जाण्याचा त्यांचा स्वभाव होता. कोणताही विषय मांडत असतांना त्या विषयाचा ते पूर्ण अभ्यास करीत असत..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गायकवाड नंतर --- 18:15

श्री.विलासराव देशमुख ...

त्यासाठी एखादा निष्णात वकील कोर्टामध्ये ज्याप्रमाणे आर्ग्युमेंट करतो, पुराव्यानिशी, अगदी संपूर्ण तयारीने बसतो त्याप्रमाणे विषयाचा सखोल अभ्यास करून, कागदोपत्रासह भूमिका मांडण्याचा त्यांनी या ठिकाणी नेहमीच प्रयत्न केलेला आहे. प्रामुख्याने मागासलेल्या भागाला न्याय मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी मांडलेली भूमिका, कापूस उत्पादकांना न्याय देण्याचा केलेला प्रयत्न, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो वा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न असो, कोणताही विषय असा नाही की त्यामध्ये त्यांनी स्वत:ला झोकून दिलेले नाही. तेव्हा अतिशय अभ्यासपूर्ण असे त्यांचे वक्तव्य आणि नेमके त्या प्रश्नावर बोट ठेवून आणि समोरच्या माणसाला त्यांच्या शैलीमुळे कित्येकदा गोंधळून जायला व्हायचे आणि तसे ते व्हावे आणि त्यातून आपल्याला पाहिजे तसे उत्तर मिळावे हाही हेतू त्यांचा असायचा, असे त्यांनी बऱ्याचदा येथे केलेले आहे पण आमचे मंत्री देखील तरबेज असल्याने त्यांच्या या शैलीला ते फसले नाहीत हा भाग वेगळा. पण केव्हा केव्हा असे होत असे आणि शिवाय या बाजूने बोलताना असलेली मर्यादा आणि जबाबदारी लक्षात असल्याने मंत्री देखील सांभाळूनच उत्तर देत असतात. पण एकूणच त्यांचे या सदनातील वास्तव्य आणि काम यांची जाणीवपूर्वक नोंद राहील यात शंका नाही. असा जबरदस्त विरोधी पक्षनेता बाजूला गेल्याचे समाधान अर्थातच नाही म्हटले तरी असतेच. परंतु ते समाधान फार काळ टिकेल असेही नाही. कारण आता नव्याने विरोधी पक्षनेता या पदावर येणारे सन्माननीय श्री.फुंडकर हे मधल्या फळीतील बॅटस्‌मन असले तरी तेही चिवट असेच आहेत आणि ते सरळपणे आम्हाला मोकळीक देतील असे नाही. कारण शेवटी माणसातील कर्तृत्त्व दाखविण्याची संधी त्याला मिळाली पाहिजे आणि ती मिळाल्यावरच तो आपल्यातील गुण दाखवून देऊ शकतो तसेच जबाबदारी अंगावर पडल्यानंतर माणूस अधिक जबाबदारीने ती स्वीकारतो त्याप्रमाणे जबाबदारी एकदा अंगावर आल्यानंतर म्हणजे त्या खुर्चीवर बसले की ती खुर्चीच अनेकदा शिकवत असते की हा रोल कसा पार पाडायचा ते. तेव्हा सन्माननीय श्री.फुंडकर हे त्याला न्याय देण्याचे काम निश्चितपणे करतील यात शंका नाही. आपल्यातील झालेले स्थानांतर किती सहजतेने झाले आहे, जरूर त्याला वेळ लागला आहे, पण एका पदावरून दुसऱ्या पदावर ज्या सहजतेने आपण बसलात, हा बदल, हे बाजूला होणे हे लोकशाहीला शोभणारे असेच सत्तांतर-स्थानांतर आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. शेवटी प्रत्येकाला संधी ही मिळाली पाहिजे आणि त्यातून प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळाला पाहिजे

.... क्यूक्यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देशमुख ...

अशी भूमिका या सदनामध्ये आपण घेतली आहे हेही योग्य असेच आहे. त्यामुळे आम्ही एकाचे स्वागत करतो आणि त्याच बरोबर सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी विरोधी पक्षनेता म्हणून आतापर्यंत पार पाडलेली जबाबदारी आणि या सभागृहामध्ये व साऱ्या महाराष्ट्रभर वठवलेली भूमिका ही निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. सरकारवर टीका करताना अनेकदा कटुता निर्माण व्हायची पण ती कटुता त्यांनी वैयक्तिक पातळीवर आणली नाही, येऊ दिली नाही त्यामुळेच त्यांचा मित्र परिवार देखील मोठा आहे, त्यांच्या स्वभावामुळे देखील त्यांचा मित्रपरिवार मोठा वाढलेला आहे. त्यांचे अनेक किस्से सहजतेने सदनाच्या बाहेर जेव्हा आम्ही बसतो तेव्हा आम्ही बोलतो. कोणत्या हॉटेलमध्ये कोणते पदार्थ चांगले मिळतात यासाठी मेनूकार्ड पाहण्याची आम्हाला गरज भासत नाही. मुंबईतीलच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रात कोणते उत्तम पदार्थ कोठे मिळतात याची माहिती त्यांच्याकडून आपल्याला केव्हाही मिळू शकते. त्या क्षेत्रातील माहिती देखील त्यांच्याकडे तयार असते. म्हणूनच त्या दृष्टीनेदेखील वजनदार असे त्यांचे व्यक्तीत्व लक्षात घेता, अशा प्रकाराने देखील मित्रपरिवार तयार करून सदनातील कामकाजाला न्याय मिळवून देण्याची भूमिका त्यांनी पार पाडलेली आहे. अशा त्यांच्या जागेवर आता नवीन व्यक्ती येत आहे तिचे स्वागत करतानाच दुसऱ्या बाजूला त्या जागेवरून खाली उतरणाऱ्याला निरोप द्यायचा अशी संमिश्र भावना आम्हाला येथे आज अनुभवायला मिळते आहे. तेव्हा आपल्या कामकाजाबद्दल बोलताना, आपले काम आम्हाला अनेक वेळा येथे अडचणीचे ठरले असले तरी ....

( यानंतर श्री. जागडे .... आरआर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख....

तरी विरोधी पक्षनेता म्हणून त्यांची चांगले काम केले आहे, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे. आता त्यांच्यानंतर या जागेवर येणा-या माणसांवर निश्चितपणे ओझे असणार आहे. परंतु मा. फुंडकर यांना माननीय गडकरी हे निश्चितपणे मार्गदर्शन करतील, अशी मला आशा आहे. याबद्दल शंका बाळगण्याचे काहीच कारण नाही. मी माननीय विरोधी पक्षेनेते श्री. फुंडकर यांचे मनापासून स्वागत करीत आहे. महाराष्ट्रातील जनतेला न्याय देण्याची तसेच शासनावर योग्य प्रकारचा अंकुश ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली आहे. ते आपली घटनात्मक जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडतील याची मला खात्री आहे. त्यांना मी शुभेच्छा देत आहे आणि त्यांचे अभिनंदन करीत आहे. माननीय गडकरी जरी दुस-या जागेवर बसले असले तरी ते त्या ठिकाणी सरळ आणि सहज बसणार नाहीत. परंतु त्यांनी थोडासा विसावा घ्यावा आणि आपला वेळ बाहेर द्यावा अशी विनंती करतो आणि पुन्हा एकदा मा. फुंडकर यांचे स्वागत करुन माझे दोन शब्द संपवितो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडला आहे, त्याला पाठींबा देण्यासाठी आणि माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे. आज मा. फुंडकर विरोधी पक्षनेतेपदी येत आहेत आणि श्री. गडकरी हे त्या पदाचा राजिनामा देत आहेत. मा.गडकरी आपल्या पदाचा राजिनामा देणार आहेत, असे वृत्त मी दीड महिन्यापूर्वी वर्तमानपत्रातून वाचले होते. मला त्यावेळी क्षणभर असे वाटले की, या बाजुला एका पक्षाला मुख्यमंत्री पद गेल्यानंतर दुस-या पक्षाला उपमुख्यमंत्री पद मिळते. फक्त उप लावावे लागते. परंतु ती सोय त्या बाजुला नाही. त्या बाजुला उप लावता येत नाही. उप विरोधी पक्षनेता नसतो. मी सदनातील पक्षीय संख्याबळाचा विचार केला. तेव्हा मला असे दिसून आले की, भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेकडे समान संख्याबळ आहे. विधानसभेकडे विराधी पक्षनेतेपदी शिवसेनेचे श्री. नारायण राणे आहेत. आता या ठिकाणी गडकरी यांनी राजिनामा दिल्यामुळे निम्मी निम्मी वाटणी होणार आहे काय ? असा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला. पक्षाच्या अध्यक्षपदी श्री. नितीन गडकरी यांची नियुक्ती झाल्यामुळे त्यांनी विरोधी पक्षनेतेपदाचा राजिनामा दिला आहे. त्याच्या पक्षाच्या ध्येय्य धोरणामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजिनामा दिला आहे. फुंडकर हे खासदार होते. ते सहकारी बँकेत काम करीत आहेत, पणनसंघामध्ये काम करीत आहेत. सभापती महोदय, सहकारी बँकेच्या कामाबाबत मा. फुंडकर यांना चांगला अभ्यास आहे.त्यामुळे ते या पदाला निश्चित न्याय देतील. याबद्दल दुमत नाही. मला या निमित्ताने श्री. नितीन गडकरी यांच्या बाबत काही बोलावयाचे आहे. काही व्यक्तिमत्व असे असते की, ते पदाला मोठे करते. माननीय श्री. नितीन गडकरी यांनी विरोधी पक्षनेता या पदाला मोठे केले आहे. माननीय गडकरी हे बांधकाम मंत्री असताना त्यांनी नवीन संकल्पना स्वीकारली होती. शक्यतो कोणताही राजकारणी लोकांच्या विरुध्द वागत नाही, त्यांच्या खिशाला हात घालत नाही. परंतु लोकांचा रोष पत्करुन त्यांनी महाराष्ट्रात टोल संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी काही रस्त्यांना टोल लावला होता आता प्रत्येक रस्त्याला टोल कसा लागेल, अशा प्रकारची भूमिका आम्ही घेत आहोत.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

सभापती महोदय, एकच व्यक्ती काही कामे करु शकते. परंतु काही कामांचे निर्णय असे असतात की, त्यातून अनेक ांना मार्ग दिसतात, अनेक कामे उभी रहातात. आज राज्यामध्ये काही प्रमाणात रस्ते चांगले होतांना दिसतात. त्याला या पर्यायापेक्षा दुसरा कोणत्याही पध्दतीचा पर्याय या राज्यासमोर नव्हता. सत्ताधारी पक्षात असतांना एक चांगला मंत्री म्हणून आपण आपली छाप पाडली होती. फारसा गाजावाजा न करता एक यशस्वी मंत्री म्हणून त्यांचा उल्लेख त्या काळातील आम्हा विरोधकांना करावा लागत होता. विरोधासाठी विरोध करण्याची भूमिका नेहमी स्वीकारली जाते. आणि मी तर बारकाईने बघतो की, आज गृह खात्यावर चर्चा करतांना मी जर त्या बाजूला असतो तर तिकडचे लोक बोलले तशीच भाषणे केली असती, ते जर या बाजूला असते तर मी जे भाषण केले तसेच भाषण त्यांनी केले असते. लोकशाहीमध्ये माणसे बोलतात की, ज्या खुर्चीवर ते बसले आहेत त्या खुर्च्या बोलत आहेत असे प्रसंग बऱ्याच वेळा घडत आहेत. युती सरकारच्या वेळी त्यांचे मंत्री जशी उत्तरे द्यायचे, आज त्या ठिकाणाहून प्रश्न विचारल्यानंतर ईकडून तशी उत्तरे दिली जात आहेत. परवा एक विनोदी प्रसंग घडला. त्या काळात महसूलमंत्री माननीय श्री. नारायण राणेसाहेब असतांना त्यांनी जो निर्णय घेतला होता, त्या निर्णयाच्या बाबतीत त्यांनी एक तारांकित प्रश्न विधानसभेत उपस्थित केला. सभापती महोदय, आपण ज्या आसनावर बसला आहात, ज्या बाजूला बसला आहात त्या बाजूला न्याय देण्याच्या भूमिकेतून अशा भूमिका स्वीकारल्या जात आहेत. परंतु मा. श्री. गडकरीसाहेब मी नेहमी आपल्यामध्ये वेगळाच स्पार्क बघितला. केवळ विरोधासाठी विरोध ही भूमिका न घेता कधी कधी सत्ताधारी पक्षाच्या आवाजात आवाज मिसळून ज्या काही ठाम भूमिका राज्याच्या विकासासाठी घेतल्या पाहिजे त्याचे उघड समर्थन करण्याची भूमिका आपण स्वीकारली. आज कापूस एकाधिकार योजना असेल, वीज बिल माफीचा प्रश्न असेल, पाणीपट्टीचा प्रश्न असेल. जरी राजकीयदृष्टया ऐन निवडणुकीच्या तोंडावर लोकांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला तरी या सभागृहामध्ये बोलतांना अनेक वेळा महाराष्ट्राचा खरा हितचिंतक ही आपली भूमिका कधी लपून राहिली नाही. विरोधी पक्ष याचा अर्थ सत्ताधारी पक्षाच्या पायात प्रत्येक ठिकाणी पाय अडकवून काहीही न होऊ देणे, सत्ताधारी पक्ष बदनाम होईल, अडचणीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

येईल एवढीच गणिते न बांधता या राज्यातील विरोधकांनी व सत्ताधा-यांनी महाराष्ट्राच्या व्यापक हितासाठी हातात हात घातले पाहिजेत या विधायक विरोधाची भूमिका व्यक्त होतांना त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिली आहे. माननीय श्री. गडकरी साहेब आपल्यावर पक्षाने जबाबदारी सोपविल्यामुळे जरी हे पद आपल्याला सोडावे लागले असेल तरी मी आज खुलेपणाने मान्य करीन की, महाराष्ट्रामध्ये स्तुती करण्यासाठी मी फारसा प्रसिध्द नाही. असलो तर मी टीका करण्यासाठी जास्त प्रसिध्द आहे. पण मी ही गोष्ट प्रांजळपणे कबूल करीन की, आपण जी कारकीर्द विरोधी पक्ष नेतेपदी भूषविली तिची सुध्दा महाराष्ट्राला आठवण राहील. झालेल्या अपघातामुळे आपली तब्येत काही वेळा बरी नसतांना या सदनामध्ये आपल्याला उठून उभे राहून बोलता येत नसतांना आपण चिकाटी सोडली नाही. प्रसंगी शारिरीक वेदना सहन करीत आपण खऱ्या अर्थाने ती बाजू झुंजला. विधायक दृष्टीने लढला. याही पदावर आपण आपला ठसा उमटविला. आणि हे पद मोठे करण्याचा प्रयत्न केला. सभापती महोदय, आज एकंदरीत लोकशाहीबद्दल अनेक भावना व्यक्त होत असतांना सभागृहातील कामकाजाबद्दल सुध्दा लोक बाहेर काय बोलतात. यावर विचार करण्यासारखी आणि सर्वांनीच अंतर्मुख होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. लोक फार चांगले बोलत नाहीत, माध्यमे खाजगीमध्ये चर्चा करतात. परंतु आपल्याला प्रिव्हिलेज असल्यामुळे ते लिहू शकत नाही. लोकांमध्ये बोलण्याची क्षमता नसल्यामुळे लोक बोलत नाही. परंतु एक गोष्ट कुठेतरी कबूल करावी लागेल की, दिवसें दिवस दर्जा घसरतो आहे. आणि हा घसरलेला दर्जा या बाजूने आणि समोरच्या बाजूने वाढविण्याची निंतात आवश्यकता आहे. विधानसभेला वेगाच्या बाबतीत मर्यादा आणणे आणि घाईघाईने घेतलेल्या निर्णयाच्या बाबतीत पुर्नविचार करायला भाग पाडणे आणि अधिक व्यापकतेने चर्चा करणे ही विधानपरिषदेची आणि राज्यसभेची नेहमीची वैशिष्ठये राहिलेली आहेत.

( यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

किंबहुना त्यासाठीच हे सदन आहे. या सदनाचे आणखी एक वैशिष्टय आहे की, समाजातील जो स्तर राजकारणासारख्या धकाधकीमध्ये येऊ शकत नाही असे विद्वान, विविध क्षेत्रामध्ये काम करणारे लोक या सदनामध्ये आले पाहिजेत. पण आज राजकारणामध्ये सक्रीय असलेल्या कार्यकर्त्याला "तु विधानसभेची निवडणूक लढवितोस की विधान परिषदेची निवडणुक लढवितोस", एकेकाळी विधान परिषदेची निवडणूक लढविणे हे कमी खर्चाचे मानले जावयाचे. पण आज विधान परिषदेला उभे राहणे, सभापती महोदय, एकवेळ लोकसभा परवडली पण विधान परिषद परवडत नाही अशा पध्दतीची कार्यकर्त्यांची भावना आहे. आता सगळेच लोक तशा पध्दतीचा उपयोग करुन निवडून येत आहेत असे नाही. पण आज विधान परिषदेसारख्या ठिकाणी सुध्दा निवडून येत असताना पैशाचा उपयोगच होत नाही असे म्हणणे म्हणजे आपण आपलीच फसपणूक करुन घेण्यासारखे आहे. अनेक क्षेत्रातील लोक माननीय राज्यपालांकडून पाठविले जात असताना, विविध विभागांतून निवडून येत असताना खरेतर विधानसभेपेक्षा वेगळी चर्चा या सदनामध्ये नेहमीच अपेक्षित आहे. मग तिथलाच राजकीय अभिनिवेष, प्रत्येक प्रश्नाकडे राजकीय पाहणे, तशाच पध्दतीने वेल मध्ये येणे, तशाच पध्दतीने सभागृहाचे कामकाज थांबणे हे या सदनाच्या परंपरेमध्ये न बसणारे आहे. राजकीय अभिनिवेशाच्यावर हे सदन असले पाहिजे आणि विधानसभेला आणि लोकशाही प्रक्रियेला मार्गदर्शन करत मजबूत करण्याची प्रक्रिया या सदनाने बजावली पाहिजे. केवळ सत्तेतील एक बाजू या गोष्टी करु शकत नाही, तर यासाठी पुढच्या बाजूचे सुध्दा तितकेच सहकार्य असेल तर या गोष्टी होऊ शकतील. सुदैवाने पुढच्या बाजूला खूप चांगले बोलू शकणारे, अभ्यास असणारे लोक आहेत. या सदनाचा दर्जा आणखी ऊंच होऊ शकतो आणि यात भर घालण्याची क्षमता असलेले माननीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांसारखे, ग्रामीण क्षेत्रातून आलेले, शेतीशी अत्यंत जवळून निगडित असलेले, समाजाचे बारकावे माहिती असलेले एक जाणते नेतृत्व या पक्षाने आज विरोधी पक्षनेते पदासाठी नियुक्त केले आहे आणि आपण त्याची अधिकृत घोषणा सुध्दा आज केलेली आहे. माझी अपेक्षा आहे की, लोकशाहीमध्ये देवाणघेवाण करीत असताना, सत्तेच्या बाजूने या सदनाचा नेता म्हणून आमच्या भूमिका ताठर असणार नाहीत, त्या लवचिक असतील. देवाणघेवाण करुन प्रश्न सुटू शकतील, तडजोडीने हे सदन अत्यंत चांगल्या प्रकारे काम करु शकेल. आपले वेगळेपण दाखवू शकेल. माननीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, याबाबतीत आमचे

. . . .2 टी-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

आपल्याला सहकार्य राहील. शेवटी जनतेचे प्रश्न मांडणे, त्याच्यावर मार्ग सुचविणे हेही त्याबाजूचे काम चोखपणाने करावयास आमच्याबाजूने सहकार्य राहील. माझी विनंती राहील की, आपलेही तशा पध्दतीचे सहकार्य आम्हाला राहीले पाहिजे. गडकरीसाहेब, जो विधायक विरोधकाचा दृष्टीकोन स्विकारत होते. आपली सुध्दा आजपर्यंतची कामाची, वागण्याची पध्दत तीच आहे, उलट कधी-कधी गडकरीसाहेब, चिडत देखील होते. एखादा प्रश्न आवश्यकतेपेक्षा सुध्दा लावून धरत होते. त्याबाबतीत आपण थोडेसे मर्यादा पुरुषोत्तम म्हणूनच, मर्यादा पाळणारे म्हणून आजपर्यंत आम्ही आपल्याकडे बघितले आहे आणि तशीच प्रतिमा आपल्याबद्दलची आमच्या मनामध्ये आहे. पण मी म्हटले की, ब-याच वेळेला खूर्ची बोलावयास भाग पाडते आणि खूर्चीच बोलते. गडकरीसाहेब, आज ज्या खूर्चीवर बसले आहेत, त्याच खूर्चीवर आज त्यांना जसे शांत, संयमी, सहकार्याची भूमिका घेत, योग्य प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम आपण केले, तसेच जर या खूर्चीवर बसल्यानंतर आपण वागलात तर आणखी मोठे व्हाल आणि आपली प्रतिमा आणखी मोठी होईल. आपण तशा पध्दतीचे सहकार्य आम्हाला कराल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. गडकरीसाहेबांनी त्यांच्या पक्षाच्या बाबतीत जी जबाबदारी घेतलेली आहे, त्या कामात शुभेच्छा देणे हे तर आम्हीही पक्षाचे कार्यकर्ते असल्यामुळे शक्य नाही. कारण त्यांना शुभेच्छा देणे, त्यांचा पक्ष वाढू दे असे म्हणणे म्हणजे आमचे काय होणार ? हा महत्वाचा प्रश्न आहे. म्हणून त्याबाबतीत मी नक्की शुभेच्छा देत नाही. पण आपला जो विधायक दृष्टीकोन आहे, आम्ही त्याचा आदर मात्र नक्की करु. म्हणून माननीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, आपल्याला आमच्या मनापासून शुभेच्छा आहेत. या राज्याच्या हितासाठी तुमचे विरोधी पक्षनेते पद आम्हाला प्रसंगी अडचणीमध्ये आणणारे ठरले तरी चालेल, पण या राज्याचा गाडा मार्गावरुन चालला पाहिजे. कारभार चांगला झाला पाहिजे याबाबतीत तुमचे मार्गदर्शनही आम्हाला अपेक्षित आहे. मी या सदनातील दोन्ही ज्येष्ठ नेत्यांना शुभेच्छा देतो.

जय हिंद . धन्यवाद.

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते म्हणून या सदनातील माझे मित्र श्री. पांडुरंग फुंडकर यांची नियुक्ती आज आपण जाहीर केली, त्याचवेळी आजचे विद्यमान विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरी यांचे कार्य गेली तीन वर्षे या सदनामध्ये पहाण्याची मला संधी मिळाली. आज ते त्या पदावरून निवृत्त झाले. लोकशाहीत सगळ्यात मोठी परंपरा आहे की, एक पदावरून गेल्यानंतर दुसरे पदावर येतात, काही लोक देशाच्या पातळीवर, राज्याच्या पातळीवर काम करण्यासाठी जातात, काही लोक निवृत्त होतात. ही जबाबदारी मोठी आहे. सन्माननीय श्री. नितीन गडकरीजींनी ज्या पध्दतीने विरोधी पक्ष नेतेपदाची जबाबदारी सांभाळतांना ज्या पध्दतीने त्यांनी केले ती पध्दत निश्चितच गौरवास्पद अशी आहे. सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांची आणि माझी केवळ येथेच भेट झाली असे नाही तर लोकसभेमध्ये ते माझ्या बरोबर होते. मला त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर मी येथे आलो आणि सन्माननीय श्री.फुडकर साहेबही येथे आले आणि आमची भेट झाली. शेवटी लोकशाही व्यापक आहे. कोठे ना कोठे काम करण्याची संधी येते आणि भेट होत असते. श्री.फुंडकर यांच्यावर खूप मोठ जबाबदारी आता येऊन पडलेली आहे. आपण महाराष्ट्रामधील अनेक सत्तांतरे पाहिलेली आहेत. जनतेला सर्वसाधारणपणे दिलासा देणारे शासन असावे आणि शासनाच्या जर काही चुका होत असतील तर त्यांच्यावर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्षाला करावे लागते. ते काम आपण सर्वजण येथे काम करत असतो. आपली राजकीय मते निराळी असू शकतात, पण त्यासाठी वैरभाव असतो असे नाही. पक्षाची भूमिका घेऊन आपण लोकांसमोर जातो, त्या पक्षाचीच भूमिका लोकांना पटते, त्या प्रमाणात लोक त्यांना निवडून देतात. समाजातील लोकांना ज्या पक्षाची भूमिका कमी प्रमाणात पटते, त्या पक्षाचे लोकही कमी प्रमाणात निवडून येतात, त्यामुळे त्यांना विरोधी पक्षात बसावे लागते, ही लोकशाहीची खरी परंपरा आहे. लोकशाही प्रकल्भ व्हावयाची असेल तर विरोधी पक्षाची मोठी जबाबदारी आहे. त्यामध्ये विरोधी पक्ष नेत्यांचे काम असे असते की, सत्ताधारी पक्षाच्या कृतीवर लक्ष ठेवणे, जी विकासाची पावले टाकलेली आहेत, त्या बाबतीत पूर्ण लक्ष ठेवून त्यांच्या प्रत्येक कृतीला, अडथळा निर्माण करणे. त्या कृतीमुळे जनतेचे नुकसान होणार नाही, अशा पध्दतीने त्या गोष्टींकडे पहाणे हे अतिशय महत्वाचे आहे. सन्माननीय श्री.फुंडकर साहेबांच्यावर नव्याने जबाबदारी येऊन पडलेली आहे. सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांना विरोधी पक्ष नेते म्हणून काम करताना मी समक्ष पाहिलेले आहे. विशेषत: अनुशेषाच्या प्रश्नावर शासन आणि विरोधी

SKK/ MAP/ KGS

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू...

पक्ष यामध्ये संघर्ष निर्माण झाला, त्यावेळेस सनमाननीय श्री.गडकरी साहेबांनी घेतलेली भूमिका अत्यंत नि:पक्षपातीपणने घेतली आहे. न्याय तत्वाप्रमाणे काय व्हायला पाहिजे, तसे झाले नाही तर काय करायला पाहिजे, याबाबतीत टोकापर्यन्त जाऊन शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे, याला इतिहासात तोड नाही. शासनकर्त्यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे, हा शासनकर्त्यांचा स्थायी भाव असतो. तो निर्णय प्रसंगी परत घेण्याची त्यांची भूमिका नसते. अशा पर्श्वभूमीवर जनतेसमोर ते प्रश्न नेऊन जे काही घडते त्याची प्रतिकृती जनतेसमोर ठेवणे, याबद्दलची भूमिका विरोधी पक्ष नेता म्हणून त्यांनी चोखपणाने बजावत असतांना प्रसंगी आग्रही भूमिका घेतली. मा.मुख्यमंत्री असो, उपमुख्यमंत्री असो, अन्य कोणी मंत्री असो, त्यांच्याशी त्यांनी वैयक्तिक कटुता येऊ दिली नाही.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 18:40

श्री. मधुकर सरपोतदार..

हे खरे लोकशाहीचे सगळयात मोठे कर्तृत्व आहे. आमचे मतभेद शासनाच्या कामाबद्दल आहेत, कामाच्या पध्दतीबद्दल आहेत. जे निर्णय होतात, त्यांच्या परिणामाबद्दल आहेत. पण त्याबाबत आपण सूचना दिली की, हा निर्णय असा न घेता असा घेतला तर जनतेला जास्त उपकारक होईल, अशा पध्दतीने भूमिका मांडली तर ती जास्त प्रभावी ठरते आणि हेच खरे म्हणजे विरोधी पक्षाचे काम असते. चूकीचे निर्णय अडविणे आणि योग्य निर्णयाला पाठिंबा देणे हे विरोधी पक्षाचे खूप मोठे काम आहे. या दृष्टीकोनातून आमचे नवीन विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्यावर खूप मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. विविध प्रकारची आयुधे आपल्या जवळ आहेत. कोणत्या आयुधाचा कधी उपयोग करावयाचा आणि तो प्रभावीपणे कसा करायचा याचा शोध त्यांना घ्यावा लागेल. पण एक गोष्ट चांगली आहे. विरोधीपक्षनेता म्हणून ज्यांचा भरपूर अनुभव आहे, ते विरोधी पक्षनेते त्यांच्या डाव्या बाजूला बसले आहेत. आणि उजव्या बाजूला माननीय उपसभापती बसले आहेत. या दोघांच्यामध्ये आता आमचे विरोधीपक्षनेते बसणार आहेत. माननीय विरोधी पक्ष नेता श्री. नितीन गडकरी यांना त्यांच्या पायाच्या दुखण्यामुळे पहिल्या स्थानावर बसायला मिळत होते. पण श्री. फुंडकरीजी आता तूमच्या एका बाजूला श्री. नितीन गडकरी आणि दुस-या बाजूला उपसभापती या दोघांच्या मध्ये बसून हा परत तुम्हाला एक बॅलन्स सांभाळावयाचा आहे. ही खूप मोठी जबाबदारी आपल्या शिरावर येऊन पडलेली आहे. पण एक गोष्ट चांगली असते की, उपसभापती सहसा येथून काही बोलत नाहीत. फक्त महत्वाचा प्रश्न आला की, झटकन वरुन येथे खाली येऊन बसतात आणि माझे मत आहे म्हणून सांगतात. आता तो त्यांचा मताचा अधिकार कुणी काही काढून घेतलेला नसतो. पण पक्षाला वाचवायचे असेल तर कसे झटकन ते येथे येऊन कृती करतात हेही आम्ही पाहिलेले आहे. शेवटी या सगळया प्रकारच्या चलाख्या या लोकशाहीच्या सदनामध्ये कराव्याच लागतात. लोकशाहीमध्ये जी काही आयुधे निरनिराळया माध्यमातून प्राप्त झालेली आहेत. त्या आयुधांचा योग्य प्रकारे वापर करुन या सदनातील आपले काम जास्तीत जास्त यशस्वी कसे होईल हे पाहण्याचे काम येथील प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी केले पाहिजे,अशी आमची त्या बाबतची भूमिका असते. आम्ही कितीही आरडा-ओरडा केला तरी त्याबाबतीत आमचा व्यक्तिगत स्वार्थ काहीही नसतो. आम्ही ज्यावेळी चर्चा मागतो त्यावेळी जनतेचे काही प्रश्न असतील तीच चर्चा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

मागतो. जनतेवर अन्याय होत असेल तेच विषय आम्हाला येथे मांडावयाचे असतात. माझी पूर्ण खात्री आहे की, आमचे श्री. पांडुरंग फुंडकर सुध्दा जितके लढाऊ आहेत तितके आक्रमक आहेत. जितके सौम्य आहेत तितके ते जास्त आक्रमकसुध्दा आहेत ही गोष्ट मी अतिशय जवळून पाहिली आहे.त्यांना लोकसभेचा अनुभव आहे. विधानसभेचा अनुभव आहे.आता विधान परिषदेत ते येऊन बसलेले आहेत. म्हणजे लोकशाहीची ही जी तीन मंदिरे आहेत त्या तिन्ही मंदिरातील त्यांचा प्रगल्भ अनुभव आहे. या अनुभवाच्या बळावर त्यांना विरोधीपक्ष नेत्याची जी जबाबदारी प्राप्त झालेली आहे त्या जबाबदारीला ते पूर्ण न्याय देतील. या न्यायामुळे सर्वसाधरण बाहेरची जनता, भारतीय जनता पक्ष, शिवसेना, अन्य सर्व पक्ष, ज्या ज्या ठिकाणी अन्याय होतो त्या त्या ठिकाणी त्यांचे नेतृत्व उभे राहील आणि त्या सगळयांना न्याय देण्याचे ते काम करतील. माझी पूर्ण खात्री आहे.सन्माननीय उपमुख्यमंत्री, सन्माननीय मुख्यमंत्री ज्या ज्या वेळी असा प्रसंग येईल त्या त्या वेळी योग्य निर्णय घेण्यासाठी या विरोधी पक्षांची साथ घेतील. त्याप्रमाणे त्यांना सहकार्य पण करतील. वेळप्रसंगी दोन पावले मागे जाण्याचा प्रसंग आला तरी तो सुध्दा राज्यकर्त्या पक्षाने स्वीकारावा. आम्हाला दोन पावले पुढे टाकण्याचा प्रसंग आला तर आम्ही ती दोन पावले पुढे टाकू. पण प्रसंगी ती दोन पावले मागे पण घेऊ. अशा प्रकारचा हा एक डाव-पेचाचा भाग असतो. तो करण्यामध्ये ते कुठे कमी पडतील असे मला वाटत नाही. श्री. नितीनजी गडकरी यांचा सहवास आम्हाला लाभणारच आहे. त्यांचे मार्गदर्शन आहे. त्यांनी आज पर्यंत केलेली सगळी डावपेचाची आखणी भविष्यकाळामध्ये श्री. पांडुरंग फुंडकरजी यांना सुध्दा मिळणार आहे. आणि या सगळयांच्या सहकार्यामधून भविष्यकाळामध्ये विरोधी पक्षाची जबाबदारी जास्तीत जास्त प्रभावीपणे या सदनामध्ये पार पाडण्याची जबाबदारी श्री. पांडुरुग फुडकरजी पार पाडतील असा मला विश्वास वाटतो. मी त्यांना माझ्या तर्फे आणि माझ्या पक्षातर्फे हार्दिक शुभेच्छा देतो. धन्यवाद.

---------

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते म्हणून श्री. भाऊसाहेब फुंडकर यांची आज जी निवड झाली त्याबद्दल मनापासून अभिनंदन करण्यासाठी आणि त्यांच्या कामासाठी शुभेच्छा देण्यासाठी मी येथे उभा आहे. श्री. भाऊसाहेब फुंडकर हे विदर्भातील शेतकरी कुटुंबातून राजकीय जीवनामध्ये आलेले आहेत. आणि आपल्या राजकीय पक्षाशी ठामपणाने बांधिलकी स्वीकारत त्यांनी हा जो प्रवास केला आहे त्या प्रवासामध्ये त्यांना ंससदीय कामकाजाचा विपूल अनुभव त्यांच्या गाठिशी आहे. तीन वेळा लोकसभेवर, दोन वेळा विधानसभेवर आणि आज ते विधानपरिषदेमध्ये आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाला न्याय देण्याचे जे बेसिक मटेरियल आहे, ते निश्चितपणे त्यांच्याजवळ आहे. त्यांच्या कामाची तुलना सभागृहात होणार, त्यांच्या पक्षात होणार आणि बाहेरही होणार. या सभागृहाचे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते म्हणून काम करीत होते.मंत्रीपद यशस्वीरित्या सांभाळून ते विरोधी पक्ष नेतेपदी ज्यावेळी आले त्यावेळी विरोधी पक्षनेत्याला असणा-या विविध आयुधांचा वापर करुन अनेक प्रश्नांना न्याय मिळवून देण्यामध्ये.........

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख .....

महाराष्ट्रातील अनुशेषग्रस्त भागाला न्याय मिळवून देण्यासाठी त्या पदावरुन महत्तम काम करणारे विरोधी पक्ष नेते अशा प्रकारचा त्यांचा उल्लेख इतिहासामध्ये करावा लागेल. एवढा त्यांनी त्या पदावरुन त्या प्रश्नाला उठाव देण्याचा प्रयत्न केला. हा तुलना करण्याचा विषय कधीच नसतो. याचे कारण असे की, बाळंतपण आणि लोकप्रतिनिधित्व हे एकदम वैयक्तिक असते. एखादी महाराणी असली तरी तिला दाईला असे सांगता येत नाही की तू जाऊन एवढी डिलीव्हरी करुन घेऊन ये. तसेच लोकप्रतिनिधित्वाचे आहे. या ठिकाणी सर्व सहकारी असतात, पक्ष असतो, मदत असते, कार्यालय असते, सर्व गोष्टी असतात पण शेवटी जी जबाबदारी येते ती बाळंतपणासारखीच वैयक्तिक असते. तो परफॉर्मन्स त्या व्यक्तीशी मर्यादित असतो. म्हणूनच या ठिकाणी तुलनेचा प्रश्न नसतो. एकदा सुरुवात केल्यानंतर असे लक्षात येईल की, सन्माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांची जी पार्श्वभूमी आहे, गेल्या अनेक वर्षाचे त्यांचे काम आहे, त्या कामाला त्यांनी उत्तमरितीने न्याय दिलेला आहे. मी त्यांना त्यांच्या भविष्यातील जबाबदारीबद्दल शुभेच्छा देतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर यांना आपण आज या सभागृहाचे माननीय विरोधी पक्ष नेते म्हणून जाहीर केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी आज विरोधी पक्ष नेते म्हणून निवृत्ती स्वीकारली. या सभागृहाचे एकोणीसावे विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांनी काम केले आणि विसावे विरोधी पक्ष नेते म्हणून सन्माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्याकडे जबाबदारी आलेली आहे. राजकारणामध्ये आम्ही कित्येक वर्षे काम करीत आहोत परंतु या सभागृहामध्ये नवीन सदस्य म्हणून त्यांच्याकडून आमचे प्रबोधन झालेले आहे. या सभागृहामध्ये आपण ज्या ज्या वेळी विरोधी पक्षाची भूमिका बजावित होता, खासकरुन विदर्भाच्या दुष्काळग्रस्त भागासंबंधी , अनुशेषाच्या संदर्भात, घटनेतील कलम 371(2) च्या संदर्भात ज्या ज्या वेळी आपण भूमिका मांडली त्यातून आमचे चांगले प्रबोधन झाले. सन्माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्याकडून आम्हाला या ठिकाणी पुष्कळ शिकावयास मिळाले. त्यांनी विधानसभेचे सदस्य म्हणून काम केले आहे तसेच त्यांनी लोकसभेमध्ये सुध्दा काम केले आहे. आता ते विधान परिषदेमध्ये काम करीत आहेत. आपला जो अनुभव आहे, आपली जी शिदोरी आहे त्या शिदोरीचा आमच्यासारख्या नवीन सदस्यांना फायदा झालेला आहे. आजपासून आपण या सभागृहाचे माननीय विरोधी पक्ष नेते म्हणून काम करणार आहात. माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने मी आपल्याला पुढच्या प्रवासाबद्दल शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्याकडून आम्हाला या सभागृहामध्ये पुष्कळ शिकावयास मिळाले. त्याचे आक्रमक आणि वादळी व्यक्तिमत्व आहे. या सभागृहामध्ये चर्चा होत असताना त्या चर्चेच्या निमित्ताने मांडलेले मुद्दे आणि त्या प्रश्नाला सरकारकडून सकारात्मक उत्तर मिळवावयास पाहिजे त्यादृष्टीने या ठिकाणी मांडलेली भूमिका यामधून या सभागृहामधील नवीन सदस्यांना पुष्कळ शिकावयास मिळाले. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे बांधकाम मंत्री होते आणि बांधकाम मंत्री म्हणून राज्यामध्ये काही नवीन संकल्पना रुजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. बी.ओ.टी. ची संकल्पना त्यांनी मांडली. आज मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे असेल,

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/ श्री.बरवडनंतर 18:50

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.....

मुंबईतील 55 पूल असतील किंवा राज्यातील अन्य भागात आपण बांधकाम मंत्री म्हणून काम उभे केले आहे. आम्ही जरुर टीका करतो, ज्या ज्यावेळी प्रश्न येतात त्या त्यावेळी बोलले जाते की, विदर्भ अनुशेषग्रस्त भाग आहे. परंतु विदर्भात जास्त अनुशेष निर्माण करण्याचे काम तुम्ही त्या निमित्ताने केले असा आरोप आणि आक्षेप आम्ही घेत असलो तरी वस्तुस्थिती अशी आहे की, बांधकाम मंत्री म्हणून या राज्यामध्ये काम केले त्याला तोड नाही. विदर्भाचे स्व.वसंतराव नाईक यांनी 11 वर्षे मुख्यमंत्री म्हणून काम केले, विदर्भाचे स्व.सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून काम केले, विदर्भातील अनेक मोठमोठे नेते मंत्री झाले परंतु विदर्भात मोठे विधायक काम उभे झाले नाही अशा तक्रारी कार्यकर्त्यांकडून, काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून आमच्याकडे वारंवार येत असतात. परंतु बांधकाम मंत्री म्हणून विदर्भातील रस्ते बांधणे असेल, निरनिराळया पुलाचे काम असेल यासाठी पैसा उपलब्ध झाला पाहिजे, ते काम विदर्भाच्या विकासासाठी केले पाहिजे ही आपण प्रामाणिकपणे भूमिका घेतली. बीओटी तत्वावर रस्ते बांधणे ज्याचा उल्लेख मा.उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी केला की, टोल ही संस्कृती या राज्यामध्ये राबविण्याचा प्रयत्न केला आणि आज त्याचा फायदा राज्याला मिळत आहे. श्री.वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार असताना आपल्या याच अनुभवाचा फायदा संपूर्ण देशाला व्हावा म्हणून पंतप्रधान सडक योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला होता, त्या योजनेचे समन्वयक म्हणून आपल्याला नेमले होते. त्यामुळे ख-या अर्थाने देश पातळीवर तुमच्या कामाची दाद भारत सरकारने घेतली होती हे मी नमूद करु इच्छितो.

सभापती महोदया, या राज्याच्या इतिहासामध्ये या सभागृहामध्ये दोन वेळा ॲडव्होकेट जनरलना पाचारण करण्याचे काम तुम्ही केले. 2004-2005 चा अर्थसंकल्प मांडला त्यावेळी लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या त्यामुळे अर्थमंत्र्यांनी पहिल्यांदाच अर्थसंकल्प मांडला होता. त्यावेळी आपण हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता की, कलम 202 अन्वये फायनांशिअल स्टेटमेंट हे फक्त एकदाच करता कामा नये. ज्यावेळी पूर्ण बजेट मांडले जाते त्यावेळीही नवीन फायनांशिअल स्टेटमेंट तयार केले पाहिजे अशी भूमिका घेतली होती. या चर्चेच्या दरम्यान अडीच

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी....

दिवस सभागृहाचे कामकाज बंद झाले. आमचे अर्थमंत्री असतील किंवा अर्थराज्यमंत्री असतील त्यांच्या मनामध्ये सुध्दा शंका होत्या की, आपण मांडत असलेला मुद्दा बरोबर आहे की नाही ? यासंबंधी राज्यसरकारकडून स्पष्ट मत येत नव्हते, अर्थमंत्र्यांकडून उत्तर येत नव्हते. त्यावेळी ॲडव्होकेट जनरल यांना याठिकाणी पाचारण केल्यानंतर त्यांनी फायनांशिअल स्टेटमेंट एकदाच मांडावे लागते असे मत दिले. पण यासाठी सभागृहाचे अडीच दिवस कामकाज बंद असताना हा खुलासा मागविला त्यामुळे सर्व मा.सदस्यांचे मार्गदर्शन झाले. संपूर्ण महाराष्ट्राला समजले की श्री.गडकरी यांनी मांडलेल्या मुद्यासंबंधी अडीच दिवस सभागृह बंद पडले परंतु समाधानकारक उत्तर मिळाले. काही दिवसापूर्वी असाच घटनात्मक मुद्दा उपस्थित केला गेला. म्हणून या सभागृहात दोनवेळा ॲडव्होकेट जनरल यांना बोलविले होते असे मी म्हणतो. दोन्ही वेळेला विरोधी पक्ष नेत्यांनी भूमिका मांडली की, सभागृहात ॲडव्होकेट जनरलना बोलवून घ्यावे किंवा त्यांचे मत मागवावे यासाठी आपल्याला निर्देश द्यावे लागले. तसेच 4-5 दिवसापूर्वी पुन्हा प्रसंग आला होता की, घटनेच्या 371 (2) अन्वये राज्यपालांनी एक पत्र पाठवून सरकारला पाटबंधारेच्या संदर्भात जे ॲलोकेशन केले पाहिजे यासंबंधीची भूमिका राज्यपालांनी एका पत्राद्वारे राज्यसरकारला कळविली होती. त्या अनुषंगाने पाटबंधारेसाठी ॲलोकेशन केले आहे ते बरोबर आहे किंवा नाही यासाठी ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागविल्यानंतर ती चर्चा संपली, अशाप्रकारचे धाडसी पाऊल सभागृहाच्या संदर्भात त्यांनी उचलले होते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:55

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी पुढे सुरु...)

मघाशी मी उल्लेखिल्याप्रमाणे मा.सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर हे आता विरोधी पक्षनेते झालेले आहेत. मध्यंतरी वर्तमानपत्रातून एक व्यक्ती एक पद असे वाचायला मिळत होते. परंतु एकंदर पाहता ह्या विधानांप्रमाणे आपल्या पक्षातील कृती माझ्या सारख्या कार्यकर्त्याला समाधानकारक अशी वाटली नाही. कारण केन्द्रामध्ये श्री. लालकृष्ण अडवाणी हे भाजपचे अध्यक्ष आहेत आणि विरोधी पक्षनेतेही तेच आहेत. मा.सदस्य श्री. नितीनजी गडकरी हे विरोधी पक्षनेता या पदावरुन निवृत्त झालेले आहेत. मी त्यांना त्यांच्या पुढच्या राजकीय वाटचालीमध्ये शुभेच्छा देतो. तसेच मा.सदस्य श्री.भाऊसाहेब फुंडकर यांचे देखील मी पुनश्च एकदा अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत डावखरे (उप सभापती) : सन्माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी याठिकाणी नूतन विरोधी पक्षनेते मा. श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्या अभिनंदनाचा जो ठराव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मा.सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकरांची याठिकाणी विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करण्यात आली. कृषी क्षेत्रामध्ये शेतक-यांकरिता, बहुजन समाजामध्ये बहुजनांकरिता काम करणा-या एका समर्पक अशा नेतृत्वाची या ठिकाणी योग्य अशी निवड करण्यात आलेली आहे. त्यांची विरोधी पक्षनेते पदी निवड करुन त्यांच्या पक्षाने त्यांचा सन्मान केला असे नव्हे तर बहुजनांच्या भावनांचा विचार केला आहे असे त्यांच्या या नियुक्तीच्या संदर्भात मी म्हणेन. मा. श्री. भाऊसाहेब फुंडकर यांचा राजकारणातील असलेला अनुभव हा या सभागृहाला निश्चितपणे मागदर्शक ठरेल याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. मा.श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्या नवीन राजकीय नियुक्तीला मी मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, कालच्या घटकेपर्यन्त ज्यांच्या समवेत काम करण्याची संधी मला मिळाली ते मा.सदस्य श्री. नितीनजी गडकरी यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून महाराष्ट्रामध्ये जे काम केले त्याला तोड नाही. देशातील विकसनशील राज्यामध्ये महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेण्याचे काम आदरणीय श्री. नितीनजी गडकरी यांनी केले. त्यानंतर त्यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाली. त्या पदाला देखील त्यांनी आपल्या कर्तृत्वाने चांगल्या प्रकारे न्याय देण्याचे काम त्यांनी केले. मला त्यांचा चांगला अनुभव आहे. जेव्हा जेव्हा कधी अडचण निर्माण झाली त्या त्या वेळी अधिक अडचणीत न येतो अडचणीतून बाहेर पडण्याचे योग्य मार्गदर्शन मा.सदस्य श्री. नितीनजी गडकरी यांनी केले. मला आठवते की, पाच वर्षापूर्वी याठिकाणी काम करीत असताना माझ्यावर अविश्वासाचा प्रस्ताव आला होता. त्यानंतर मी काही काळ सभागृहामध्ये येण्याचे बंद केले होते. त्यानंतर मी मा.सदस्य श्री. गडकरीसाहेबांशी चर्चा केली. मी त्यांना म्हणालो की, "गडकरीसाहेब माझे कुठे चुकले होते काय ?" त्यांनी त्यावेळी मला सांगितले की, राजकारणामध्ये असे प्रसंग येतात. अविश्वासाच्या ठरावाला विश्वासाने कसे सामोरे जायचे याचे उत्कृष्ट मार्गदर्शन मा.सदस्य श्री.गडकरीसाहेबांनी मला केले. काही गोष्टींच्या आठवणी माणसाच्या मनात कायमच्या रहातात, तशी ही एक आठवण माझ्या मनात कायमची राहिलेली आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी मा.सदस्य

MSS/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:55

(श्री. वसंत डावखरे पुढे सुरु...)

श्री.गडकरीसाहेबांचे अतिशय चांगल्या शब्दात वर्णन केले आहे. आदरणीय उपमुख्यमंत्र्यांनी देखील त्यांच्या कार्याचा आणि कर्तृत्वाचा उल्लेख केला आहे. अनेक मा.सदस्यांनी त्यांच्या बद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत. सर्वांच्या भाषणामध्ये एकच सूत्र होते की, व्यक्ती कोणेतीही असो. पण त्या खुर्चीला महत्व प्राप्त करुन देण्याचे काम ते व्यक्तिमत्व करीत असते. त्यामुळे खुर्ची ही राजकारणाचा केन्द्रबिंदू असते हे मला स्वत:ला माहीत आहे. तेव्हा मला असे वाटते की, कोणतीही खुर्ची सोडत असताना माणूस मनातल्या मनात गुणगुणत असतो की,

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव डावखरे..

"तेरी जुल्फों से जुदाई तो नहीं मांगी थी,
कैद मांगी थी रिहाई तो नहीं मांगी थी."

कुठलीही खुर्ची सोडत असताना मग ती खूर्ची मुख्यमंत्री पदाची असो, उप मुख्यमंत्री पदाची असो, विरोधी पक्ष नेते पदाची असो, उप सभापती पदाची असो, सभापती पदाची असो, ज्या दिवशी खुर्ची सोडण्याची वेळ येते त्यावेळी तो राजकारणी असे निश्चितपणे म्हणत असतो. माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या नियुक्ती बाबत ब-याच वेळा ऐकत होतो. परंतु मुहूर्त सापडत नव्हता. श्री. पांडुरंग फुंडकर साहेब देखील तेथे बसून या खुर्चीकडे बघून कदाचित असे म्हणत असतील की,

"तुझे क्या सुनाऊं ऐ मैं दिलरुबा तेरे सामने मेरा हाल हैं,
तेरी एक निगाह की बात हैं, मेरे जिंदगी का सवाल हैं."

अनेक सन्माननीय सदस्यांनी येणा-याचे स्वागत आणि जाणा-यास निरोप दिला. श्री. गडकरी साहेब, आपण इकडून तिकडे जात असाल तेव्हा कदाचित या खूर्चीकडे बघून आपणही म्हणाला असाल की,

"तेरी दुनिया से दूर चले होकर मजबूर हमें याद रखना"

पण ही खुर्ची सतत तुमच्या कर्तृत्वाकडे बघून तुम्हाला नेहमीच म्हणेन की,

"जाओ कहीं भी सनम तुझे इतनी कसम हमें याद रखना"

त्यामुळे आपल्या नव्या कारकिर्दीला, आपल्या पुढच्या भविष्याला मी निश्चितपणे शुभेच्छा देतो. एकमेकाला "राम राम " करण्यास शासनाच्या जी.आर.ची गरज नसते. मुंबईत षन्मुखानंद हॉलमध्ये "विकासाचा महामार्ग" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळयाचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमास श्री. बाळासाहेब ठाकरे उपस्थित होते. मी त्या कार्यक्रमास मी देखील हजर होतो. तत्कालिन मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी हे उपस्थित होते. ते त्या कार्यक्रमाच्या वेळी म्हणाले की, मा.बाळासाहेब सत्तेकडे जाणारा महामार्ग आम्हाला सुचवा. त्या कार्यक्रमात मा.बाळासाहेब यांनी उदगार काढले की, श्री. मनोहर जोशी, जर सत्ता आली तर मी श्री. नितीन गडकरी यांना---

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव डावखरे..

मुख्यमंत्री करीन आणि तुम्हाला सार्वजनिक बांधकाम मंत्री करीन. मा. बाळासाहेब ठाकरे हे बोललेले आहेत त्यादृष्टीने आपण प्रयत्नशील राहावे अशा शुभेच्छा आजच्या प्रसंगी देतो आणि मी माझे मनोगत पूर्ण करतो.

--------------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ 19:00

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ): माननीय सभापती महोदय, माझे जेष्ठ सहकारी आणि भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष होते, ज्यांना अतिशय दांडगा अनुभव आहे असे श्री. पांडुरंग फुंडकर आज या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते झाले आहेत. मला अतिशय आनंद आहे, मी जरी हे पद सोडत असलो तरी या पदावर पक्षातला एक जेष्ठ अनुभवी आणि निष्ठावान कार्यकर्ता तो पुन्हा एकदा हे काम करण्याकरिता या ठिकाणी आलेला आहे. सभापती महोदय, श्री. पांडुरंग फुंडकर तीन वेळा खासदार म्हणून काम केले आहे. त्यांनी विधानसभा सदस्य म्हणून काम केले आहे. विधान परिषद सदस्य म्हणून देखील काम केले आहे. विदर्भातील ग्रामीण भागातील त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. सभापती महोदय, कापूस उत्पादकांचा प्रश्न असो, ग्रामीण भागातील प्रश्न असो, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो, या सगळया प्रश्नांवर त्यांची तळमळ, त्यांची चिंता त्यांनी वेळोवेळी सभागृहात व्यक्त केलेली आहे. या सभागृहामध्ये विदर्भ, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्र या विभागाची अन्यायाची गाथा आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख म्हणाले, त्याप्रमाणे " मिळो न मिळो " पण याकरिता संघर्ष केला पाहिजे. हा संघर्ष कसा केला पाहिजे याचे मला एक  उदाहरण आठवते. माझ्याकडे लहानपणी भीक मागणारी एक महिला आली. ती म्हणाली की, "माझी माय देते","माझी माय देते ". मी त्यावेळी सांगितले की, पुढे जा. पण ती हे वाक्य म्हणत रहावयाची की, "माझी माय देते " असे वारंवार म्हणत रहावयाची. शेवटी कंटाळून घरातून कोणीना कोणी येऊन त्या महिलेस काही तरी भिक्षा द्यावयाचे. त्यानंतर ती पुढे जावयाची. तेव्हा मी  प्रा. बी.टी. देशमुख यांना म्हटले की, हा संघर्ष असा आहे की, हा करीत राहिला पाहिजे. या संघर्षामध्ये आम्ही एकटे नाहीत. काही लोक बोलू शकतात, काही लोक बोलू शकत नाही. काही लोक आपल्या भावना व्यक्त करु शकतात, काही लोक आपल्या भावना व्यक्त करु शकत नाही. परंतु या संघर्षाची व्यथा ही पक्षभेद विसरुन अनेक लोकांच्या मनापर्यन्त जाऊन भिडलेली आहे. खरे म्हणजे आम्ही कोणाला पैसे देऊ नका, कोणाला कमी द्या, कोणाला जास्त द्या असे आम्ही म्हणत नाही.....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 19:05

श्री. नितीन गडकरी...

आम्ही हेच म्हणत आलो आहोत की,आम्ही आई-वडिलांची मुले आहोत सगळयांना सारखे द्या. या बाबतीतील संघर्ष,कटुता वाढू न देता कुठलीही वेगळेपणाची भावना निर्माण न करता हा संघर्ष सभागृहामध्ये सतत करीत राहिलो यामध्ये आम्हांला कधी यश मिळाले आणि कधी मिळाले नाही हा भाग वेगळा. पण याबाबतीत मागासलेल्या भागाचे दुखणे या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न केला.मला विश्वास आहे की, श्री. भाऊसाहेब फुंडकर देखील विदर्भातील आहेत. निश्चितपणाने ते या व्यथा प्रभावीपणे मांडतील. श्री. भाऊसाहेब फुंडकर सभागृहाचे विरोधी पक्षनेते झाले आहेत. ज्यादिवशी मी प्रदेशाध्यक्ष झालो त्याच दिवशी मी हे पद सोडणार होतो हे मी जाहीर केले होते . खरे म्हणजे प्रदेशाध्यक्ष का झालो मला कळले नाही. परंतु ज्यावेळी आमच्या अध्यक्षांनी मला सांगितले की तुम्ही प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करा त्यावेळी मी सांगितले की अध्यक्ष म्हणून आपण सांगाल त्याप्रमाणे काम करीन. त्यांनी मला एक दिवस प्रदेशाध्यक्ष झालात म्हणून सांगितले त्याचवेळी मी त्यांना सांगितले मी अध्यक्ष झालो आहे म्हणून दुस-या पदावर राहणार नाही. परंतु हा मुहूर्त सापडण्यामध्ये बराच वेळ गेला. बराच वेळ जाण्याचे कारण म्हणजे मुहूर्त श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी निवडला. मी त्यांना सांगितले की तारीख तुम्ही निवडा. कारण लोक मला विचारत आहेत की तुम्ही पद केव्हा सोडणार ? मध्यंतरी त्यांच्या घरी एक दुर्देवी घटना घडली होती. सभापती महोदय, श्री. फुंडकर हे विरोधी पक्षनेता म्हणून या सभागृहामध्ये एकटे नाहीत. मी विरोधी पक्षनेता नसलो तरी त्यांच्या बाजूलाच बसलो आहे. या सभागृहामध्ये त्यांचा सहकारी म्हणून त्यांना जेवढी काही मदत त्यांच्या मागे उभे राहून देता येईल तेवढी सगळी मदत देऊ. मी स्वत:,श्री.बी.टी.देशमुख,श्री.दिवाकर रावते,श्री.मधुकर सरपोतदार,श्री.प्रमोद नवलकर सगळे मिळून त्यांच्या मागे उभे राहू आणि या सभागृहामध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली काम करणार आहोत. सभापती महोदय, मला या सभागृहामध्ये खूप शिकायला मिळाले. या सभागृहामध्ये मी जेव्हा आलो तेव्हा माझे परमभाग्य होते की, त्यावेळी कै.जयंतरावजी टिळक,श्री.रा.सू.गवई यांच्याबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. श्री. शरद पवार हे कसे बोलतात हे ऐकण्याची संधी मला मिळाली. एखादी गोष्ट चांगली आहे आणि ज्या माणसाचे जे चांगले आहे ते ऐकण्याची,बघण्याची आणि त्याला दाद देण्याची ही सवय असल्यामुळे चांगल्याला सभागृहातील अनेक सदस्यांपासून खूप चांगले शिकायला मिळाले. अनेक गोष्टींची माहिती मिळाली.

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मा.श्री.आर.आर.पाटील यांना मी एक विनंती करणार आहे. गेल्या 18 वर्षापासून मी या सदनात आहे. अभ्यास केला पाहिजे. या सभागृहाचा दर्जा चाढत चाललेला आहे. वेलमध्ये येण्याचे आतातर जवळपास बंदच झालेले आहे. मी जेव्हा नवीन आलो त्यावेळी सभापतींच्या आसनापर्यंत जाण्याचे प्रकार होत होते. हळूहळू या सभागृहाने आपला दर्जा चांगला केलेला आहे. या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या भाषणामध्ये गुणात्मकता आहे. दर्जा आहे. महाराष्ट्राच्या विकासाची तळमळ आहे. या सभागृहाच्या कामकाज आणि कार्य आहे ते फार मोठे आहे. कदाचित अशा सभागृहांच्या कामामध्ये तुलना करु नये,योग्य नाही. अप्रस्तुत आहे. लोकशाहीच्या तत्वाप्रमाणे जेव्हा सभागृहाच्या कामकाजाचा सखोल अभ्यास केला तर या सभागृहाने महाराष्ट्राच्या संसदीय इतिहासामध्ये या सभागृहाने इतिहास निर्माण केला आहे.या सभागृहातील चर्चा,मते,प्रश्न असतील,लक्षवेधी,ठराव असतील याला एक वेगळे स्वरुप प्राप्त झालेले आहे. या सभागृहामध्ये कधी बोलत असताना एखाद्या सदस्याबद्दचे या सभागृहामधील उद्‌गार अन्य सभागृहामध्ये निघत असतात. फार कमी घटना असतात. सभागृहाची प्रतिष्ठा सगळयांनी जोपासली आहे. माझ्यासारख्या एका लहान माणसाला या सभागृहातील विरोधी पक्षनेत्याचे पद मिळाले हेखरोखर मी माझे परमभाग्य समजतो. या सभागृहामध्ये मी आलो असताना माझे अतिशय जवळचे विद्वान मित्र कै.डॉ.श्रीकांत जिचकार होते. डॉ. जिचकार माझे महाविद्यालयीन मित्र होते. ते एनएसयुआय मध्ये आणि मी विद्यार्थी परिषदेमध्ये होतो. नागपूर विद्यापीठ संघामध्ये आम्ही दोघे निवडणुकीला उभे राहिलो होतो. सगळया विद्यार्थ्यांनी निरनिराळया पक्षातील डॉ. जिचकारांना मते दिली आणि इकडे जनरल सेक्रेटरीकरिता मला मते दिली. असे क्रॉस व्होटींग झाले.

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

अशा प्रकारे क्रॉस व्होटींग त्यावेळी झाले होते. डॉ. जिचकार हे माझे अतिशय जवळचे मित्र होते.मी जेव्हा या सभागृहात पहिल्यांदा निवडून आलो तेव्हा त्यांचा आणि माझा पक्ष जरी वेगळा असला तरी डॉ.जिचकार यांच्यामध्ये आणि माझ्यामध्ये अत्यंत प्रेमाचे संबंध होते.मी नवीन निवडून आलो तेव्हा या इमारतीमध्ये फिरत होतो.लिफट वर खाली जात येत होती. विद्यार्थी ज्याप्रमाणे प्रथम महाविद्यालयात गेल्यानंतर भांबावतो तशी माझी स्थिती झाली होती.त्यावेळी माझे वय सुध्दा लहान होते. म्हणून मी डॉ.जिचकार यांच्याकडे गेलो आणि त्यांना मी असे सांगितले की," या सभागृहातील कामकाजासबंधी मला काहीही माहिती नाही. या सभागृहात काय बोलावयाचे कसे बोलावयाचे हे काही समजत नाही ".तेव्हा त्यांनी मला असे सांगितेले की," तू काही चिंता करु नकोस,समोर जे बसलेले आहेत त्यापेक्षा आपणशहाणे आहोत असे समजून बोलावयाला सुरुवात करावयाची."माझा स्वभावसुध्दा थोडासा उत्साही आहे.मी जेव्हा क्रिकेट खेळावयाचो तेव्हा मी पहिल्या बॉल पासून आडव्या तिडव्या बॅट मारावयाचो. मी जास्त वेळ क्रिझवर टिकलो नाही परंतु टिकलो तर जास्तीत जास्त रन काढावयाचो, कमीत कमी वेळात जास्तीत जास्त कसे काम करता येईल. असा माझा स्वभाव आहे. डॉ.जिचकार यांनी मला सुरुवातीला पुष्कळ मदत केली होती .दुर्देवाने आज ते आपल्यात नाहीत.सभागृहातील एक चांगला मित्र आम्ही गमावला आहे.

त्यावेळी या सभागृहाचे सभापती माननीय जयंतराव टिळक होते. मी जेव्हा बोलण्यासाठी उभे रहावयाचो त्यावेळी ते मला असे म्हणावयाचे की, "नितीन तू खाली बस." त्यामुळे मी लगेच खाली बसावयाचो.काही वेळा ते माझ्यावर रागवावयाचे परंतु त्यांनी माझ्यावर तेवढेच प्रेम केले होते.या सभागृहातील अनेकांनी माझ्यावर इतके प्रेम केले की , त्यामुळे या सभागृहाविषयी माझ्यात अटॅचमेन्ट निर्माण झाली आहे. सभापती महोदय, या सभागृहात काम करीत असतांना माझा पिंड हा सकारात्मक आहे. नकारात्मक नाही. सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील जी गोष्ट बोलले होते ती गोष्ट खरी आहे.अमुक एका मंत्र्यांला अडचणीत आणावे, त्याला एक्सपोज करावे अशी माझ ी मनातून इच्छा नसते.परंतु एखाद्याला जर रोज बकरे कापण्याचेच काम दिले तर तो सुरीला धार लावण्याशिवाय दुसरे काय करील ? विरोधी पक्षात जर काम करावयाचे असेल तर मंत्र्यांना अडचणीत कसे आणावयाचे हे काम रोज त्याला करावेच लागते. त्यामुळे काय केले म्हणजे मंत्र्यांचे तोंड बंद करता येईल याची शक्कल दररोज लढवावी लागत असे.आज कोणते





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रकरण बाहेर काढावयाचे ? तसेच प्रेसला कोणती बातमी द्यावयाची ?आणि सरकार कशामुळे अडचणीत येईल हीच कामे दररोज करावी लागत असतात.यामुळे आम्ही दररोज ही कामे करीत असू त्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे आमचे याबाबतीत खास सल्लागार आहेत. आज कोणते प्रकरण बाहेर काढावयाचे याबाबतीत ते आम्हाला सल्ला देतात.एका गोष्टीची मात्र आम्ही काळजी घेतली होती ती गोष्ट म्हणजे वार तर कठोर करावयाचा परंतु जखम होता कामा नये आणि रक्त निघता कामा नये. लोकशाहीचे खरे महत्व हे आहे की टीका कितीही कठोर केली तरी त्या त्यातून समोरचा माणूस रक्त बंबाळ होता कामा नये. मला एका गोष्टीची आठवण होते आणि ती मी येथे सांगू इच्छितो. या सभागृहात मला अशा काही गोष्टी मिळाल्या की जर मी त्याचा उपयोग केला असता तर एखादा मंत्री त्या पदावरुन जाऊ शकला असता परंतु ज्यावेळी मला त्याचा वापर करण्याचा मोह झाला होता त्यावेळी मला एक गोष्ट आठवली की, आपण एखाद्याचे जीवन घडवू शकत नसलो तरी कोणाचे जीवन बरबाद करणे बरोबर नाही.राजकारणामध्ये जेव्हा वार करावयाचे असतात तेव्हा त्याची मर्यादा सुध्दा आपण सांभाळली पाहिजे.त्यामुळे काही गोष्टी मी केलेल्या नाहीत. आपल्यामध्ये जी काही मतभिन्नता आहे ती विचारांची आहे आणि हीच लोकशाहीची प्रगल्भता आहे. विचारातील मतभिन्नता ठेवून आपले विचार मांडणे हा आपला अधिकार आहे.या सभागृहात मला हेच शिकावयाला मिळाले. मध्यंतरी मला अपघात झाला होता आणि दोन अडीच वर्षे मला नीट चालता येत नव्हते. सभागृहात सुध्दा मी व्हील चेअरवरुन आलो होतो.त्या वेळच्या माननीय सभापतींनी मला व्हील चेअरवरुन येण्याची व खाली बसून बोलण्याची तसेच आपणही मला खाली बसून बोलण्याची संधी दिली. होती.त्याही परिस्थितीत मी या ठिकाणी काम करण्याचा प्रयत्न केला होता.राजकारण हे सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे एक उपकरण आहे.त्यामुळे राजकारणात व्यक्तिगत एखादे मोठे पद मिळणे ही काही मोठी गोष्ट नाही. कोणाची तशी आकांक्षांही असता कामा नये.जर पद मिळावयाचे असेल तर ते निश्चित मिळेल आणि जर ते पद मिळावयाचे नसेल तर मिळणार नाही.परंतु आपले जे काही कर्तव्य आहे ते आपण करीत राहिले पाहिजे.हा राजकारणातील सर्वात मोठा विचार आहे.मी जेव्हा एखाद्या व्यक्तीकडून आशीर्वाद मागतो तेव्हा त्यांना हे सांगतो की,मला एखादे मोठे पद मिळण्यापेक्षा माझ्य ाहातून गरीब माणसाची चांगली सवा झाली पाहिजे अशा प्रकारचा मला

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MHM/ SBT/ प्रथम कानडे 19.10

श्री.नितीन गडकरी ...

आशीर्वाद द्या.परंतु ही गोष्ट आपण ब-याच प्रमाणात आज विसरत चाललो आहोत.सभागृहात होणा-या कामकाजातून जे विचार निर्माण होत असतात ते विचार राजकीय जीवनात नवीन तरंग निर्माण करतात व नवीन दिशा देत असतात.या सभागृहात विरोधी पक्ष नेता म्हणून मला चांगले काम करण्याची संधी मिळाली आहे.हे काम करीत असतांना मला सर्वाचे चांगले सहकार्य मिळाले आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनीसुध्दा मला सहकार्य दिले आहे. माझा स्वभावसुध्दा एकांडा आहे. गेलया पाच सहा वर्षात मी कधीही कोणत्या मंत्र्यांकडे बदली करा म्हणून गेलो नाही. विरोधी पक्ष नेता म्हणून मी अमुक काम करा तुमक काम करा असे सांगण्यासाठी मंत्र्याकडे कधी गेलो नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री.गायकवाड नंतर --- 19:15

श्री. गडकरी ....

कधी वेळ आली, कोणावर अन्याय झाल्याचे प्रकरण असेल तर मात्र जरूर गेलो आहे. माननीय सभापती महोदय, मला सगळ्यांनी अगदी उत्तम सहकार्य केलेले आहे. मात्र कधी टीका करताना कोणावर कळत न कळत कोणाला जखम झाली असेल, कोणाचे रक्त काढले गेले असेल तर जरूर त्याची त्याबद्दल क्षमा मागेन, आपण मला जे सहकार्य केले आहे त्याबद्दल देखील जरूर ऋण व्यक्त करतो. आता या ठिकाणी माननीय उपसभापती श्री.डावखरे यांनी पदाबद्दल वर्णन करून सांगितले आहे. या निमित्ताने मला देखील एका गीताची आठवण होते आहे. राजकीय नेत्यांनी ते गीत लक्षात ठेवण्यासारखे आहे. मला ते गीत आता नीटसे आठवत नाही त्यामुळे मला येथे बोलता येत नाही पण मला आठवल्यावर मात्र निश्चितपणे मी त्या गीताचे शब्द आपल्याला सांगेन. झी टेलिफिल्मचा एक सिनेमा होता त्यातील ते गीत आहे. तुमची जी स्वप्ने असतात त्यावरील ते गीत आहे. असो. सभापती महोदय, आज आता मला पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे मी त्याकडे अधिक लक्ष घालणार आहे. पण माननीय मुख्यमंत्र्यांना मी सांगेन की, सन्माननीय श्री.फुंडकर साहेबांना मी विरोधी पक्षनेता पदावरून बाजूला झाल्यामुळे जशी संधी मिळाली तशी आपण कधी तरी डॉ. पतंगराव कदमांना देखील आपण संधी द्यावी. ते केव्हा पासून म्हणून राहिले आहेत की, मला एक चानस हवा. तेव्हा त्यांनाही संधी जरूर मिळेल. त्यांचे कर्तृत्व आणि कार्य जे आहे त्या आधारे त्यांना निश्चितच संधी मिळेल याबाबत मला तरी शंका नाही. पण ही अशी संधी सगळ्यांनाच मिळत राहिली पाहिजे. हे सारखे बदलत राहिले पाहिजे आणि सतत असेच चालत राहणार आहे. कोणीही येथे कायम नाही. राजकारणामध्ये सगळेच टेंपररी आहेत, केवळ आपल्या जवळील जो फेटा घालणारा आणि अन्य हे पांढरी टोपी घालून असणारे तेच केवळ कायम आहेत बाकी आम्ही सर्वच टेंपररी आहोत. तेव्हा आम्ही येऊ आणि जाऊ, ही सारखी चालती अशी गाडी आहे. हे चित्र नेहमीच बदलत राहणारे आहे आणि लोकशाहीतील ते एक महत्त्व आहे. माननीय सभापती महोदय, आपण सर्वांनीच मला खूप सहकार्य केलेले आहे. माझ्याबद्दलचे अतिशय चांगले उद्‌गार माननीय मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी आणि इतरही येथे जे सदस्य बोलले त्यांनी काढले आहेत. त्याबद्दल मी आपणा सर्वांचाच आभारी आहे आणि सन्माननीय श्री.फुंडकर साहेबांच्या कारकीर्दीमध्ये देखील ते अतिशय उत्तम असे काम करतील, या महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेला

..... 3सी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

न्याय देण्याचे काम त्यांच्या हातून होईल असा माझ्या मनात विश्वास आहे त्यासाठी त्यांच्या कारकीर्दीला मी मनापासून शुभेच्छा देतो आणि मघाशी मला नीटसे आठवत नसलेले ते गीत आता मला चांगले आठवत असल्याने ते येथे बोलून मी माझे भाषण संपवितो. ते गीत असे आहे ..

आने वाला कल एक सपना है,
गुजरा हुआ कल बस अपना है,
हम गुजरे हुए कल में रहते है,
यादों के सब जुगनू, जंगल मे होते है ..

*****

........ 3सी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : माननीय सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी मी या सभागृहाचा विरोधी पक्षनेता म्हणून निवड झाल्याबद्दल जो अभिनंदनाचा प्रस्ताव आणला आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी मी उभा आहे. आज या सभागृहाच्या विरोधी पक्षनेतेपदी माझी जी निवड करण्यात आली, आमच्या पक्षाने नेते माननीय श्री.गोपीनाथराव मुंडे, शिवसेनेचे नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते श्री.नारायणरावजी राणे, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि आतापर्यंत या सदनामध्ये विरोधी पक्षनेते राहिलेले आणि या पदावरून खाली उतरलेले सन्माननीय श्री.नितीन गडकरीजी, तसेच शिवसेनेचे या सदनातील नेते श्री.मधुकर सरपोतदार आणि दोन्ही पक्षांचे प्रतोद असलेले श्री. मधुकर चव्हाण आणि डॉ.दीपक सावंत तसेच श्री.दिवाकर रावते आणि अन्य सर्वांनी एकमताने माझ्या निवडीचे पत्र आपल्याकडे दिले. मी त्यांनाही धन्यवाद देतो. मला याची जाणीव आहे की, हे पद अत्यंत जबाबदारीचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांनी आता येथे सांगितल्या प्रमाणे महाराष्ट्राच्या या विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेते पदी आतापर्यंत जवळपास 19 लोकांनी काम केलेले आहे. त्यामध्ये सन्माननीय श्री.वि.स.पागें पासून श्री. शरद पवारांपर्यंत आणि माननीय नानासाहेब तथा उत्तमराव पाटील असतील, श्री.ग.प्र.प्रध्या ान असतील, माननीय श्री.नितीन गडकरी असतील .....

( यानंतर श्री. जागडे .... 3डी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

अण्णा डांगे असतील, हांडे असतील. अशा विविध मान्यवरांनी या पदावर काम केले आहे. आता ही जबाबदारी माझ्यावर येऊन पडली आहे. सभापती महोदय, भारतीय जनता पक्ष असा आहे की, आमचा पक्ष आपल्या ध्येय्य धोरणानुसार निर्णय घेत असतो. माननीय नितीन गडकरी यांच्यावर प्रदेश अध्यक्षपदाची जबाबदारी आली आहे. त्यामुळे एक व्यक्ती आणि एक पद या उक्तीप्रमाणे माननीय गडकरी यांनी विरोधी पक्षनेता या पदाचा राजिनामा देण्याचा मनोदय व्यक्त केला होता. आता माननीय गडकरी या ठिकाणी जे काही बोलले आहेत, ते अर्धसत्य आहे. सभापती महोदय, माझ्याही काही प्रापंचिक अडचण होत्या. मध्यंतरीच्या काळात माझ्या पुतण्याचे अपहरण झाले होते आणि नंतर त्याची हत्या झाली आहे. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी दोन दिवस अगोदर माझ्या वडील भावाचा मृत्यू झाल. त्यामुळे या पदाचा भार स्वीकारण्यास उशीर झाला. या पदावर माझे नाव पक्षाने सुचविले आणि मित्र पक्षाने त्याला संमती दिली. हे अत्यंत जबाबदारीचे पद आहे. सभापती महोदय, 1978 साली मी प्रथमच विधानसभेत निवडून आलो आहे. त्यानंतर पुनहा 1980 साली निवडून आलो आहे. त्या कालावधीत म्हणजेच जवळ जवळ सात वर्षे मला विधानसभेत काम करण्याची संधी मिळाली होती. त्यावेळी आमच्या पक्षाचे 14 आमदार होते. त्यावेळी आमचे नेते श्री. हशु अडवाणी होते. श्री. हशु अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली आमचा 14 आमदारांचा गट विधानसभेत काम करीत होता. सभापती महोदय, त्यानंतरही झालेल्या निवडणूकीत आमदारांची संख्या वाढली नव्हती. विदर्भातून श्री. महादेवराव शिवनकर, श्री. वानखेडे, श्री. किसनराव संचेती आणि मी असे चार जणच निवडून येत होतो. त्यावेळेपासून वेगळ्या विदर्भाचा तसेच विदर्भाच्या बॅकलॉगचा प्रश्न निर्माण झाला होता. 1980 ते 1985 या काळात विदर्भात विकासावर चर्चा झाली होती. आणि त्यावेळीच दांडेकर समिती नियुक्त करण्यात आली होती. दांडेकर समितीकडे विदर्भाचा बॅकलॉग काढण्याची जबाबदारी देण्यात आली होती. ख-या अर्थाने त्याचवेळी विदर्भाच्या बॅकलॉगला तोंड फुटले. गेले तीन वर्ष मी या सदनाचा सदस्य आहे. माननीय नितीनजी गडकरी, बी. टी. देशमुख यांनी वैधानिक मार्गाने विदर्भाच्या बॅकलॉगचा प्रश्न या सदनात लावून धरलेला मी पाहिले आहे. हिन्दुस्थानातील महाराष्ट्र हे अग्रगण्य राज्य आहे, विकासात्मक राज्य आहे. असे असले तरी मी ग्रामीण भागातून आलेला कार्यकर्ता आहे. एका कष्टकरी शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला आहे. पतंगराव कदम साहेबांना मी सांगू इच्छितो की, माझ्याकडे राजकीय पुण्याई नव्हती. माझा कोणीही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर......

गॉडफादर नव्हता. माझा पक्ष हाच माझा गॉड फादर होता. मी निष्ठेने आणि प्रामाणिकपणाने माझ्या पक्षाच्या तत्वाशी बांधीलकी ठेवली होती. पक्षाचा चढ उतार मी पाहिला आहे. एका वेळी तर पक्षाचे दोनच खासदार होते. तेव्हापासून मी माझ्या तत्वापासून बाजुला न जाता तत्वाशी बांधीलकी ठेवून मी पक्षाचे काम करीत राहिलो आहे.

( यानंतर श्री. सरफरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

माननीय श्री. पतंगराव कदमजी मी आपणाला सांगतो की, माझ्या पाठीमागे कुणी गॉडफादर नाही व माझ्या पुढे कुणी गॉडफादर नाही. परंतु विश्वास आणि निष्ठेने वागल्यामुळे मी आमदार व खासदार झालो, पणन महासंघाचा अध्यक्ष झालो. युती सरकारची राजवट आली त्यावेळी या राज्यातील 50 लाख कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा पणन महासंघ होता त्यावेळी या राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी व माननीय उपमुख्यमंत्री श्री. गोपीनाथ मुंडे यांनी मला वेळोवेळी बोलाविले आणि सांगितले की, तुमच्यावर ही अध्यक्षपदाची जबाबदारी टाकली आहे. त्यावेळी मी सांगितले की, कापसाच्या प्रश्नावर प्रचंड गाढा अभ्यास असणारे श्री. मोतीराम लहाने आज ते हयात नाहीत त्यांच्याकडे हे पद द्या. त्यावेळी अनेक अनुभवी नेते होते. परंतु त्यांनी सांगितले की, नाही तुम्हाला हे पद संभाळले पाहिजे. ती सोपविलेली जबाबदारी पार पाडण्याचा मी प्रयत्न केला. मला लोकसभा निवडणुकीमध्ये उभे रहाण्यास सांगण्यात आले त्याप्रमाणे मी उभा राहिलो. मी पक्षाचा अध्यक्ष झालो. मला पहिल्यांदा माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांनी सांगितले की, तुम्ही विधानपरिषदेमध्ये जा. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये माझा पराभव झाल्यानंतर माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांनी मला विश्वास दिला. ज्यावेळी मी पक्षाचा अध्यक्ष झालो, त्यावेळी ते केंद्रामध्ये उपाध्यक्ष होते. ते मला म्हणाले की, तुम्ही अध्यक्ष झाले आता विधानपरिषदेत जा. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, मी आज पक्षाचा अध्यक्ष आहे, माझ्याकडे एक पद आहे. तेव्हा माझ्याऐवजी एखादा कार्यकर्ता विधानपरिषदेमध्ये गेला तर ते अधिक चांगले होईल. आणि दुसऱ्यांदा त्यांनी मला पाठविले. तेव्हापासून मी तीन वर्षे या सभागृहाचा अनुभव घेत आहे. जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर राजकीय भूमिका घ्यायची नाही असे माझे मत आहे. या बाबतीत माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे एक वाक्य मला आठवते की, " भारतीय जनता पक्षाचे काम हे सतीचे वाण आहे, शेवटचा माणूस जो ग्रामीण भागात रहातो, झोपडीत रहाते, त्याच्या दारिद्रय निर्मूलनाची पूजा बांधण्यासाठी आपल्या पक्षाचा जन्म झाला आहे". ते ध्येय डोळयासमोर ठेऊन गेली 20-22 वर्षे आम्ही काम करीत आहोत. आणि म्हणून सुरुवातीपासून शेतकऱ्यांच्या चळवळीमध्ये काम करणारा मी कार्यकर्ता आहे. शेतकरी चळवळ फोफावली पाहिजे, शेतकऱ्यांची संघटना झाली पाहिजे. 50 वर्षापासून देशातील शेती धंदा आहे , त्याला प्रमुख उद्योगाचे स्थान मिळाले नाही ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

मिळाले पाहिजे. आज जी शेतीची अवस्था झाली आहे त्या शेतकऱ्यासाठी लढणारा मी कार्यकर्ता आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख साहेब आपली 25 वर्षे ओळख आहे. मी विरोधासाठी विरोध करणारा कार्यकर्ता नाही. सभागृह चालवितांना आपण निश्चितपणे अपेक्षा केली आहे ती पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. मी आपल्याला एक गोष्ट सांगतो की, आपण मला मी जहाल, मवाळ आहे म्हटले ते खरे आहे.सर्वच कार्यकर्ते किंवा सर्वच आमदार हे माननीय श्री. नितीनभाऊ गडकरी होऊ शकत नाहीत. प्रत्येकाची काम करण्याची पध्दत वेगळी आहे, प्रत्येकाची भाषण करण्याची शैली वेगळी असते, प्रत्येकाची आक्रमकता वेगळी असते. परंतु एखाद्या प्रश्नासाठी लढायचे ठरविले तर निश्चितपणे ती लढाई शेवटच्या टोकापर्यंत नेण्याचे भारतीय जनता पार्टीच्या ज्या संस्कृतीमध्ये मी वाढलो त्या संस्कृतीची शिकवण आहे. आणि विधायक कार्यासाठी निश्चितपणे आपल्याला मदतीचा हात दिला जाईल. या महाराष्ट्राचा विकास झाला पाहिजे, हा महाराष्ट्र हिंदुस्थानामध्ये अग्रगण्य राहिला पाहिजे यासाठी विकासाभिमुख दृष्टीकोनातून आपणाबरोबर सतत सहकार्य करण्याचा प्रयत्न करु. परंतु आपण टिकलात आपले सरकार टिकले व या राज्यातील शेतकऱ्यांची प्रतारणा करण्याचा प्रयत्न केला तर, या राज्यातील बेरोजगारांची प्रतारणा करण्याचा प्रयत्न केला तर, या राज्यातील सर्वसामान्य माणसाला आपण केंद्रबिंदू मानले आहे,जो झोपडीत अर्धउपाशी रहातो अशा माणसाची प्रतारणा करण्याचा प्रयत्न केला तर त्याला निश्चितपणे कडवा विरोध करण्याची भूमिका या आसनावरुन घ्यावी लागेल एवढेच या निमित्ताने सांगतो. या ठिकाणी माझ्या अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहाने मांडला व मला शुभेच्छा दिल्या. खरे म्हणजे आपण सांगितले ते खरे आहे की, जोपर्यंत त्या पदावर माणूस जात नाही तोपर्यंत त्या माणसाला आपले कर्तृत्व दाखविता येत नाही. मी सुरुवातीला महाराष्ट्राचा अध्यक्ष झालो त्यावेळी सुध्दा अधिक जबाबदारीच्या पदापासून माझी सुरुवात झाली. आपण ती जबाबदारी पार पाडू शकू की नाही अशी मला शंका होती.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 19:30

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

मला माननीय श्री.मुंडेसाहेबांनी सांगितले की, तुम्ही अध्यक्ष व्हा आणि एवढया मोठया महाराष्ट्रातील संघटनेचा मी अध्यक्ष झालो. याबाबतीत मला पक्षाने सहकार्य दिले. माननीय श्री.मुंडेसाहेबांसारखे खंबीरपणे माझ्या पाठिशी उभे राहीले आणि हा हा म्हणता भारतीय जनता पार्टीच्या शाखांची संख्या ग्रामीण भागामध्ये 13 हजारावरुन 27 हजारापर्यंत करण्याची आमची मजल गेली. मी या पदाला न्याय देण्याचा पूर्णपणे प्रयत्न करीन. माझे पूर्ण कसब पणाला लावेन. माझी पूर्ण मेहनत पणाला लावेन.महाराष्ट्राची आणि महाराष्ट्राच्या लोकशाहीच्या रथाची सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष ही दोन चाके आहेत आणि ही चाके बरोबर चालली पाहिजेत यादृष्टीने आपण यशस्वीपणे प्रयत्न करु. या सभागृहाची प्रतिष्ठा जोपासण्याचा दोन्ही बाजूने सतत प्रयत्न केला जात आहे. ती प्रतिष्ठा जपण्याचा सुध्दा मी निश्चितपणे प्रयत्न करीन. मला आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे. माननीय सभापती महोदय, आम्हाला आपल्याही सहकार्याची आवश्यकता आहे. आपले सहकार्य असतेच. माझे मित्र पक्षाचे सन्माननीय सदस्य हे माझे मित्र आहेत, त्यांच्याही सहकार्याची मी अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा या पदावर माझी नियुक्ती केल्याबद्दल सर्व सभागृहाला आणि माझ्या मान्यवर नेत्यांना धन्यवाद देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

. . . .3 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या सार्वभौम सभागृहाचे नुतन विरोधी पक्षनेते हे एक अत्यंत ज्येष्ठ सहकारी कार्यकर्ते आहेत. गेली 27-28 वर्षे सातत्याने महाराष्ट्रामध्ये असंघटित कष्टकरी शेतक-यांमध्ये राबलेले सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांची याठिकाणी आज विरोधी पक्षनेते म्हणून घोषणा झाली. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे, त्या ठरावाला सन्माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय उपसभापती, सन्माननीय माजी विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखसर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकरराव सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सभासदांनी त्यांच्या निवडीला एकमताचा पाठिंबा दिला. त्या अनुषंगाने त्यांच्या कर्तृत्वाच्या बाबतीत चुणूक सुध्दा अत्यंत खुलेपणाने याठिकाणी वक्त्यांनी सांगितली. मी एवढेच म्हणेन की, सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांना मी सुध्दा 1978 पासून पाहिलेले आहे. ते 1978 ते 1980 आणि 1980 ते 1985 या दरम्यान विधानसभेचे आमदार होते, त्यावेळेला मी सुध्दा विधानसभेचा आमदार होतो. मृदूभाषी म्हणा, मितभाषी म्हणा, पण अत्यंत परखड बोलणारा कार्यकर्ता या अनुषंगाने अनेक वेळेला संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करणारा एक कणखर नेता यादृष्टीने सुध्दा मला त्यांना पाहण्याचा अनेक वेळा अनुभव आला. असंघटित सामान्य गरीब समाज विशेषत: कपाशी उत्पादक शेतकरी हा त्यांचा केंद्रबिंदू आहे. एका अत्यंत साध्या घरामध्ये वाढलेला, जबरदस्त ध्येयवादाने प्रेरित झालेला कार्यकर्ता गावापासून ते दिल्लीपर्यंत सुध्दा काम करु शकतो आणि त्याचबरोबर विधानसभा व विधान परिषदेमध्ये सुध्दा विदर्भाचे आणि पर्यायाने महाराष्ट्राचे नेतृत्व करु शकतो, असे नेतृत्व सुदैवाने या सभागृहाचे विरोधी पक्षनेते म्हणून काम करणार आहेत. ज्यावेळेला आपण सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांचे माननीय विरोधी पक्षनेते म्हणून स्वागत करतो, त्याचवेळेला सन्माननीय श्री.नितीन गडकरीजी, ज्यांना मी सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून सुध्दा काम करताना पाहिलेले आहे. त्यांना मी विधान परिषदेचे आमदार म्हणून देखील पाहिलेले आहे. माननीय मुख्यमंत्रीसाहेब, त्यांचे वैशिष्टय असे आहे की, एखादा अत्यंत निष्णात वकील ज्यापध्दतीचे वकील पत्र उपलब्ध होईल, ते वकील पत्र कसे यशस्वी करावे याचा एक अव्वल नमुना म्हणजे एकंदरीत माननीय श्री.नितीनजी गडकरी यांचे एकंदरीत याठिकाणचे काम आहे असे म्हणावे लागेल.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे... 19:35

**मा.सभापती** (पुढे चालू...

प्रत्यक्षात बी.ओ.टी., बिल्ट ऑपरेट ॲन्ड ट्रान्स्फर चे 'जनक' अशा पध्दतीने सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांचेकडे पाहिले जाते, तसा त्यांना महाराष्ट्रात मान आहे. सन्माननीय श्री. गडकरी साहेबांचे एक वैशिष्ट्य मी पाहिलेले आहे की, ज्यावेळेला बी.ओ.टी.मधील टोल बसविण्याकरिता बील आले. त्यावेळेस ते बील विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये माझ्या अंदाजाने तीन दिवस थोपवूनही ठेवले. त्या बिलावर जबरदस्त अशा पध्दतीने प्रहार केले गेले, त्यामध्ये सन्माननीय श्री.गडकरी यांची टोल बसविणे योग्य नाही, अशापध्दतीची विचारसरणी होती. सुदैवाने, या नंतरच्या काळात ते ज्यावेळेला सार्वजनिक बांधकाम मंत्री झाले. त्यावेळेस अत्यंत हिरीरीने महाराष्ट्राच्या विकासाच्या विशेषत: दळणवळणाच्या संबंधाने त्यांनी जे धडाडीने निर्णय घेंतले, त्याबाबत काही वेळा मी देखील अचंबित झालो. परिवहन मंत्री म्हणून मी फटकारे खाल्ले. किमान तीन विभागाचा आणि बाहेरचा अनुभव पाहिल्यानंतर राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री या नात्याने त्यांनी जिद्दीने हिरीरीने महाराष्ट्राच्या दळणवळणाच्या अनुषंगाने निर्णय घेतले. त्यावेळेला महाराष्ट्रातील दळणवळणाची जी अवस्था होती ती पाहिली तर त्यांच्या आणि माझ्या मतामध्ये फरक होता. मला असे वाटायचे की, पुणे, मुंबई आणि नागपूर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ज्यावेळेस बी.ओ.टी.द्वारा काही सुविधा करतो, त्यावेळेला महाराष्ट्रातील दुष्काळी विभाग आहे, आदिवासी विभाग आहे, कष्टकरी विभाग आहे, ज्याला अन्य कोणत्याही मार्गाचा पर्याय नाही, यातील काही वाटा तेथेच जर दिला तर त्या ठिकाणी दळणवळणाची साधने होतील. मी या दृष्टीने अभिनंदन करेन की, विदर्भातील दळणवळणाची 1975 ते 1999 मध्ये जी परिस्थिती होती ती फार मोठयाप्रमाणात बदलली, त्यावेळेला उपेक्षित सामान्य माणूस डोळ्यासमोर ठेवून अत्यंत प्रकट विचार त्यांनी मांडले. एखाद्या विषयावर बोलत असतांना जबरदस्तीने पाठपुरावा करायचा हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. विरोधी पक्ष नेते याचा अर्थ असा की, टीकेचा प्रहार लोकशाहीमध्ये जरूर असणार. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ज्या बाबीसंबंधी यत्किंचितही टीका होणार नाही, या दृष्टीने त्यांच्याकडून पथ्य पाळले गेले. मी गेल्या सहा-सात वर्षापासून त्यांचे काम जवळून पहातो आहे. म्हणून सन्माननीय श्री.नितीन गडकरीजींना सांगेन की, त्यांच्याबाबतीत सर्व वक्त्यांनी एक अत्यंत 'कुशल प्रशासक' म्हणून त्यांची पाठ थोपटली. महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने आतापर्यन्त त्यांनी केलेले काम प्रसंशनीय आहे. या पुढच्या काळात प्रामुख्याने ते जे काम करणार आहोत, त्या अनुषंगाने माझ्या देखील त्यांना शुभेच्छा रहातील.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**मा. सभापती** (पुढे चालू....

मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मित भाषी असो किंवा मृदु भाषी असो, सन्माननीय श्री.फुंडकर साहेब हे अत्यंत कणखर पध्दतीचे कार्यकर्ते आहेत, मला खात्री आहे की, संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष ही दोन रथाची चाके आहेत, अत्यंत कार्यक्षमतेने ज्यावेळेला ती चालतील त्याच वेळेला खऱ्या अर्थाने या सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राची प्रगती होईल. आवश्यक असेल त्या त्या ठिकाणी विरोधी पक्ष या नात्याने राज्यातील असंघटित सामान्य माणसाचे अनेक प्रश्न या माध्यमातून येथे माडले जातील आणि ते प्रश्न सोडविण्याचा ते प्रयत्न करतील. देशातील एक अत्यंत चांगले राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाईल, या दृष्टीने सभागृहाचे विरोधी पक्ष नेते म्हणून ते अत्यंत उत्कृष्ट काम करतील, एवढीच या प्रसंगी अपेक्षा बाळगतो.

--

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर असणारा उर्वरित जो कार्यक्रम आहे तो संपूर्ण उद्या सकाळी 10.00 ते 12.30 या दरम्यान घेण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, उद्या लोकशाही आघाडीची बैठक सकाळी 10.00 वाजता आहे आणि ती जवळ जवळ 11.00 ते 11.30 पर्यंत चालेल.

**सभापती** : ठीक अहे. उद्या सकाळी 11.00 ते 12.30 या दरम्यान आजचे उर्वरित कामकाज जेवढे होईल तेवढे घेण्यात येईल. त्यानंतर उर्वरित कामकाज, उद्याचे रेग्युलर कामकाज संपल्यानंतर घेण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या .मंगळवार, दिनांक 12 एप्रिल, 2005 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 7 वाजून 41 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 12 एप्रिल, 2005 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही